ग्रं० वा.
७७२०

# लो टां ग ण

बा ळ गा ड गी ळ

कॉन्टिनेन्टल प्रकाशन : पुणे

IRBK-0107720

बाळ गाडगीळ
यांचें
प्रकाशित लेखन

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.**

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

ಕಾ.ಸಂ: ೬೬೨೦

# लो टां ग ण

बा ळ  गा ड गी ळ

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ७०७०२० नों दि ..........
वि. ......

कॉन्टिनेन्टल प्रकाशन : पुणें

३००३९
२२०९
IRBK-0107720
IRBK-0107720

सर्व हक्क सुरक्षित

प्रथमावृत्ति : डिसेंबर १९६०

चित्रकार : श्री. शि. द. फडणीस

किंमत : साडेतीन रुपये

मुद्रक : ह. म. गद्रे, जनवाणी प्रिंटिंग प्रेस, ४५ बुधवार पेठ, पुणें २.

प्रकाशक : अ. अं. कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, टिळक रोड, पुणें २.

तीर्थरूप कै. तात्या यांच्याकरिता

## अवघे पंचवीस शब्द –

माझ्या पहिल्या दोन्हीं पुस्तकांकडे टीकाकारांनीं दुर्लक्ष केलें; पहिल्याकडे वाचकांनींसुद्धां. या दोघांनींहि माझ्या या तिसऱ्या पुस्तकाच्या बाबतींत आपली न्यायबुद्धि इतकी जागृत ठेवूं नये ही विनंति.

—ग्रंथकर्ता

या संग्रहांतील लेखन अनुक्रमें 'वीणा' मे १९६०, 'वाङ्मय-शोभा' दिवाळी अंक १९६०, 'तरुण भारत' दिवाळी अंक १९६०, 'हंस' विनोद विशेषांक १९५८, 'केसरी' दिवाळी अंक १९५९, 'मौज' १७ मे १९५९, 'वाङ्मय-शोभा' दिवाळी अंक १९५९, 'केसरी' दिवाळी अंक १९६०, 'नवल' दिवाळी अंक १९६०, 'मोहिनी' दिवाळी अंक १९५९, 'नवल' दिवाळी अंक १९५९ याप्रमाणें प्रकाशित झालें.

# अनुक्रम


| | |
|---|---|
| गुर्द्याव : एक लोटांगण | १ |
| स्कूची गोष्ट | १५ |
| कातरवेळ : एक हरवणें | २८ |
| सिंह आणि उंदीर | ४० |
| अपचन आणि सामाजिक आशय | ४९ |
| ग्रामीण ष्टुरी : योक आभ्यास | ६३ |
| मेघदूतावर 'क्ष' किरण | ७३ |
| कांहीं शब्दांविषयीं अब्द अब्द | ८५ |
| बरवोदय जंमेलन | ९८ |
| गाडगीळ नियम | ११४ |
| सिंद्बादची आठवी सफर | १२६ |


◆ ◆ ◆

१

# गुर्घाव् : एक लोटांगण

परवां गुर्घांवांचं दर्शन झालं.

'मत्था टेकूं !' मी म्हणालों.

'चिरंजी कल्याण !' गुर्घांव म्हणाले.

गुरुदेव नुकतेच रशियांत जाऊन क्रुस्चावशीं हस्तांदोलन करून आले तेव्हांपासून आम्ही गुरुदेवांचे चेले त्यांना गुर्घांव म्हणतों.

'कोलकात्याहून आलों, कर्णावतीस चाललों' गुर्घांव म्हणाले. 'पांजर-पोळांतून आलों, नगरवाचनालयांत चाललों !' इतक्या सहज गुर्घांव आपल्या भारत-परिक्रमेबद्दल बोलत असतात.

'गुर्घांव, तें सर्व मंगलच आहे. पण निदान या स्थानकावर कांहीं चहापाणी तरी घ्याल कीं नाहीं ?' मी चरणस्पर्शपूर्वक पागालन केलें.

'चहा म्हणजे कषायपेयच ना ? भालो, भीषोण भालो.' गुर्घांव म्हणाले. ते नुकतेच कलकत्त्याला जाऊन आले होते. तेव्हां 'भीषोण' आणि 'भालो' याशिवाय कोणकोणतीं हत्यारें घेऊन त्यांची बंगाली माझ्यावर कोसळते याची मी वाटच पाहात राहिलों.

मी चहा आणायला सांगणार इतक्यांत गुर्घांव म्हणाले, 'No, no. वत्सा, आमी चहा खोबे ना. दूध खोबे. थोडें दूधच सांग माझ्याकरितां, आणि माझ्या रिक्षावाल्याला मात्र स[illegible] चहा. अरे हो, याचा परिचय करून द्यायचं राहिलंच बरं का ? Do you know him my boy ? You must know him my boy ! हा रामबाबू हो ! हाच माझं नेहमीं सारथ्य करतो इथं आल्यावर.'

मीं रामबाबूकडे वळून पाहिलें व उगाचच म्हटलें,

'ओह....How do you do ?'

त्याला नमस्कार करतांना लक्षांत आलें कीं, हा आमच्याच गल्लींतल्या स्टँडवरचा राम्या रिक्षा ड्रायव्हर. राम्या आपल्या शिटावरून हलला नाहीं. गुरुदेवांच्या बरोबर असल्यामुळें त्याला असल्या नमस्कारांची संवय झाली असावी.

'अत्योंत शुंदोर दूध मोशाय.' दुधाचा ग्लास रिकामा करीत गुर्ग्रांव म्हणाले.

बोलतां बोलतां त्यांनीं आपल्या शबनम पिशवींतला एक भला मोठा ठोकळा काढला. ( गुर्ग्रांवांशीं बोलतांना मात्र आम्ही त्यांच्या पुस्तकांना 'ग्रंथ' किंवा 'ग्रंथोत्तम' म्हणतों ) ठोकळा माझ्या हातांत देऊन गुर्ग्रांव म्हणाले,

'ही देखणी वस्तु पाहा'...वस्तु म्हणजे नेमकें काय हे गुर्ग्रांवांशीं बोलतांना कधींच नीट समजत नाहीं. वस्तु म्हणून त्यांनीं आम्हांला एकदां अक्षरशः डोळ्यांत बोट घातलें तरी दिसत नव्हतें अशी अंधारी रात्र, एकदां एक नक्षीदार कानपुरी जोडा आणि एकदां त्यांची एक म्हातारी काकी ( तिला ते 'फूफीजी' म्हणत ) या 'वस्तु' दाखविल्या होत्या.

'वाचलंस का हें ?' आपल्या पुस्तकाचें पहिलें पान उघडीत ते म्हणाले.

'माफ करा हं गुरुदेव. मी अजून तें पाहूं शकलों नाहीं.'

'काय ? पाहूं शकला नाहींस ? What a joke ! ही देखणी वस्तु पाहूं शकला नाहींस. माय डियर चाइल्ड ? तूं केवढं पाप करतो आहेस याची तुला कल्पना नाहीं—'अलीकडे गुरुदेवांचा फिरंगी भाषेचा व्यासंग हळूहळू वाढत असल्याचें मीं कांहीं शिष्यमंडळींकडून ऐकलें होतें त्याचा मला परत एकदां प्रत्यय आला.

गुरुदेवांनीं आपली कादंबरी मला दिली. आंत नुसतेंच 'मित्रोत्तम यांसी'... एवढेंच लिहून पुढें लिहिलें होतें,—गुर्. हा गुरुदेव याचा संक्षेप झाला. मित्रोत्तम पुढचें नांव अभिप्रायासाठीं द्यावयाच्या टीकाकाराचें. वेळ पडेल तसें तें घालायचें.

गुर्ग्रांवांचा अभिप्रायाच्या पुस्तकाबरोबर पाठवायचा एक वेगळा फॉर्मच आहे.

' मित्रोत्तम—यांसी : उत्तम । चांगला । बरा अभिप्राय लिहिण्यासाठीं पुस्तकवस्तु पाठवीत आहें. त्याप्रमाणें मी आपणांकडे अनुक्रमें येऊन त्रास देणार नाहीं । अधून मधून येईन । नेहमीं येत जाईन किंवा आपण मजकडे जेवायला यावें । चहाला यावें । येण्याची तसदी घेऊं नये. कुत्रें न्चावरें आहे.'

हें थोडें विषयांतर झालें.

' आशयाचें वजन नुसतें ग्रंथोत्तम हातांत घेतांच जाणवतें'....मी पुस्तक हातांत पेलत म्हणालों.

' जाणवावें. पण मोठमोठ्यांना जाणवत नाहीं याचा खेद होतो. त्यांचं जें काय तंत्राचं गिटपिट असतं तें मला समजत नाहीं माझ्या मुला. वाटलं, लिहिलं. हें आमचं तंत्र. पण तुला नुसत्या स्पर्शानं समजलं. My boy, तुझ्यासारखा शिष्य मिळणं हें माझं भाग्य समजतों मी. जुगजुग जियो बेटा. ' हां हां म्हणतां त्यांच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या. गुरुदेवांचें रडें हुकमी. परीटघडी रुमाल लगेच बाहेर काढून त्यांनीं आपले डोळे टिपले.

' आम्ही नर्मदेचीं बाळं ' ही गुरुदेवांची नवी कादंबरी मी चाळूं लागलों.

' हा तूं तिच्यावर अन्याय करतो आहेस बेटा. अशी दिव्य वस्तु उभ्या उभ्या चाळायची ? पण तसं कशाला. आपण असं करूं. आज मी येतों. जेवायलाच येतों. मग रात्रीं करूं वाचनाचा कार्यक्रम. पांचपन्नास जणांना बोलावून ठेव ऐकायला. जरा चांगल्यापैकीं असूं देत. कुठें कांहीं चांगलं लिहितील, बोलतील असे.'

रात्रीं गुर्घाव आले. उशीर करूनच आले. पण ते आले यांतच मला धन्य वाटलं. गुर्घाव नेहमींच कामांत असतात. लेखन तर चालूंच असतं सारखं. शिवाय एका लेखनांतून अनेक निर्माण होतात. गुरुदेवांनीं मागें एक लहानशी कथा बालगोपालांसाठीं लिहिली होती. नंतर त्याचीच त्यांनीं एक दीर्घकथा लिहिली. पुढें तीन खंडांत एक कादंबरी, पुढें याच कथानकावर आधारलेलें एक नाटक आणि त्याची रेडिओ-आवृत्ति त्यांनीं लिहिली. नंतर याच नाटकानं एका बोलपट कथेला जन्म दिला. मग गुर्घावांना असं वाटलं कीं, आपलीं पात्रं गाऊं लागलीं

आहेत. त्यांनीं पात्रांना मुक्तकंठानं गाऊं दिलं—आणि त्यांतून नाटकाचं झालं खंडकाव्य. ( एका गोपाळकथेचा अशा रीतीनें गोपाळकाला झाला असें एका छद्मी टीकाकारानं म्हटल्याचं मला आठवतं. ) हें खंडकाव्य मोरोपंती रामायणाप्रमाणं १०८ वेळां निरनिराळ्या प्रकारें कसं लिहितां येईल याविषयीं गुरुदेव एकदां फार उत्साहानं माझ्याजवळ बोलले होते. मनांत आणीन तर याच कादंबरीवरून आपण एक कुलवृत्तान्त, एक वनस्पतिशास्त्रावरचें पुस्तक आणि एक भूगोलाचें पुस्तक रचूं शकूं असंहि ते मला म्हणाले होते आणि मींहि मोठ्या उत्साहानें त्यांतून एक संबंध विनोदी कथासंग्रह कसा होईल याची कल्पना त्यांना दिली होती. गुरुदेवांचं हें संकल्पित लेखन ऐकून एका चांगल्यापैकीं प्रकाशकाला घेरी आली होती असें सांगतात. गुरुदेव त्याला धीर देऊन म्हणाले होते, ' असा कोमेजूं नकोस बेटा. तुझ्या दिलांतला दर्द मला कळतो. '

गुरुदेव आले तेव्हां कांहीं मंडळी जमली होती. कांहींना मी मुद्दाम घेऊन आलों होतों. यायला तयार नसतांनाहि. त्या अभाग्यांना काय माहीत कीं न येण्यांत ते केवढें पाप करून राहिले होते. मेळाव्यांत आमच्या शेजारच्या एक सामाजिक कार्यकर्त्याहि होत्या. गुरुदेवांच्या एका नाटकांत त्यांनीं मागें एकदां काम केलें होतें म्हणे. गुरुदेव येतांच त्यांनीं कोपरापासून हात जोडून सर्वांना नमस्कार केला. बोलतांना या कार्यकर्त्या म्हणाल्या,

' तुमचं पुस्तक मला दिलंत नाहीं कांहीं. मी किनई रागावलेंय तुमच्यावर. '

गुरुदेव प्रथम कांहींच बोलले नाहींत. मग स्वैंपाकघराकडे वळून ते म्हणाले,

' वहिनी, पाट मांड आणि एका तबकांत नीरांजन लावून आण. ' समाजसेविकाबाईंच्या प्रथम कांहीं लक्षांत येईना. पण जेव्हां त्यांनीं गुरुदेवांना ओवाळलं तेव्हां त्यांनीं आपलं पुस्तक तबकांत ओवाळणी म्हणून टाकलं.

मी हा हृदयस्पर्शी प्रसंग पाहात बाजूलाच उभा होतों. बाईंनीं जेव्हां गुरुदेवांना ओवाळलं तेव्हां तबकांतल्या नीरांजनाशिवाय चार नीरांजनें तेवत होतीं. दोन बाईंच्या डोळ्यांत आणि दोन गुरुदेवांच्या...असें आपलें मला वाटलें. पण माझा हा हिशेब कोट्यवधि नीरांजनांनीं चुकला असें

गुरुदेव नंतर म्हणाले. कारण त्यांनीं आपल्या बहिणीच्या डोळ्यांत त्या वेळीं लक्षकोटी नीरांजनें तेवतांना पाहिलीं होतीं......

वस्तु ( कादंबरी ) वाचनासाठीं एक लहानशी बैठक मीं तयार केली होती. मध्यभागीं एक लोड ठेवला होता. बाजूला तांब्या आणि पाण्याचा ग्लास. गुरुदेव येऊन लोडाला टेकून न बसतां वर बसले. खिशांतून एक रुमालाची घडी काढून ती त्यांनीं बाजूला ठेवली. बैठकींत एकदम गांभीर्य पसरलें. गुरुदेवांनीं दाढीमिशा राखल्या आहेत. त्यामुळें तर बैठकीला आणखीच गांभीर्य आणि वजन आलें.

गुरुदेव बोलूं लागले :

' गोष्टी ऐकायची आणि सांगायची मला फार आवड. अगदीं लहान-पणापासून. गोष्टीवेल्हाळपणांत आतांपर्यंतचा जन्म गेला. पुढचा जाईल. आजीनं मला लहानपणीं खूप गोष्टी ऐकवाव्या आणि मींहि मोठ्या उत्साहानें त्या ऐकाव्या. पुढें तर मी गोष्टी सांगायला लागलों आणि आजीला त्या ऐकायला लागल्या. गोष्टी ऐकतांना आजीनें कौतुकानं म्हणावं, ' कसं ग बाई माझं बाळ गोष्टी सांगत्येय. सूनबाई, याची दृष्ट काढून टाक हो...' अन् आईसुद्धां वात्सल्यानें म्हणायची, ' अग्गो बाई खरंच का ? ' आजी बरीक कधींकधीं रागावून म्हणायची, ' झाली मेल्याची टकळी सुरू. रांडेच्याच्या तोंडाला खीळ नाहीं कशी ती.'

आई-आजीचीं वाक्यं गुरुदेवांनीं त्यांच्यासारखे आवाज काढून म्हटलीं. नकला फार छान करतां येतात त्यांना. कलाकार झालों नसतों तर किमान-पक्षीं नकलाकार झालों असतों, असं ते विनोदानं कितीकदां माझ्याजवळ म्हणाले आहेत.

' आम्ही नर्मदेचीं बाळं ' ही एक कादंबरी आहे. गोष्ट साधी आहे. एका खेड्यांतील लोक एकत्र जमून एक ताल बांधतात त्याची ही गोष्ट. कादंबरींत पानं आहेत सहाशें. ( पुढच्या भागाचं नांव ' आम्ही शारदांचे बब्बा ) '.......या पहिल्या भागाच्या सहाशेंतलीं पांचशें पानं पार्श्वभूमि देण्यासाठीं वापरलीं आहेत. सुरुवात अगदीं पार मनूच्याहि मागें नेली आहे. ओढ्याची—किंवा आमच्या कोंकणांत याला पऱ्हा म्हणतात—सुरुवात ओंकारापासून. आश्चर्य अपरिचितांना नि अनभ्यस्तांना. ' पण माझ्या

कादंबरींत एकच आश्चर्य कधींहि नसतं.' तर एक तोळा ओंकार, दोन चमचे मनू, १ औंस रक्त, १० औंस अश्रू, नवटाक लोकगीतें, छटाक स्त्रीगीतें, एक खंडी भाकडकथा, ग्रामीण किस्से, चुटके, मला माहीत असलेले इंग्रजी, पंजाबी, बंगाली वाक्प्रचार व म्हणी इत्यादि सगळा मालमसाला मीं त्यांत ठासून भरला आहे. माझ्या परिक्रमेंतून मला कांहीं समजलं असेल तर तें हेंच कीं, जीवन हें फार विचित्र आहे, बहुरंगी आहे म्हणून ह्या कादंबरींत मीं हें सर्व आणलें. येत नव्हतें तिथें खेंचून आणलें. कादंबरीला इंग्रज बांधव जो शब्द वापरतात—नॉव्हेल कीं कायसा—तो मला फार उचित वाटतो.'

आणि हां हां म्हणतां गुर्द्यावांच्या डोळ्यांतून पाणी ठिबकूं लागलं. 'ओढ्यासंबंधीं लिहितांना ते इतके रडतात, तर समुद्रावर लिहितांना किती रडतील !'... परीटघडी रुमाल ओला झाला.

माझे कांहीं मित्र म्हणतात, 'तुझा गुर्द्याव हा प्लॅस्टिकचा माणूस आहे. एवढा कृत्रिम माणूस आम्हीं कुठंच पाहिला नाहीं.' पण प्लॅस्टिकच्या खेळण्याला कुणीं कधीं रडतांना पाहिलें आहे का ? कृत्रिमतेचा हा आक्षेप गुरुदेवांच्या अश्रूंनींच वाहून जातो.'

गुर्द्याव वाचूं लागले. वाचतांना गुर्द्याव नेहमींच एकतान होऊन जातात. वाचतांना ते गाऊं लागले. एक खेडूत आपल्यां रडणाऱ्या मुलीला म्हणतो,

एऽ शिंचे अरारा
बोंबलूं नग उगी ऱ्हा....

'ग्रामीण लोकगीतांचा किती प्रादेशिक उपयोग करून घेतला आहेत आपण !' एका भारावलेल्या श्रोत्यानें जांभई देत म्हटलें.

गुर्द्याव प्रथम निःशब्द झाले. पण नंतर म्हणाले, 'तुमचं तें तंत्राचं पटर-पटर मला समजत नाहीं हं. पण खरं सांगूं ? ही प्रादेशिकता तुम्हांला शस्दांमध्येंसुद्धां आढळणार नाहीं....खीक् खीक् खीक्...' गुर्द्याव फार खुषींत आले म्हणजे खीक्दिशीं हंसतात.

पुढें गांवच्या एका पुढाऱ्याचें वर्णन करतांनासुद्धां गुर्द्यावांनीं तें सरळ न करतां एका लोकगीताचाच आश्रय घेतला होता.

**अगडं बंबं, देह प्रचण्डम्**
**नेहरू शर्टम्, वर बंडिम्**
**ढोळी टोपिम्, खादी चड्डिम्**
**पायी खडावां...खडडड खड्डम्**

' छे छे ! शरदांनीं तर लोकगीतांचा उपयोग कुठेंच इतक्या परिणामकारकपणें केलेला दिसत नाहीं. आणि हें शब्दचित्रहि किती रेखीव वाटे नाहीं ! ' आणखी एक ( झोपेनं ) भारावलेला ' किरटिक ' म्हणाला आणि पलीकडच्या खोलींत दिसेनासा झाला. वेळेचा नीटसा अंदाज नसल्यामुळें मीं पलीकडच्या खोलींत रसिकांच्या झोपेचीहि व्यवस्था अगोदरच करून ठेवली होती.

गुर्यांव कांहीं बोलले नाहींत. मग शांतपणें म्हणाले,

' कसं अगदीं बुजुर्गासारखं बोललांत तुम्ही. नुसतं असं बोलतां यायलासुद्धां प्रतिभेची परशादी लागते बरं....' गुर्यांव परत एकदां सद्‌गदित झाले.

' आतां ताल किंवा बंधारा बांधणं यांत नाट्य कुठं आहे ? परंतु मला त्यांत काव्यहि दिसलं, नाट्यहि दिसलं, जीवन दिसलं, आशय दिसला... जलाशय नव्हे बरं का '...खुककन् हंसून गुर्यांव म्हणाले.

' शिवाय या कादंबरींत एक प्रकारची अलिप्तता आहे. कोणींसं म्हटलं आहे कीं, ' पाण्यांत उभं राहून कोरडं राहण्याची ताकद प्रतिभावंत लेखकांत पाहिजे...पाणी हा माझा विषय असून मी या कादंबरींत किती आमूलाग्र कोरडा राहिलों आहें !' पण तें तुम्हीं वाचूनच पाहा.'

' गच्चीवरचा सदा ' या तुमच्या कादंबरींत केवढा जीव घेणारा कोरडेपणा आणला होतांत तुम्हीं गुर्यांव ! ' मी म्हणालों ( अन् नंतर पस्तावलों. कारण गुर्यांवांच्या भाषणाचा ओघ बदलून एकदम त्यांच्या जुन्या कादंबऱ्यांवरून तो वहायला लागला )...

' छे छे, तूं अगदीं बोलूं नकोस. तो कोरडेपणा परत जमणं कठीण आहे. आतां ' गच्चीवरच्या सदां 'तली गोदावरी घ्या. मीं म्हटलं असतं तर गोदू माझी झाली असती...'

....आणि गुर्यांवांच्या डोळ्यांतून गंगायमुना सुरू झाल्या.

'गगनवावड्याचा झेंडू' मधल्या पारूबद्दल असंच म्हणाला होतांत गुरुदेव आपण.'

'होय, पारूचंहि असंच...पारू...पाऽऽरूऽऽऽ' गुर्यांवांचा स्वर या वेळीं फार जड झाला.।दाढी, मिशा, केस यामुळें गुरुदेवांच्या चेहऱ्यावरचे भाव नेहमींच लक्षांत येतात असं नाहीं. पण या वेळीं मला त्यांचा प्रत्यय आला.

रात्र आणि झोंप दोन्ही चढूं लागल्या होत्या तरी गुरुदेवांचें वाचन अखंडपणें चाललें होतें.

ताल बांधण्याला गांवांतल्या कांहीं लोकांचा अर्थातच विरोध होता. हा विरोध प्रेमाच्या पार्श्वभूमीवर फार खुलून दिसला.

एक प्रसंग ऐका—

◎

थोड्या वेळानं धोंडू उठून बसला.

'दगडे, कां रडतेस?'

पण धोंडूची धर्मपत्नी दगडी कांहींच बोलली नाहीं. ती स्फुंदतच राहिली.

'भारतमातेच्या सुपुत्रींच्या अश्रुजलाचींच धरणं बांधलीं तर ही भूमि सुजलां सुफलां व्हायला कांहींच समय लागणार नाहीं.' आणि बाहेरच्या गडद अंधारांत न दिसणाऱ्या पऱ्हामायकडे धोंडू गवाक्षांतून पाहात राहिला.

त्याचें तें कधींच न समजणारें बोलणें ऐकून दगडीलासुद्धां पाझर फुटला. ती म्हणाली,

'स्वामी, रडण्यापल्याड मला काय करतां येणार? मला तुम्ही काय बोलतां आहांत हें कांहींसुद्धां कळत नाहीं नाथ. पण माझा तुमच्यावर विश्वास आहे...'

दगडीला घट्ट आलिंगून धोंडू म्हणाला,

'दगडे, मीं जें महान् खंडकाव्य लिहायला घेतलंय् त्यामुळें तुलाहि पाझर फुटला. आतां सह्याद्रीच्या कड्यासारखीं मनं असलेल्या आपल्या गांवकींतल्या लोकांच्या मनांनाहि पाझर फुटायला काय अवकाश? दगडे, तुझ्यासारखी सहधर्मचारिणी मला भेटली हें माझं परमभाग्य!'

ब याच वेळानं त्यानं तिला दूर ढकललं व म्हटलं,
'पण दगडालाहि हृदय असतं प्रिये...'
'मग मला तें द्या'...दगडीनें कोटी केली.
'अन् मग मला या जीवनपरिक्रमेंत साथ करशील ना सह्यपुत्री?'
'निःसंशय.......'
'पायांत चपल्या असतांना...नसतांना....'
'तुमच्या कीं माझ्या?' दगडी म्हणाली.
'दुःखांत...सुखांत...'
'उन्हाळ्यांत, पावसाळ्यांत, हिंवाळ्यांत...'
'जानेवारींत....'
'फेब्रुवारींत....'
'मार्चांत...'
'मेंत...'
'एप्रिल विसरलीस दगडे?'
'मला इंग्रजी महिनेच आठवत नाहींत मेले.'
'श्रद्धा जाणती आणि डोळस पाहिजे दगडे...छत्रीसकट येशील?'
'छत्रीशिवायसुद्धां. छत्री काय करायची गडे?'
'आशा असतांना.'
'नसतांना.'
'खरंच...'
'अगदीं खर्र्र्र्ंच....'
'काय दगडे, खर्र्र्र्ंच...'
'होय...खर्र्र्र्र्ंच...'

●

हें....आणखी कितीतरी

खरें तर सगळें मूळ वस्तूंतच वाचायला हवें. मूळ ओढ्यांतल्या पाण्याचा एक पुरता थेंबसुद्धां यांत नाहीं....

'हिरव्या खोल जलाशयांत बुडी मारायला आणि जीवन संशोधन करायला गुर्यांवांसारखी आगळी तळस्पर्शी झेप लागते.' मीं प्रख्यात

टीकाकार टी. बी. शिवाशिव यांचे दुसऱ्या एका संदर्भांतले उद्‌गार काढले.

'गांवऱ्या वळ्यांत उडी ठोकायची म्हंजे टकुरंच फोडून घ्यायचं. वळ्यांत गुडघाभरबी पानी न्हाई...' शंकासुराच्या टीकेचा एक विरोधी सूर उमटला.

'ध्वन्यर्थानं बोलतोय तो...' गुर्ह्यावांनीं शंकानिरसन केलं.

'कसं लिहूं शकतां हो तुम्ही इतकं छ्छान आणि गूऽऽढ...' समाजसेविका ताई म्हणाल्या.

'आम्ही कसलं लिहितों? पऱ्ह्या मायची कृपा आहे ही ताई...' गुर्ह्याव ताईकडे पाहात म्हणाले.

'संवाद फार आशयघन आणि टोकदार झाले आहेत.' एका पाणबुड्या आशयसंशोधकानें सांगितलें.

'कादंबरीचं नाटक करावं असं गुर्ह्यावांच्या मनांत घोळतंच आहे...' मी म्हणालों.

'आणि चित्रपटसुद्धां...' गुर्ह्याव म्हणाले.

'एकादा वग पन हानून घ्या कीं!' मगाचच्या ग्रामीण विरोधकानें तुंबा हाणला.

पण गुर्ह्याव टीकेनें कधींच हलत नाहींत. टीकेचा परिणाम तुझ्या या गुरुदेवावर कांहींच होत नाहीं, असे माझे मित्र मला म्हणतात. पण उत्स्फूर्त वाङ्मयावर कोणीं अशी टीका कधीं केली आहे का? शरदांच्यावर तरी कोणीं केली आहे अशी टीका? टीका करायची असते ती आजकालच्या उबविल्या जाणाऱ्या कथा-कादंबऱ्यांवर....

धोंडू ओव्हरसिअरची नोकरी लाथाडून ताल बांधण्याचें काम हातांत घेतो तेव्हांचा प्रसंग तर गुर्ह्यावांनीं अश्रूंनींच लिहिला आहे असं वाटलं.

●

'मीं नोकरी स्वीकारायची नाहीं असं ठरवलंय माँ...'

'कारं भाड्या, डोस्कंबिस्कं फिरलं कीं काय तुझं? येवढी सोन्यासारखी चाकरी नग म्हन्तोस!' धोंडूचा बाप बाळासाब आंत येत म्हणाला.

'तुमचा राग मला समजूं शकतो, पिताजी. पण मला नमूची हांक साऽरखी ऐकूं येते. बब्बा आणि माताजी, मी तुमचा असलों तरी नमूचाहि आहें...

२००२९ वा. वा. २२०९ ३-७-६

‘ ही कोन नमू काढलीस गा ? कोन हाय ही सटवी ? आन् या दगडीशीं मंग कशापायी लगीन केलंस रं भाड्या...’

‘शांत हो माँ. नमू म्हणजे नर्मदामाई, गंगामैय्या. तुमची आमची सर्वांची जीवनदात्री. आपण सर्व नर्मदेचीं बाळं....नमूभैय्याचीं बच्चा म्हणवून घ्यायला मला अभिमान वाटतो. अभिमानानं ऊर भरून येतो... इतका कीं माँ, कोयनाच काय, भाकड्यासारखं धरणसुद्धां या अभिमानाला, उचंबळणाऱ्या या प्रेमाला बांध घालूं शकणार नाहीं.’ धोंडू लोट्यानें गटागटा पाणी पीत बोलून कोरडा झालेला घसा ओला करीत म्हणाला.

‘ ह्ये मॉम् आन् पॉम् आन् बब्बा काय लावलयास रे पोरा ? ओरशीर झाल्यापास्नं धड बोलतां बी ईना झालंय गड्या तुला....निव्वळ नर्मदेंतला गोटा हायेस. मला काय बी सौंशय ऱ्हायला न्हाई...’

‘ किती बरोबर बोललांत तुम्ही बब्बा. खरोखरच मी नर्मदेंतला गोटा आहें. ’ अन् मग दूर क्षितिजाकडे दृष्टि लावीत तो म्हणाला,

‘पण या दगडांतून, या गोट्यांतून देवाची मूर्ति घडविण्याची शक्ति नर्मदा-मैय्याच्या हातांत आहे माँ...’ असं म्हणून धोंडू तडक उठला आणि दगडी-कडे एक सजल कटाक्ष टाकीत तो तडक गांवच्या ओढा मैय्याकडे निघाला.

आणि दगडीहि त्याच्या मागोमाग निघाली.

‘ तूं कुठं निघालीस ग बये ? ’ धोंडूची ‘ माँ ’ कडाडली.

‘ ते जातील तिथं माँ. जिथं प्रकाश तिथंच छायेनं गेलं पाहिजे माँ.’

‘ ह्ये काय माँ आन् भाँ लावलया तुमी मगाधरनं. तुझं डोस्कंबी पाक बिघडलेलं दिसतंया बिटियारानी. अग सोने, पण तूं काय नुसती प्रकाशा-वरच जगणार आहेस का ? ’ धोंडूचा मोठा भाऊ खंडू म्हणाला.

‘ होय देवरजी. पाण्यावर जगणार आणि प्रकाशाकडे पाहात जाणार... ठेचकाळत, धडपडत, पडत...’

असें बाणेदार उत्तर देऊन ती माता नर्मदेची पुत्री धोंडूच्या मागोमाग पळत सुटली.

●

‘ व्वाः ! काय बहारदार संवाद लिहिले आहेत तुम्हीं गुर्यांव....मोठं नांव तुम्हांला या कादंबरीनं मिळणार बरं का ! ’

गुरुदेवांच्या चेहऱ्यावर एकदम एक विषण्ण काळी छाया आली. त्यांच्या दाढीमिशा जास्तच कृष्णवर्णी दिसूं लागल्या. अगदीं हलक्या आवाजांत ते माझ्या कानाशीं पुटपुटले,

'तेवढी जाण कुठं राहिलीय आजकाल बाळा! मी आतां पॉप्युलर लेखक राहिलों नाहीं....' त्यांनीं एक प्रदीर्घ निःश्वास टाकला.

आणि मीहि केशरी दूध आणण्यासाठीं आंत गेलों.

एव्हांना सगळे श्रोते उठून गेले होते. गुर्व्यांव आणि मीच काय ते उरलों होतों.

केशरी दुधाचा एक मोठा घुटका गिळीत गुर्व्यांव म्हणाले,

'आजकाल लोक वाचन ऐकायलाहि जमत नाहींत. ज्ञानेशाच्या मऱ्हाटीच्या भवितव्याबद्दल काळजी वाटते बेटा...'

'होय, परवांच कोणींतरी तुमच्या कादंबरीबद्दल लिहिल्याचं वाचलं. तालीवरची कादंबरी पण बेताल आहे म्हणे. त्यांत तालच नाहीं कुठं....'

'तूं लक्षच देऊं नयेस तिकडं. अगदीं बेतोल लिहिलं आहे तें सगळं....' मग एक दीर्घ निःश्वास टाकून गुर्व्यांव म्हणाले, 'शरदांच्या बाबतींत तरी वेगळं काय झालं?'

गुर्व्यांवांचा निरुत्साह थोडाच वेळ टिकला.

'तुला मी आणखी एक वस्तु वाचून दाखवतों. निव्वळ काव्य. ताल बांधून झाल्यावर मुख्यमंत्री येतात तेव्हांचा सीन....'

उरलेली कॉफी मी एका घोटांत प्यायलों आणि ऐकूं लागलों. झोपेचा अंमल माझ्यावरहि चालूं लागला होता.

गुर्व्यांव वाचूं लागले :

मुख्यमंत्री आले. त्यांच्याबरोबर संत्रीहि आले. त्यांचा सगळा लवाजमाहि आला.

पऱ्ह्या दिसतांच मुख्यमंत्र्यांचीं पावलं भराभर पडूं लागलीं. ते जवळ जवळ उड्या मारीतच तिकडे गेले. त्यांच्याबरोबर उड्या मारण्याचा प्रयत्न करतांना एक सचिव खालींसुद्धां पडले.

पण मुख्यमंत्री थांबले नाहींत...

तालीकडे पाहात ते आनंदातिशयानें उद्गारले,

'Oh boy! who done it?'

धोंड्रू पुढं होऊन साभिमान उद्गारला,

'I dood it, Sir....'

'Oh dear dear, what a job!' मुख्यमंत्री टाळ्या वाजवून म्हणाले. मुख्यमंत्री नेहमीं भाषणं करतात त्यामुळें टाळ्या दुसरे लोक वाजवितात आणि त्यांना स्वतःला टाळ्या वाजवायची संधीच मिळत नाहीं.

तालीकडे आणि पऱ्ह्याकडे पाहतां पाहतां मुख्यमंत्री भारावून गेले. आणि ते कशामुळें भारावून गेले असतील याचा विचार करतां करतां इतर सगळे भारावून गेले.

शेवटीं सिगारेट पेटवत ते म्हणाले.

'Do you smoke my boy?'

'Nope. Not me..' धोंड्रू उद्गारला.

धूम्रवलयें सोडीत मुख्यमंत्री परत एकदां गंभीरपणें म्हणाले,

'प्रत्येक ओव्हरसिअर फर्डिनंड डी लेसेप्स होत नाहीं....'

आणि मग ते मागें वळले आणि भराभरा हेलिकॉप्टरच्या दिशेनें चालायला लागले.

जातांना त्यांच्याबरोबरच्या प्रत्येकानें धोंड्रूला तेंच बजावलं....' प्रत्येक ओव्हरसिअर डी लेसेप्स होत नाहीं—'

मुख्यमंत्र्यांच्या हेलिकॉप्टरचा आवाज येईनासा झाला. पऱ्ह्यांतून वाहणाऱ्या पाण्याचा झुळ....झुळ...झुळ...झुळ असा आवाजच काय तो येत राहिला.

अन् मग एकाएकीं कसली तरी स्फूर्ति येऊन तो गाऊं लागला...

'ए शिंचे अरारा....'

●

'गुर्द्यांव, तुम्हीं अगदीं कमाल केलीत हां. अन् विशेषतः तें टाळ्यांबद्दलचं निरीक्षण अगदीं ओरिजिनल वाटलं मला...' मी उठतच म्हणालों. कारण मी आणखी ऐकत बसतों तर गुर्द्यांवांच्या मांडीवर डोकें टेकून झोंपायची वेळ आली असती.

गुर्वांवहि मोठे समंजस. तेहि उठले आणि म्हणाले,

' चाललों...'

' कुठं ? ' मीं उगाचच कांहींतरी विचारायचं म्हणून म्हटलं.

' भिलाई माउलीला चाललों. माझ्या पोलादावरच्या कादंबरीचं गव्हर्नरमाउली प्रकाशन करणार आहेत...'

' मग आतां निघाच गुरुमाउली. नाहीं तर एस. टी. माउली मिळणार नाहीं....'

गुरुदेवांनीं माझ्या खांद्यावर हात ठेवला.

जातां जातां ते म्हणाले,

' शिष्योत्तमा, मला लवकरच भारतमैय्यांतील सर्व धरणं आणि कारखाने पाहण्यासाठीं सरकारी शिष्यवृत्ति मिळते आहे....'

' मग या सगळ्यावर लिहिणारहि असाल ?' मीं घाबरत घाबरत विचारलें.

' अर्थातच बेटा. कथा, कादंबऱ्या, नाटकं सर्व कांहीं. अन् तेंहि प्रत्येकावर...'

माझे तोंडी हिशेब चांगले नाहींत. पण गुर्वांव असं म्हणतांच भारताचा नकाशा आणि त्यांतील सर्व धरणें आणि कारखाने यांचे आंकडे माझ्या डोळ्यांसमोर नाचूं लागले...आणि....आणि......

पुढें काय झालें हें मला आठवत नाहीं.

....कारण त्या हिशेबाचें भयंकर उत्तर लक्षांत येतांच मी झीट येऊन धरणीमायवर पडलों.

◎ ◎ ◎

२

# स्क्रूची गोष्ट

माण नांवाचा जो एक छानदार देश महाराष्ट्र राज्यांत आहे त्या देशांत वाकडेवाडी नांवाचें एक अप्रतिम गांव आहे. वाकडेवाडीला अजून एष्टी जात नाहीं, या गांवाला स्वतःचें पोष्ट हपीस नाहीं. एवढेंच काय, या छानदार गांवांत एखादी शाळासुद्धां नाहीं. म्हणजे पूर्वीं होती, पण गांवाच्या निवान्त प्रकृतीला शिक्षणाचा नसता उपद्व्याप आणि उत्तम वेळेचा अपव्यय करणें मानवलं नाहीं. त्यामुळें येथील शाळा हळूहळू बंद पडली. म्हणजे वाकडेवाडीच्या पाटलांनींच एकदां स्वतःच्या हातानें शाळेच्या दाराला भलेमोठें कुलूप लावून टाकलें. मास्तरांची दुसऱ्या गांवाला बदली झाली आणि गांवांतल्या बाळगोपाळांना मनसोक्त हुंदडण्याची संधि मिळाली. वाडीला सुदैवानें विकास योजनेचें गालबोटसुद्धां लागलेलें नाहीं. गांवामध्यें दीडशहाणीं व अतिशहाणीं माणसें खूप. पण उभ्या वाकडेवाडींत शहाणा माणूस एकसुद्धां शोधून सांपडावयाचा नाहीं. तिथें पार, चावडी, देऊळ, पाणवठा इत्यादि नामांकित ठिकाणें अर्थातच आहेत. गप्पाटप्पांना फार छान.

यामुळें हें गांव फार सुखी आहे. गांवांतले लोक सकाळीं सावकाश अंगावर उन्हं आल्यावर उठतात. भराभरा तोंड धुतात. आंघोळ केल्यास करतात, नाहीं तर नाहीं. चहा बरीक शांतपणें भुरकून, चवीनें पितात आणि मग मात्र लोक कांहीं कामें करीत नाहींत. निवान्तपणें गप्पाटप्पा करायला सुरुवात होते. ठिकठिकाणीं मंडळी जमतात, पानतंबाखूच्या पिशव्या सुटतात, सामुदायिक पानतंबाखूचा कार्यक्रम होतो. पानें छानदार रंगतात, तंबाखू दाढेला धरला जातो आणि संभाषणाला रंग चढतो. जे तंबाखू खात नाहींत असे लोक तंबाखू ओढतात. विड्यांचीं बंडलेंच्या बंडलें

येथें फस्त होतात आणि त्यामुळेंहि गप्पाटप्पा छान चढतात. कामाबिमाची गडबड या गांवकऱ्यांना कांहींच नसते. फक्त दुपारीं जेवण्याचेंच काय तें काम असतें. त्यामुळें सगळीकडे निवान्तपणें गप्पांचा कार्यक्रम येथें चाललेला असतो. जेवणाचें काम एकदां घाईघाईनें उरकलें कीं परत नेहमींच्या कार्यक्रमाला मोकळीक होते. आणि मग हें काम संध्याकाळपर्यंत चालतें. रात्रीच्या जेवणाची कांहीं लोकांनाच शुद्ध असते. पण बहुतेकांचीं पोटें गप्पांमुळें भरलेलीं असतात. त्यामुळें रात्रीं गप्पा मारतां मारतां जेव्हां त्यांचा डोळा लागतो तेव्हां असतील त्या ठिकाणीं आडवे होऊन तिथेंच तीं गडद झोंपतात. दिवसभर पानतंबाखू चघळल्यामुळें, पिचकाऱ्या हाणल्यामुळें, वचावचा बोलल्यामुळें, साऱख्या शिव्या दिल्यामुळें बिचारे फार दमले भागलेले असतात त्यामुळें त्यांना अशी छान, शांत झोंप लागते ! इतकें सुखी लोकांचें गांव महाराष्ट्रांतच काय उभ्या हिंदुस्थानांतसुद्धां कुठें सांपडायचें नाहीं. कुणींहि हेवा करावा असें या गांवाचें अलौकिक भाग्य आहे.

पण एकदां या गांवावर फार मोठें संकट आलें...

●

एकदां कुणीतरी माणूस वाट चुकला आणि तो बरोबर वाकडेवाडीलाच आला. बरें आला तर ठीक, पण तो सरळ आला का ? छे: ! या मूर्खानें येतांना बरोबर एक मासिक आणलें. आतां ज्या गांवांत नुसतें रोजचें वर्तमानपत्र येत नसे त्या गांवांत हा मासिकाचा रोग त्यानें कां आणावा ? पण शहराकडच्या लोकांना एकंदर अक्कल कमी हेंच खरें. पाहुण्याच्या हातांतलें छापील पुस्तक पाहतांच गांवांतल्या लोकांच्यामध्यें मोठाच कालवा उडाला. पांचपन्नास रिकामटेकडे लोक तिथें जमले. पाव्हण्याला चावडीवर पाटलाकडे घेऊन गेले. चावडीवर नेहमींप्रमाणें गप्पांचा कार्यक्रम चालू होताच. बरेच गांवकरी तेथेंहि जमले होते. पाटीलबुवांनीं पाव्हण्यांच्या हातांतलें छापील पुस्तक पहिल्यापासून शेवटपर्यंत चाळलें. पाटलांना अर्थात् वाचतां येत नव्हतें. त्यामुळें त्यांनीं पाव्हण्यांनाच तें मासिक वाचून दाखवायला सांगितलें. चार बुकं शिकलेल्या देसायांच्या बाळासाबाशिवाय सबंध गांवांत कुणालाच वाचतां येत नव्हतें.

पाव्हण्यानें पाटलांचें म्हणणें ऐकलें, पण बेटा गुमान बसूनच राहिला. वाचायला सुरुवातच करीना. पाटलानें त्याला प्रथम गूळपाणी आणि नंतर चहा दिला. जेवायला खायला घातलं, पण पाव्हणा मासिक वाचायला कबूल झाला नाहीं. पाटलांनीं त्याला पानतंबाखू दिली. पण ती मात्र त्यानें घेतली नाहीं. उदासवाणा बेटा बसून राहिला. सगळ्यांनीं त्याची खूप मनधरणी केली, गयावयासुद्धां केली आणि शेवटीं शिव्या पण दिल्या. मग एकदांचें पाव्हण्यानें तोंड उघडलें.

" पाटील, हें माशिक वाचून दाखवायला मला कांहीं भ्या न्हाई. पन तुमालाच समदं वाईट लागल पघा..."

" वा पावनं. आनि म्हनून तुमी वाचत न्हवतां? अवो, तुमी येडे का खुळे? खुश्शाल वाचा राव. आमाला कायबी जाळ यायचा न्हाई च्या बायली. हं वाचा पठे..." पाटील भिंतीला टेकत आणि तंबाखूची पिशवी सोडीत म्हणाले.

" आमी वाचायचं आन् मग तुमी उगा..." पाव्हणा चांचरत बोलला.

" आमी कायबी बोंबलत न्हाई. आगदीं खंडोबाची आन्..." पाटील-बुवा मांडी कराकरा खाजवीत बोलले.

" सुटली म्हना..."

" सुटली. पन आतां उगा टाइम कशाला बिगाडतां. सोडा तुमची गाडी एक्स्प्रेस..." पाटीलबुवांनीं तंबाखूची चिमूट तोंडांत टाकली.

" आमची कायबी काळजी करूं नगा तुम्ही...." शिदा चांभार पचाकन् थुंकत बोलला. कानकोरण्यानें दांत कोरीत अप्पाराया अण्णा हेंच म्हणाले. आणि मोठ्या अधिकारी माणसाला शोभेल अशी छानदार शिवी त्यांनीं हांसडली.

दत्तू पैलवान, व्यंका वडार, नाना न्हावी, कोंडिबा गायकवाड, नागू गवळी सगळ्यांनींच मोठा आग्रह चालवला. लहानथोर सर्वांनींच मोठा कालवा केला.

आणि मग पाव्हण्याचा नाइलाज झाला.

त्यानें ग्रामीण जीवनावरचा पहिलाच लेख वाचायला सुरुवात केली. सगळी चावडी चित्रासारखी तटस्थ होऊन ऐकत राहिली. कृष्णाच्या

लीलांची कथा ऐकतांना किंवा गंगी जुन्नरकरणीचा तमाशा पाहतांना बसत असे तशी बसली.

लेख ऐकतांऐकतां सगळे लोक बेचैन होऊन गेले. दत्तूला पान खाय सुचेना झालं. व्यंकाला इडी ओढाय सुचेना झालं. कोणाला कायबी सुधरेना झालं.

लेख वाचून झाला तशी पाव्हणा उठला आणि चालाया लागला. एक चकार शब्द बोलला नाहीं. पाव्हणा गेला, गेला आणि पार दिसेनासा झाला. त्यांच्या अंगावर ओरडणारीं गांवांतलीं बेवारशी कुत्रींसुद्धां ओरडून ओरडून कंटाळलीं आणि थांबलीं.

तरी चावडीवर स्मशानशांतता होती. कुणी माणूस मेल्यागत सगळे गुमान बसून राहिले होते.

शेवटीं पाटलांनींच तोंड उघडलें. भिंतीला टेकून आढ्याकडे पाहात बसलेल्या देसायांच्या बाळाकडे पाहात ते बोलले,

"बाळासाब, तुमी आइकलं न्हवं ? आतां सांगा समद्यास्नी समजावून.."

बाळासाब प्रथम कांहीं बोलला नाहीं. त्यानं आपल्या शिक्षणाची निशाणी असलेली चाळिशी काढली आणि तिचीं भिंगें व्यवस्थित पुसलीं. मग तो परत नीट भिंतीला टेकला आणि पूर्ववत् आढ्याकडे पाहात म्हणाला,

' पुन्याकड एक किरटिक हायेत. त्येंचं असं म्हननं कीं आपलं गांवाकडचं गाडं पाक बिघडलंया...." बाळासाब पूर्वीपेक्षां जास्तच गंभीर झाला होता.

" आरं बाळासाहेबा, त्ये त आमीं आइकलंच समदं. पन आतां काय कराय पायजे त्ये जरा ठरवाय होवं हा आमचा पाइंट..." शिदा चांभार डोळे मिटत म्हणाला.

" काय मिष्टिक आसल तीं दुरुस्त करून घ्यायला पायजे. " दोन बुकं शिकल्यावर मास्तरलाच ज्यानं अक्कल शिकवली होती तो व्यंका वडार म्हणाला.

" इथंच तुम्ही चुकतां आन् त्या ' टी. बी. शिवशिवना ' आसलं लिहावं लागतं " बाळासाब म्हणाला. " आतां मी काय सांगतों तें नीट ऐका. आपल्याला ही वाकडेवाडी सुधरायची हाय का न्हाई ?..."

" आतां ह्ये काय इचारनं झालं बाळासाब ! आरं, नव्या म्हाराष्ट्रांत वांकडेवाडी समद्यांच्या एक पाऊल फुडं पाह्यजे...." पाटीलबुवांनींहि बराचसा गंभीरपणा ओढून ताणून आणला आणि आपला तंबाखूच्या पिशवीकडे जाणारा हात मोठ्या कष्टानं आंवरला.

" वाकडेवाडीला सरळ रस्त्यावर आणायचं आसल तर घा ठराव कराय पायजेत. तुमाला कबूल आसल तर पुढच्या गोष्टी..." बाळासाब म्हणाला.

" आतां कां रं बाबा तानून धरतोयस गड्या ? हान गाडी. हां !" पाटीलबुवा बाळासाहेबाच्या स्वस्थपणामुळें अगदीं घाईला आले होते.

" सांगतों. ऐका. पहिला ठराव म्हंजे कुनीबी, कंदीबी, कुनालाबी 'श्या' द्यायच्या न्हाईंत...प्रान गेला तरी द्यायच्या न्हाईंत......"

" आरं तिच्या बा..." इतकंच बोलून दत्तू पैलवानानं जीभ चावली....

" काय काय म्हन्तोस तूं दत्तू ? "...बाळासाब म्हणाला.

" न्हाई, मी इतकंच म्हन्तो...म्हंजे माझं म्हननं इतकंच कीं श्या द्यायच्या नाहींत."

" माझं आसं म्हननं कीं, श्या द्यायच्या न्हाईंत तर मग कसं सुधरायचं गा ? " अप्पाराया अण्णानं विचारलं.

" श्या द्यायच्या नाहींत तर नांव घ्या इट्टलाचं. त्यामंदी काय वाईट न्हाई. श्या देऊन कांहीं बायका आन् प्वारं सुखी होत न्हाईंत. इट्टलाचं नांव घेतलं तर त्यो तरी पावल !" बाळासाहेबानें स्पष्टीकरण केलं.

" हें तुझं आरगुमेंट आम्हांला एकदम पटलं गड्या..." पाटीलबुवा म्हणाले.

" एकदम म्हंजे काय आगदीं अर्जेंट पटलं. आतां त्यामंदी कायबी डाउट न्हायला नाहीं." व्यंका वडारानेंहि आपला होकार भरला.

" त्ये काय न्हाई बाळासाब, येक ठरावच मांडून टाका समदे. एकदम कांक्रिट कामच करून टाकूं समदं. हां फस्कल्लास...." नाना न्हाव्यानें पण आपली अक्कल वस्तऱ्यागत पाजळली.

" पहिला ठराव करायचा म्हंजे दुसरा मोडायचा आसं तर तुमचं म्हननं न्हाई ? " बाळासाब मोठ्या आवाजांत बोलला. तो नाराज झाल्यागत दिसत होता.

" आरं पण आसं काय झालं गा ? इक्तं रागावतुस कशापायीं ह्येंच समजेना झालंय मला. " अप्पाराया अण्णा म्हणाला.

" म्हंजे दुसरा ठराव असा हाय कीं, विंग्रजी शब्द वापरायचे न्हाईत आन् तुमी समद्यांनीं ते शब्द वापरून कार केलाय्. कसं जमावं आपल्याला ह्ये समदं... " बाळासाब काळजीच्या सुरांत म्हणाला.

" आरं हून जाऊं द्या मर्दा. विंग्रजी शब्दावांचून काय बी आडत न्हाई. च्या बायलीला काय हाय त्या शब्दांमंदी..." पाटील म्हणाले.

" पाहा पाहा, ह्येच मघापून सांगून ऱ्हायलों. आतां दुसरा ठराव पाळला तर पहिला मोडला. ह्ये कसं जमावं ? " बाळासाब निराश झाला.

" त्ये चुकलंच कीं रं बाळासाब. पन तूं आगदीं बिनघोरं आस. आतां श्याबी न्हाईत आन् विंग्रजी शब्द पण न्हाईत..." पाटलांनीं आश्वासन दिलं.

" आतां तिसरा ठराव. पान-तंबाखू खायची न्हाई..."

" आन् बिडी ? " यंकू वडारानें शंकेचें बोट वर केलें.

" बिडी पन वढायची न्हाई..."

" आतां ह्ये कसं करून चालल बा ? " यंकानें विचारलें.

" कां ? त्यामंदी काय कठिन हाय् ? "

" आतां त्या भिकुसा-यमासाच्या बंडलावरच लिहिलंय् नव्ह कां लंगर छाप बिड्या वढाच." यंकानें आपल्या खिशांतून बिड्यांचें बंडल काढून बाळासाहेबांसमोर धरलें.

" तिथं कायबी लिहिल्यालं असूं द्या. हे ' शिवशिव ' म्हनत्यात बिड्या वढायच्या न्हाईत. न्हाईत म्हंजे न्हाईत. कसं ? "

" ह्ये भलतंच आडिट काढलंया कीं ह्या शेरच्या पाव्हण्यांनीं ! "

" हां. त्यांना पाव्हणे म्हनू नगा. मोठ्ठे लेखक हायेत त्ये...." बाळासाहेबानें जोरांत सांगितलें, " आन् ह्यो आडिट शब्द कशापायीं वापरला तुमी ? आला का विंग्रजी शब्द, आन् मोडला कां नियम ? "

" बरं बाबा आमचं न्हायलं. आतां सांगा म्होरं..." व्यंका नाकांत तपकिरीची चिमूट कोंबीत बोलला...

" तंबाखू खायाची न्हाई. बिडी वढायची नाहीं आन् तपकीरबी वढायची नाहीं. क़ाय समजलं व्यंका ? " बाळासाहेबानें विचारलें.

" त्ये तर पाक इसरलोंच कीं ग्येवा." असं म्हणत शिदा चांभारानें व्यंकाची तपकिरीची डबी धाईघाईनें बंद करून आपल्या खिशांत टाकून दिली.

" आन मग सुपारीबी खायची नसल ? " नागू गवळ्यानं डोळे चोळत - चोळत आणि एक प्रचंड जांभई देत विचारलें.

" आरं ए कुंभकर्ना, पान खायाचं न्हाई म्हंजे सुपारीपन खायाची न्हाई. येवढं बी कळंना, झालंय का तुला गा ? " अप्पाराया अण्णा रागावला.

" आतां पन आसं पघा....आः आः ऽऽऽ " जांभई देत नागू गवळी म्हणाला, " एवढे मोठ्ठे टिळकम्हाराज बी सुपारी खात असत... धुर्र्र्र...'' आणि नागू गवळी भिंतीला टेकला.

" आतां टिळकम्हाराज आठवतात व्हय् तुला गड्या ? आरं पन् टिळक-म्हाराज तुरुंगांत गेले हुते मायदेशाकरितां. तूं जाशील कां झोपेश्वरा ? कीं आपली उचालली जीभ आन् लावली टाळ्याला. कसं ? " पाटलांनीं तुंबा हाणला.

पण हें वक्तव्य ऐकायला नागू गवळी जागा नव्हताच. तो भिंतीपाशीं लवंडून तिथल्या तिथेंच झोंपीं गेला होता. झोंपेंत अगदीं पार बुडाला होता.

" च्या बा..." इथं बाळासाहेबानं स्वतःच जीभ चावली, " ह्ये नागू गवळी म्हंजे येक नामांकित बेनं हाय."

" बाळासाब, त्याला झोंपूं द्या कीं गुमान. तुमी पुढचं काडा. आडिटर म्हाराज काय म्हन्त्यात आणखी ? ... "

" हां ऐका." बाळासाब गंभीर होत वाचूं लागला, " पिचकाऱ्या हानायच्या न्हाईत, दांत-कान कोरायचे न्हाईत, मांड्या खाजवायच्या न्हाइत..." त्यानं घडाघड पुढचे ठराव वाचून टाकले.

" आतां म्हंजे करायचं तरी काय मानसानं ? ह्यो आडिटर मानूस हाय कीं बाईल हाय ?..." शिदा चांभाराला हे ठराव आतां फार अवघड वाटूं लागले.

" त्याला नाविलाज हाय. गांव सुधारायचं म्हंजे ह्ये सगळं कराय पायजे. कसं पाटील..." बाळासाहेबानें पाटलांच्या सदसद्विवेकबुद्धीला आवाहन केलें.

" आतां त्यांत काय शंका हाय का बाळासाब ? वाकडेवाडीचा पहिला नंबर आणायचा म्हंजे तूं काय सांगशील तें करायलाच पायजे."

" कसं जमावं पन त्ये पाटील ? आतां तुमी ह्यो नंबर शब्द वापरला त्यो काय मराठी हाय ? तुमी पन..."

" आरं तिच्या मारी, नंबर मराठी न्हवं बाळासाब ? " पाटील महाराज आश्चर्यचकित झाले.

" नंबर शब्द विंग्रजी हाय. मराठी शब्द हाय क्रमांक...समजलं ? क....मां....क " बाळासाहेबानें सांगितलें.

" कर्म बाबा माझं...मी समजलों ह्यो कर्मांकच विंग्रजी आसल. कायरं बाळासाब, आसलं उलट्या टाळक्याचं शब्द मराठींत बी असतात म्हन कीं ! "

" म्हंजे मराठी काय साधीसुधी भाषा समजलां काय तुमी, आं ? काय सुदीक बी कमी न्हाय तिच्यामंदी..." बाळासाब अभिमानानं म्हणाला.

" बरं आमचं न्हायलं...कर्मांक तर कर्मांक...आतां पुढं..." पाटलांनीं आपल्या अज्ञानापुढें हार खाल्ली.

" आतां मंडळी पुढचे ठराव ऐका. गप्पाटप्पा हानायच्या न्हाईत; पारावर, चावडीवर, देवळांत उगा बसायचं न्हाई; कालवा करायचा न्हाई; निवांतपणा सोडायचा..." बाळासाब वाचूं लागला.

" ह्ये इप्रित हाय बाळासाब. कालवा बी करायचा न्हाई आन् निवांतपणा सोडायचा ह्ये काय आडिट काढनं झालं का स्वांग...." कोंडिबा गायकवाड कातावला होता.

" त्यांत काय बी इप्रित न्हाई. शेरबाजूचे लोक आसंच बोलत असत्यात. अंतर...अंतर...हा अंतर्विरोध म्हन्तात याला. पाहा पटत आसलं तर. इथं सुधारना करायची म्हंजे हुरडा खायाचा न्हाई. समजलं..." अंतर्विरोध हा शब्द आपल्याला सुचल्यामुळें अभिमानाची काकवी बाळासाहेबांच्या चेहऱ्यावरून ओघळत होती.

" बरं बाबा, तुला पटलं आसल तर व्हाऊं द्या त्ये बी. आमचं काय बी म्हननं न्हाई. कसं अप्पाराया अण्णा... " पाटील महाराजांनीं सम-वयस्क माणसाला विचारलं.

" हां, त्येच खरं. त्ये माशिकांत काय लिहिल्यालं असतं त्ये आमच्या डोक्शांत कसं शिरणार गा ? " अप्पाराया अण्णा म्हणाले.

" मग आतां त्ये सगळे ठराव पसार केले म्हना कीं ? " बाळासाब विचारूं लागला.

" ह्ये काय इचारनं झालं बाळासाब ? ही समदी मीटिंग घेतली ती कशापाई घेतली रं माझ्या बाळा ?..."

" आतां मी प्वार, पन मला तुमाला सांगनं भाग हाय. तुमीं थोरांनींच मीटिंग शब्द वापरायचा म्हंजे मंग प्वारांनीं काय करावं ?..."

" अरारारा....मीटिंग शब्द विंग्रजी नव्हं का ?...च्या बा...पन् जाऊं द्या त्ये. त्याला सभा का कायसं म्हंत्यात त्ये म्हना..."

" बरं मग मंडळी, ह्ये सर्व ठराव बहुमतानं पसार ना ? " बाळासाहेबानें सर्वांना उद्देशून विचारलें.

" त्यामंदी आतां कायबी सौंशय व्हायला न्हाई..." पाटील बोलले.

" महाराष्ट्रांत कल्याणकारी राज्य निर्मान करायचं आसल तर सौंस्कृति सुधाराय पायजे, असं परवां त्या वसंतरावांनीं सांगितलें कीं पुन्याला ! " बाळासाहेबानें आपल्या आठवणींतला एक पिळदार स्क्रू पाटलांच्या डोक्यांत घुसविण्याचा प्रयत्न केला.

" मग बोला मंडळी, सर्व ठराव पसार. जय हिन्द ! " बाळासाब ओरडला.

" जय हिन्द ! जय महाराष्ट्र ! " सगळी ' मंडळी ' ओरडली. आणि पाटलांच्या चावडीवरची बैठक विस्कटली. सभा बरखास्त झाली. लोक घरोघर निघून गेले.

लोक घरोघर निघून गेले आणि नेहमींप्रमाणें परत जमले नाहींत.

हे सगळे ठराव पास झाल्यापासून लगेच त्या गांवांत स्मशानशांतता पसरली. मंजुळ शिव्या कुठें ऐकूं येईनाशा झाल्या. त्यामुळें भांडणें बंद पडलीं. पान, तंबाखू, विडी, तपकीर या गांवच्या मुख्य दैवतांना अडगळींत

बसावें लागलें. सुंदर, लालभडक पिचकाऱ्या कुठें दिसेनात, तंबाखू दाढेला धरून असणारे आणि मुखरस संभाळून बोलणारे बहाद्दर आढळेनात, विडीचा नयनमनोहर धूर कुठें दिसेना. दिसे तो फक्त नाकातोंडांत जाऊन हैराण करणारा लांकडांचा धूर. तपकिरीमुळें येणाऱ्या कर्णमधुर शिंका ऐकूं येईनात. गप्पाटप्पा हाणायच्या नसल्यामुळें गांवांतले पार, देवळं आणि चावडी ओस पडली. नेहमींचे सगळे उद्योग बंद पडल्यामुळें लोकांना काय करावं हें बिलकुल सुचेनासं झालं. शिव्या द्यायच्या बंद झाल्यामुळें गांवांतलीं बायामाणसं काम करीनाशीं झालीं, पोरं जास्तच उंडारूं लागलीं. गाईम्हशींनीं दूध द्यायचं बंद केलं आणि फक्त लाथा मारण्याचं आणि ढुशा देण्याचं आपलं कार्य चालूं ठेवलं. जो दिवस चुटकीसरसा कुठल्या कुठें निघून जात असे तो लांबलचक आणि कंटाळ-वाणा झाला. कांहींच न बोलल्यामुळें लोकांचीं बंद झालेलीं तोंडें दुखूं लागलीं. प्लेगची साथ आल्यावर होतें तसें झालें. अवघ्या गांवावर प्रेतकळा पसरली. घरोघरीं लोकांचे चेहरे मलूल, ओढल्यागत दिसूं लागले. गांवांतला मुख्य कामधदाच बंद पडल्यामुळें कोणाला कांहीं सुचेनासं झालं.

मास्तराची शिकवणी पूर्ववत् ठेवावी अशी अवदसा यदू वडाराच्या व्यंकूला आठवली. दत्तू पैलवानाला मेहनत करणें जमेना. शिदा चांभाराला लबाडी करण्यांत मौज वाटेनाशी झाली. सुताराच्या आनशीला आपले जुने चाळे बंद करावे लागले, त्यामुळें तिला फार उदास वाटूं लागलें. नागू गवळ्याची झोंप पार उडाली. झोंप येण्यासाठीं त्यानें खूप उपाय केले. मागें एकदां चोर आला होता तेव्हां त्याला छानदार, गडद झोंप लागली होती. म्हणून कोणी चोर आला तर आपल्याला झोंप तरी लागेल याकरितां तो चोर येण्याकरितां खंडोबाचा धांवा करूं लागला. अप्पाराया अण्णाला पण कांहीं सुचेना झालं. एवढा मोठा शहाणा बाळासाब, पण तोसुद्धां वेड्यागत करूं लागला.

पाटीलबाबा तर अगदीं हैराण होऊन गेले. विडी नाहीं, पान-तंबाखू नाहीं, चिमूटभर तपकीरसुद्धां नाहीं. त्यांचा वेळ जातां जाईना. पेवांत कोंडलेल्या धान्यागत त्यांची स्थिति झाली होती. कांहीं इलाज चालेनासा झाला, तसे पाटील हाताचे दोन्ही पंजे भुईला रेटून गुमान बसून राहिले.

मान वांकडी करून फळीवर ठेवलेल्या तंबाखूच्या पिशवीकडे पाहात राहिले. पलीकडे असलेलें विडीचें बंडल त्यांना माकडागत वेडावूं लागलं. पाटलांना डोहांत उडी मारावी असें वाटूं लागलें. कोंडलेल्या उंदरागत ते आंतभाईर, भाईरआंत करूं लागले.

—अशा रीतीनें वाकडेवाडीला अगदीं प्रेतकळा आली. तिथलें पूर्वीचें सगळें चैतन्य नाहींसें झालें, आनंद पार नाहींसा झाला, रसातळाला गेला. लोक दुःखीकष्टी झाले.

पण तरीहि लोकांनीं सारं सहन केलं. पाटलाच्या नेतृत्वाखालीं सगळं निभावून नेण्याचा प्रयत्न केला. पण कांहीं जमेना. दिवसेंदिवस गांवाची प्रकृति अधिकाधिक बिघडूं लागली. तें 'सौंस्कृतीच्या' नव्या तडाख्यांतून वांचेल असें दिसेना.

शेवटीं देवाला या गरीब, बापुडवाण्या गांवाची दया आली.

—एके दिवशीं पुण्याला दिवसभर गेलेला बाळासाब वाकडेवाडीला परत आला. आला तो तरातरा पाटलाच्या वाड्यावर गेला. पुण्याहून आणलेलें एक मासिक त्यानें घडाघड पाटलाला वाचून दाखवलें. त्यांत शहराच्या गोष्टींबद्दल कोणींतरी एक लेख लिहिला होता.

बाळासाब वाचीत होता आणि पाटील ऐकत होते.

ऐकतां ऐकतां पाटलांचा गेलेला उत्साह परत आला. त्यांचा चेहरा आनंदानें फुलून आला.

लेख वाचून झाला तसा बाळासाब म्हणाला, "आशि गोष्ट. आतां..."

पाटील ओरडले. "च्या बायलीला, अशी गोष्ट हाय व..." आणि त्यांनीं ओरडून आंतून कोणाला तरी बोलाविलें. पाटील एकदम मोठ्या आवाजांत ओरडलेले पाहून तो बोंबिलभिक्या माणूस अगदींच शेळपटासारखा कांपतकांपत पाटलांपुढें येऊन उभा राहिला.

"आर भाड्या हुबा काय राह्यलास? जा सूट आन् बोलावून आन गांवांतल्या सगळ्या मंडळीला....जातोस कीं न्हाई गुमान, कां मोडूं रं टांगडं तुजं?...."

"हा सुटलोंच कीं, आगदीं एक्स्प्रेस सुटलों!" असें म्हणून तो भेदरलेला माणूस पाटलांच्या वाड्यांतून पळत सुटला.

घटकाभरांत गांवांतली बहुतेक मंडळी चावडीवर जमा झाली. कांहीं-तरी नवीन, वेगळं झालं असेल, आनंदाची बातमी आली असेल म्हणून जमा झाली.

सगळे जमल्यावर पाटील बाळासाहेबाकडे वळून म्हणाले, " हां बाळासाब. हून जाऊं द्या. तूं मंगाशीं काय काय वाचलं त्ये या समद्यास्नी सांग समजावून. नीट खुलासेवार सांग."

" त्ये माझ्याकडं लागलं. " म्हणून बाळासाब उठून उभा राहिला. त्यानें आपली चाळिशी काढून ती व्यवस्थित पुसली. ती परत कानाला लावली. कमरेवर हात ठेवून तो खूप वेळ बोलत राहिला.

आपल्या भाषणांत त्यानें सांगितलें कीं " खेड्यांत चाललेला नाहीं इतका धुमाकूळ शहरांतले लोक घालतात. त्ये बिड्या वढतात आन् वर शिग्रेटी पन् फुंकतात. त्ये पानं खातात, तंबाखू बचकबचक खातात आन् पचापचा थुंकतात बी. वर तपकीरसुद्धा वढतात आणि श्या तर, ऱ्या बायली इचारू नगा. गांवठी श्या भरपूर देतातच आन् वर विंग्रजी श्या पन देतात. विंग्रजी शब्दच नुसते वापरीत न्हाईंत तर विंग्रजीच घटका-घटका, रात्रंदिवस बोलत ऱ्हातात. शहरांतले लोक पन निवान्त बसतात, गप्पाटप्पा हानतात, हाटेलांत जातात, सिनेमा पघतात आन् आजकाल तमाशाचं व्यसन बी राजरोस करत्यात. आनखीबी खूप लफडी करत्यात, दारू पितात. शिवशिव, काय समदं करतात त्ये सांगण्यासारखं न्हाई..."

आणि जमलेल्या मंडळींना आपलं म्हणणं पटावं म्हणून बाळासाहेबानें आणखी पुरावासुद्धां दिला.

" ह्ये समदं मी परतक्ष पाहून आलों. लेखी पुरावा पायजे आसल तर ह्यो पघा ! " म्हणून त्यानें आपल्या हातांतलें मासिक झेंड्यासारखें उंच उचलून सर्वांना दाखविलें.

" आरं, त्ये खरं बाळा, पन सुखी हायेत का शहरांतले लोक ? " अप्पाराया अण्णांनीं साशंक होत विचारलें.

" सुखी नसाय झालंय काय त्या भाड्यांना. मस सुखी हायेत समदे. सांजसकाळ मौजमजा करतात. हिरींत डुंबावं तसं अगदीं म्हशीगत सुखांत डुंबत असतात. काय बी कमी न्हाई...."

असं म्हणून बाळासाब थांबला. खिशांतून ठरावाचा कागद त्यानें बाहेर काढला आणि सगळ्यांच्या देखत त्याचे तुकडे तुकडे करून त्यानें भिरकावून दिले. मग विडीचें बंडल असलेल्या खिशांत हात घालीतच तो खालीं बसला.

—सगळ्या लोकांना गांवांत आलेल्या दुःखाचें कारण आतां नीट समजलें. तें आतां कोणीं समजावून सांगण्याची गरज राहिली नव्हती.

—बाळासाब खालीं बसतांक्षणीं पाटलांनीं आपली तंबाखूची पिशवी काढली, आणि चांगली बचकभर तंबाखू काढून ती आपल्या तळहातावर ठेवली. नंतर तिला झकास चुना लावून ती मळली आणि मग ती हलक्या हातानें तोंडांत टाकून तोबरा भरला.

त्याबरोबर दत्तू पैलवान, व्यंका वडार, आप्पाराया अण्णा, बाळासाब, शिदा चांभार, नागू गवळी या सगळ्यांनीं आपल्या पुढाऱ्याचें अनुकरण केलें. तंबाखूचे बार भरले गेले, पानांच्या चंच्या सुटल्या, विड्यांचीं बंडलें सुटलीं, तपकिरीच्या डब्या उघडल्या. थोड्याच वेळांत पिचकाऱ्या हाणल्या गेल्या आणि सगळीकडे लालीलाल होऊन गेलें. तपकिरीचा सुगंध दरवळला आणि विड्यांचा धूर इतका सुटला कीं चावडीला आग लागली आहे असा भास झाला. गप्पाटप्पांच्या आवाजानें सगळी चावडी गजबजून गेली आणि श्यांच्या आवाजानें ती गुदमरली. एकच कालवा उडाला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं—म्हणजे दुपारीं—गांवांतले सगळे लोक पूर्वी-प्रमाणें उन्हें अंगावर आल्यानंतरच उठले. अगदीं श्या देतच उठले. त्यामुळें बायकामाणसें व्यवस्थित कामाला लागलीं. च्या पिऊन झाल्यावर ताबडतोब चावडी, पार, देऊळ, शाळेची जुनी जागा हीं ठिकाणें माणसांनीं गजबजून गेलीं. पान, तंबाखू, विड्या, तपकीर या ग्रामदैवतांची आराधना सुरू झाली. आणि गप्पाटप्पांना रंग भरला.

—अशा रीतीनें जी वाकडेवाडी आठ-दहा दिवस मोठी दुःखी झाली होती ती परत सुखी झाली.

सगळीकडे आनंदीआनंद झाला.

आणि ‘ सौंस्कृतींतला ’ स्क्रू आपल्या डोक्यांत पिळून घेण्याचा मूर्खपणा या शहाण्या गांवानें परत कधींहि केला नाहीं.

◎ ◎ ◎

# ३

# कातरवेळ : एक हरवणें

‘ मराठी कथेमध्यें कथाकार थोडे आणि कथेकरीच जास्त, कथा थोड्या आणि काथ्या फार,’ असें विधान मींच एके ठिकाणीं केलें होतें त्याची आज मला आठवण व्हावी. यानंतर एका श्रेष्ठ टीकाकार मित्रानें माझ्या वरील विधानांतील फोलपणा माझ्या लक्षांत आणून दिला. काथ्या म्हणजेच कथा आणि कथेकरी म्हणजेच कथाकार हें त्यानें मला पटवून दिलें. टी. बी. शिवशिव याच्याबद्दल मला आदर आहे व तो टीकाकार असूनहि माझा मित्र आहे. त्याचें सर्व प्रत्ययकारी बोलणें संपल्यावर मी म्हणालों, “ शिवशिव, फारच मोठी चूक मी आजपर्यंत कथेबाबत करीत आलों.” मित्राचें म्हणणें पटल्यावर सगळा वादच संपला. जें वाईट असें आपल्याला वाटत होतें तेंच ( खरें तर ) चांगलें असें एकदां पटल्यावर मग वादाला जागाच कुठें राहिली !

या नव्या दृष्टीनें जेव्हां मी मराठी कथेकडे पाहूं लागलों तेव्हां एक वेगळाच प्रत्यय आला. हा प्रत्यय या लेखांत शब्दरूप व्हावा.

नाजुकाबाई इतके दिवस चांगल्या कथा देत होत्या. इतकेंच नव्हे तर अलीकडे त्या अधिक चांगल्या कथा देऊं लागल्या आहेत याची जाणीव मला नुकतीच झाली. या लेखांत ( जो अत्यंत नाजूक अशा एका विषयावर गंभीरपणें लिहिलेला आहे हें प्रथमच सांगितलें पाहिजे. ) नाजुकाबाईंच्या कथांचें अगदीं हलक्या हातानें परीक्षण करण्याचें योजलें आहे. बाईंनीं पाचुंद्यावारी कथा लिहिल्या नसल्या तरी त्यांच्या अवघ्या कथांतून दिसणारी जाण आगळीच वाटावी. ही जाण, तिचा आकार आणि रेषा शोधण्याचा हा प्रयत्न.

प्रत्येक कलावंताच्या मनांत एक मोहन नांवाचा राजपुत्र ( प्रिन्स चार्मिंग ) असतो. कुणा कलावंताच्या मनांत तो पुळणीच्या स्वरूपांत प्रगटतो तर कुणाच्या मनांत तो (तंबाखूच्या) गुळणीच्या स्वरूपांत वावरतो. कुणाच्या मनांत तो वेगन-वेल असतो तर कुठें दुसरीकडे तो वुचाचें झाड असतो. नाजुकाबाईच्या कथा-विश्वाकडे सहज पाहिलें असतां आपल्याला प्रथम कोणी जाणवत असेल तर तो म्हणजे शेवगा. शेवगा हा बाईचा मोहन राजपुत्र हें कथेकथेगणिक जाणवावें. आतां वास्तविक सामान्य माणसाचा म्हणा किंवा नाजुकाबाई-खेरीज दुसऱ्या कुठल्याहि कलावन्ताचा शेवग्याशीं संबंध येतो तो त्याच्या शेंगापुरता. ( शेंगांच्या या खालच्या पातळीवर एका कथालेखकानें मिळविलेलें यश आणि अपयशहि येथें जाणवावें. ) हा जेवणाच्या टेबलाच्या किंवा पाटाच्या पातळीवरचा अनुभव झाला. पण नाजुकाबाई शेवग्याचा जो अनुभव घेतात तो अगदीं वेगळ्या पातळीवरचा असतो. मुख्य म्हणजे बाईच्या शेवग्याला कधीं शेंगाच नसतात. उरतात तीं फक्त त्यांचीं फुलें. त्यांच्या कथांतून शेवग्याला कांहींतरी सारखें हरवल्यासारखें वाटत असतें. हें हरवणें म्हणजे दुसरें तिसरें कांहींच नसून या शेंगा हरवणेंच होय. हा आपला माझा नम्र अंदाज आहे. खरें तर इतक्या स्पष्टपणाचा डाग नाजुकाबाईच्या कथेला कधींच लागत नाहीं. पण हें हरवणें बाईच्या कथांत फारच महत्त्वाचें असल्यामुळें त्याबद्दल अधिक पुढें.

बाईच्या कथांचा आणखी एक विशेष म्हणजे त्यांत भरून राहिलेली कातरवेळ. त्यांच्या कथांत चोवीस तास कातरवेळ होत असते. नसल्यास ती सारखी होत रहावी असें त्यांच्या नायकाला किंवा नायिकेला वाटत तरी असतें. जेव्हां कातरवेळ झालेली नसते तेव्हां ती जेवणवेळेप्रमाणें व्हावयाची असते. सारखी व्हावयाची असते. स्टेशनांत उभा असणारा प्रवासी ज्याप्रमाणें गाडीची वाट पाहात असतो त्याप्रमाणें बाईच्या नायक-नायिका कातरवेळेची आतुरतेनें, उत्कंठेनें वाट पाहात असतात. या कातर-वेळेचें त्यांच्या कथांमधलें अनन्यसाधारण स्थान पाहतां तिला त्यांची प्रिन्सेस चार्मिंग—राजकन्या-मोहना—म्हणण्याचा मोह अनावर व्हावा. आतां कातरवेळेचें सामान्य माणसाच्या मनांत काय महत्त्व असतें ? फार तर धंद्यानें शिंपी असलेल्याला कातरवेळ महत्त्वाची वाटावी.

आपल्या उद्योगाची त्याला सतत आठवण करून देणारी म्हणून तिचें महत्त्व अमान्य होऊं नये. परंतु कातरवेळेचें शिंपीदादाइतकेंच नाजुकाबाईनाहि कौतुक आहे. त्यांच्या कथांत उन्हाच्या वेळीं, चांदण्यांत, पाऊस पडत असतांना, भर सकाळीं कधींहि कातरवेळ येते. एवढेंच काय, तर सामान्यांच्या कातरवेळेलासुद्धां ती कधीं येतें. पण गंमत यापुढेंच आहे. आणि ती म्हणजे नाजुकाबाईंच्या कातरवेळा फार गंमतीच्या असतात. त्यांत ऊन आणि चांदणें एकदम पडतें. बाईंच्या पात्रांना कातरवेळेंत सारखें भारल्यासारखें वाटतें. कारकून साहेबाला म्हणतो, “साहेब, कातरवेळ झाली. मी जरा लंचला जाऊन येतों.” साहेब कारकुनाला म्हणतो, “मिस्टर गायतोंडे, कातरवेळ झाली. तो कालचा ड्राफ्ट टाईप करून आणा.” स्टेनोग्राफर साहेबाकडे जाते आणि म्हणते, “सर, कातरवेळेला फिरायला जायला कित्ती मजा वाटते नाहीं!” साहेब मिस्किलपणें तिच्याकडे पाहात म्हणतात, “मिस् डिकूज्, असं अगदीं कातरवेळेसारखं काय बोलतां?” आणि नंतर डिकूज्बरोबर बाहेर जाण्याच्या घाईत ते धप्दिशीं खालीं पडतात तेव्हां त्यांना वाटतें कातरवेळ झालीच आहे. कातरवेळेचें वेळापत्रक यावरून तयार करणें हें कोणत्याहि टीकाकाराला कठीण जावें.

कातरवेळेइतकेंच बाईंच्या कथेंत दुसरें कांहीं महत्त्वाचें असेल तर ‘हरवणें.’ सामान्यतः माणसांच्या वस्तू, कपडे, पैसे, जोडे, कालवडी, खोंड इत्यादि हरवतात. पण नाजुकाबाईंचीं पात्रें हीं स्वतःच हरवलेलीं असतात. त्यांच्या कथांत झाडें, रस्ते, घरें अशा मातबर गोष्टीसुद्धां हरवतात. कित्येकदां हें हरवणें इतकें प्रत्ययकारी असतें कीं हरवणेंच मुळीं हरवून जातें. मी स्वतः या हरवण्याच्या प्रकारामुळें इतका गोंधळलों कीं बाईंचे ‘शोध’ हेंच पुस्तक कुठेंतरी हरवून आलों आणि तेव्हांपासून मला कांहीं तरी सारखें सांपडल्यासारखें वाटतें. बाईंच्या कथानायकानें एके ठिकाणीं दिलेली जाहिरात फार प्रत्ययकारी वाटते.

**हरवल्याचा शोध** : मी नाजुकाबाईंचा नायक. कातरवेळेला, काजळलेल्या संध्याकाळीं हरवलों आहें. अंगांत तांबड्या रंगाचा चौकटीचा शर्ट, वेडसर, पाय नसतांनाच चालतों आहोंत असें वाटणारा. नायिकेच्या घरीं ओठावरून जीभ फिरविली तेव्हांचा ओलावा तसाच असलेला. वय

अदमासें पंचवीस. हळवा. अशक्त. ज्याला मी सांपडलों असेन त्यानें मला कृपया नाजुकाबाईकडे पोंचवावें.

त्याचप्रमाणें त्यांच्या नायिकेनें दिलेली जाहिरातहि कांकणभर अधिकच प्रत्ययकारी वाटावी.

**सांपडल्याचा शोध** : मी....मी कोण ?...सांपडलें आहें मी...नाजुकाबाईची नायिका...वय अदमासें वीस...साडीचा रंग करडा...निळीभोर किनार...बोलण्यांत नेहमीं शेवगा, कातरवेळ इ. शब्द.. .टिंबांची आवड... कातरवेळ सतत होत रहावी अशी भावना...मी सांपडलें असलें तरी सारखें हरवल्या हरवल्यासारखें वाटतें....मला नक्की काय झालें आहे हें सांगणाऱ्या व मी हरवलें असल्यास मला सांपडवून देणाऱ्या आणि सांपडलें असल्यास हरवून देणाऱ्या माणसाला जाहिरातीचा खर्च व योग्य तें इनाम देण्यांत येईल....

याशिवाय कॉर्पोरेशननें कांहीं अत्यंत महत्त्वाचे रस्ते हरवल्याबद्दल दिलेल्या जाहिराती किंवा घरमालकांनीं घरें हरवल्याबद्दल दिलेल्या जाहिराती, जंगलखात्यानें झाडें हरवल्याबद्दल दिलेल्या जाहिराती येथें रसिकांना आठवाव्या.

नाजुकाबाईच्चीं माणसें हीं ‘ अमानुष ’ असतात असें म्हटल्यास तें वरवर पाहणाराला खरें वाटणार नाहीं. पण या विधानाची सत्यता बाईची कुठलीहि एखादी कथा चाळली असतांहि ध्यानांत यावी. त्यांचीं माणसें क्वचितच माणसें असतात. कारण तीं बहुधा झाडें असतात. हीं माणसें फुलतात, उर्मी मोहरतात, त्यांचा मोहोर गळून पडतो. एवढेंच नव्हे तर आणखी काय काय होतें हें त्यांच्या कथेंतील खालील संवादावरून लक्षांत यावें.

आंबा विचारतो : अरेच्या ! माझा सगळा मोहोर काय झाला ? काल संध्याकाळपर्यंत होता. अन् आतांच एकाएकीं कुठें गडप झाला ?

चिंच उत्तर देते : मला रे मेल्या काय माहीत ? माझाच कितीतरी मोहोर मी हरवून बसलें आहें.

आंबा म्हणतो : मोहोर हरवला तेव्हांपासून सगळ्या संवेदना हरवून मी उभा राहिलों आहें....

चिंच फिसकारते : कां ऽ हीं जाळ येणार नाहीं...राहीनास का उभा ! अन् सांगून ठेवतें, उगाच जास्त बडबडूं नकोस. शेंद्‌ऱ्या मेला ! कातरवेळ झाली कीं काय रे तुला. आं ऽ...

म्हणजे येथें झाडांचीं माणसें, माणसांचीं झाडें असा अजब प्रकार होत असतो. ( गांवठी भाषेंत ' माणसाला झाडानें धरलें ' असें म्हणतांना झाडाचा जो अर्थ असतो तो खालच्या पातळीवरच्या अनुभवासंबंधीं असल्यामुळें येथें अभिप्रेत नाहीं. ) बाईचीं माणसें ज्याप्रमाणें वारा आल्यावर पिंपळ सळसळावा तशीं सळसळतात किंवा फुलतां फुलतां मिटतात किंवा जसे त्यांचे शब्द झाडाप्रमाणें ओले असतात आणि ते ठिबकतात त्याप्रमाणें त्यांचीं झाडें अबोल असतात. आणि बोलकींहि. त्यांच्या कथेंतला कडुनिंब हुरहुरतो, त्याला ताप येतो आणि तो विरघळतोहि. त्यांच्या कथेंत आभाळ भारावतें, कळी फुलांच्या कानांत ' कुक् ' करते, केळ काकुळतीला येते आणि केविलवाणी होते. गर्भारशी केळ रेंगाळते. शेवगा माणसाच्या पायाला गुदगुल्या करून त्याला जागें करतो. शिवाय झुळूक दुडक्या पावलांनीं चालते आणि शेवग्याशीं लगट करते, मुकें आभाळ शास्त्रीय संगीताचा क्लास चालवितें, थंडीच्या अंगावर शहारे येतात, त्यामुळें ती दुलई गुंडाळून घेते. आभाळ विमनस्क होतें, त्याचें डोकें दुखूं लागतें आणि नंतर तें डोक्याला बहुधा अमृतांजन लावतें. बोगनवेल शेवग्याच्या झाडाला विचारते, " इश्श् , मला नाहीं वाटतं पाहिलंस ? "

शेवगा म्हणतो, " बगे ! अगो, तूं वेडी का खुळी ? कुठल्यातरी आगळ्या संवेदनेनें मी थरारून गेलों आहें. तुझ्या डोक्यांत कसं शिरत नाहीं ? "

बोगनवेल स्वतः कांहींच बोलत नाहीं. तिचे फक्त डोळे बोलतात, " हुडुत्, म्हणे थरारून गेलों आहें. शेवगा कधीं थरारून गेल्याचं आपण पाहिलं नव्हतं बाई ! चांगला पुरुषासारखा पुरुष आणि म्हणे थरारलों !... "

परसदारीं असलेला शेवगा आणि पुढच्या दारांतली बोगनवेल यांच्यांतला ताण ( tension ) येथें ' कित्ती छान साधलाय नै ? ' माणसें आणि झाडें यांच्यांत शेवटीं साम्य मात्र एकच, कीं दोन्ही ' हरवतात.'

इतर कथाकारांच्या कथांतून पाहिलें तर आपल्याला बहुधा त्यांत भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळ तिन्ही सांपडतात. पण नाजुका-बाईंच्या बाबतींत मात्र असें कधींच नसतें. त्यांच्या कलेचें व्याकरण अगदीं वेगळें आहे. म्हणजे त्यांच्या कथेंत भूतकाळहि नसतो आणि भविष्यकाळहि नसतो. आजचा अनुभव रोकडा देण्याघेण्याचा हा सारा सवाल आहे. वर्तमानकाळाचें जें महत्त्व बाईंनीं जाणलें आहे तें 'आज रोख उद्यां उधार' ही पाटी लावणाऱ्या वाण्यापेक्षां उजवें वाटतें. बाईंच्या कथेंत सगळें होत असतें, सध्यां होत असतें. झालेलें कांहींच नसतें व 'हरवणें' या एका अपवादात्मक क्रियेशिवाय दुसरें कांहींच व्हावयाचें नसतें. वर्तमान-काळाचा बाईंनीं केलेला उपयोग किती प्रत्ययकारी आणि जीवघेणा होऊं शकतो हें त्यांच्या 'हुरहूर' या कांहींशा फसलेल्या कथेंतून जाणवावें.

आटपाट नगर आहे. तेथें धान्यानें भरलेलें राजाचें कोठार आहे. कोठाराला एक लहानशी फट आहे. फटींतून एक चिमणी आंत येते.

चिमणी एक दाणा चोचींत घेते...भुर्रकन् उडून जाते...

चिमणबाळ एक दाणा चोंचींत घेते. भुर्रकन् उडून जाते...

चिमणा एक दाणा चोंचींत घेतो. भुर्रकन् उडून जातो...

परत चिमणी येते....

परत चिमणबाळ येते...

परत चिमणा येतो....

चिमणी परत दाणा घेऊन जाते...

चिमणबाळ परत दाणा घेऊन जाते...

चिमणा परत दाणा घेऊन जातो...

असेंच सारखें होत रहातें...

कोठार खिन्न होतें...त्याच्या मनाला भोंकें पडतात...कसल्यातरी अशब्द हुरहुरीनें त्याचें मन भरून जातें...शेवटीं कोठार रिकामें होतें... उरते फक्त हुरहूर...

एका टीकाकारानें या वर्तमानकाळाबद्दल लिहिलें आहे कीं बाईंच्या कथेंत वर्तमान इतका आहे कीं तिला भविष्यच नाहीं. कलेचें व्याकरण हें

मोन्यांच्या व्याकरणापेक्षां वेगळें असतें हें न समजल्यामुळें झालेला हा घोटाळा. एकच काळ वापरल्यामुळें कथेंत तोचतोपणा फार येतो असेंहि या असमंजस टीकाकारांचें म्हणणें. परंतु बाईंच्या कथेंतील 'मोनॉटनी 'ला जो एक गहिरेपणा आणि जी निळाई आहे ती वेगळी वाटावी.

बाईंच्या कलेच्या व्याकरणाचा विचार करतांना त्यांच्या कथांची आणि वाक्यांची लांबी आणि क्रियापदांविषयींची त्यांची कलादृष्टि रसिकांना मोह पाडते. लांबी म्हणजे खरें तर लांबीचा अभाव. कारण त्यांच्या कथा व त्यांतील वाक्यें दोन्हीं आंखूड असतात. कथा लहान असल्यामुळें वाक्यें लहान असतात कीं वाक्यें लहान असल्यामुळें कथा लहान होतात हें ठरविणें कठीण असलें तरी तें महत्त्वाचें नाहीं. कारण छोटेपणामुळें कथेला जें टोंक येतें तें आणि लांबी नसली तरी तिला असणारी खोली या दोन गोष्टी खऱ्या महत्त्वाच्या. क्रियापदांची कलाबूतसुद्धां बाईंना महत्त्वाची वाटत नाहीं. एका टीकाकारानें असें म्हटलें आहे कीं, 'बाईंच्या कथांचा जीवच लहान. त्यामुळें तिची लांबी, रुंदी, खोली सगळेंच तोकडें. आशयाची मूळ प्रकृतीच तोळा-मासा. त्यामुळें अभिव्यक्ति जरा पसरली तरी कथा फसते किंवा खरें तर हुकते. एका लवंगेनें तिला ताप येतो तर वेलदोड्याच्या एका दाण्यानें हुडहुडी भरते.' माझ्या मतें टीकालेखनाची ही भूमिकाच कांहींशी आकस्ताळी आणि बरीचशी बेजबाबदार आहे. बाईंच्या कथा-संग्रहांतील कोरीं पानें आणि त्यांनीं न लिहिलेल्या कथा हीं आशयाचें जें नवनीत आपल्याला देऊन जातात त्याकडे माझी नेहमीं आशापूर्ण नजर लागलेली असते. त्यांच्या व्यक्त झालेल्या कथांनीं निर्माण केलेली हुरहूर आणि त्यांच्या अव्यक्त, संकल्पित कथांबद्दल निर्माण होणारी काळजी या दोन्ही माझ्या दृष्टीनें सारख्याच मोलाच्या.

याच संदर्भात आपल्या लगेच लक्षांत येतात तीं म्हणजे बाईंच्या कथांतील टिंबें. टिंबांचा त्यांच्याइतका प्रत्ययकारी आणि अर्थवाहक उपयोग अवघ्या मराठी कथेंत दुसऱ्या कोणीं केल्याचें आढळणार नाहीं. येथें शून्य आणि टिंब यांतील फरक ध्यानांत घ्यावा. शून्यांतील पोकळपणा आणि टिंबांतील भरीवपणा हाहि रसिकांनीं अभ्यासपूर्वक समजावा. हीं टिंबें नाजुकाबाईंच्या कथेंत एक वेगळीच नवलाई घेऊन येतात.

*संज्ञाप्रवाहांचें दर्शन घडविणाऱ्या एका लेखकानें ज्याप्रमाणें मराठीच्या फाउंड्रींतील तिरक्या अक्षरांच्या खिळ्यांच्या तुटवडयांची तीव्रतेनें जाणीव करून दिली,* त्याचप्रमाणें बाईच्या टिंबलौलुप्यामुळें याच फाउंड्रींत टिंबांचा दुष्काळ पडला. ' किनारा ' या त्यांच्या कथेंत वाळूचें दर्शन घडविणारीं टिंबें आयत्या वेळीं मिळालीं नाहींत आणि तीं शेवटच्या पानांत सगळीं एकत्र छापण्यांत आलीं त्यामुळें एक बऱ्यापैकीं रांगोळी तयार झाली तरी ' किनारा ' मात्र हरवला आणि समुद्रांत जो बुडाला तो बुडालाच. ' पूर्वी पत्र लिहून झाल्यावर ज्याप्रमाणें डबींतली बारीक वाळू शाई वाळण्यासाठीं त्यावर शिंपडत असत, त्याचप्रमाणें कथा लिहून झाल्यावर नाजुकाबाई आपली टिंबांची डबी कथेवर सांडतात ' असें कोणींसें म्हटलेलें माझ्या ऐकिवांत आहे. प्रामाणिक टीकेसाठीं लागणारी जी मनःपूर्वकता असते तीं या टीकेंत नाहीं हें वेगळें सांगावयास नको.

मराठीच्या एका श्रेष्ठ कादंबरीकाराला एकदां कोणींतरी म्हटलें होतें, ' अहो, तुम्ही आजवर इतकें लेखन केलें पण अजून, एवढ्या उतारवयांतसुद्धां आपलें आत्मचरित्र लिहिण्याचा विचार आपण कसा केला नाहीं ? ' त्यावर सदरहू कादंबरीकार प्रथम नुसतेच मिस्किलपणें हंसले आणि बोलले कांहींच नाहींत. नंतर थोड्या वेळानें तें हंसत हंसतच म्हणाले, ' मग आजवर मीं जें लिहिलं आहे तें दुसरं काय आहे ? ' त्याबरोबर त्यांच्या कादंबऱ्यांतले सगळे भडक प्रणयप्रसंग आणि त्यांचीं रसभरित वर्णनें आठवून त्यांना प्रश्न विचारणारी कॉलेजकन्यका लाज़ लाज लाजली. हें सर्व येथें सांगण्याचा हेतु हा कीं, नाजुकाबाईच्या कथांमध्येंसुद्धां त्यांचें आत्मचरित्र आढळतें. बाजारांत कुठली भाजी स्वस्त आहे हें ज्याप्रमाणें कुठल्याहि खाणावळींत कळतें त्याचप्रमाणें बाईचें संसारचित्र त्यांच्या कथांतून उमटलेलें दिसतें. ताज्या अंकांतल्या त्यांच्या एका कथेंत पकोड्यांचा उल्लेख होता. नंतर चौकशी केल्यावर असें आढळलें कीं, ज्या सुमारास कथा लिहिली गेली त्याच सुमारास ' आज खायला काय आहे ? ' या पुस्तकांतला हा प्रकार घरीं करण्यांत आला होता. कथेमध्यें पकोड्यांचा जो ताजेपणा आणि चुरचुरीतपणा जाणवला त्यावरून ते प्रत्यक्षांत किती रुचकर व खमंग झाले असतील याची कल्पना करतां

त्यांचा मुलगा आजारी पडल्याचें आणि त्यांची मुलगी हरवल्याचें वाचून त्यांचे नातलग बऱ्याच काळजींत पडले होते. पण दुसऱ्या महिन्यांतल्या त्यांच्या कथा वाचतांच त्यांची ही काळजी नाहींशी झाली. कारण त्या महिन्याच्या कथांत मुलगा बरा झाल्याचें व मुलगी सांपडल्याचें वृत्त प्रसिद्ध झालें होतें. ऐतिहासिक चरित्रपर माहितीबद्दल मराठी राज्यकर्त्यांनीं जी अनवस्था दाखवली त्याबद्दल ते नेहमीं टीकेचा विषय झाले आहेत. बाईंची सदैव जागरूक असलेली ऐतिहासिक दृष्टि पाहिली म्हणजे समाधान वाटतें. इतिहासाचा लेखक साहित्यसंमेलनाचा अध्यक्ष होऊं शकतो किंवा नाहीं याबद्दल नुकताच झालेला मौजेचा पत्रव्यवहार येथें आठवावा. आणि त्याचा विचार करतांना बाईंचें आत्मचरित्रलेखन ऐतिहासिक ठरलें तरी वाङ्मयीन म्हणूनहि मानलें जावें.

बाईंच्या लेखनाचा एक आणखी आगळा विशेष म्हणजे त्यांतील नाजुकपणा ! त्यांच्या अवघ्या कथासंभारांत कठोर व्यंजन सांपडणें हें मुष्किलीचें व्हावें. आदळआपट, दाणादाण, धांगडधिंगा त्यांच्या कथेला मुळींच सोसत नाहीं. नाजूक धुसफूस, कुरबूर, रुसवा-फुगवा, बस्स इतकेंच ! जें काम टांचणीनें होतें त्याला कुऱ्हाडीची जरूरी काय ? या संदर्भात ‘ शल्य ’ ही कथा कोणालाहि आठवावी. ‘ धपापतें ऊर ’ या त्यांच्या कथासंग्रहांतली ही लघुतम कथा वैश्विक वाङ्मयांतील एक उत्तम लघुकथा ठरावी व ती येथें देणें हेंहि अप्रस्तुत वाटूं नये !

## शल्य...

...चाळ विमनस्क आहे...खोलीला पडसें झालें आहे...

...ती उठते...डोक्याला अमृतांजन लावते...पण हें अमृतांजन लावून कांहींच कसें होत नाहीं...अंजनाच्या बाटलीप्रमाणें डोकें रिकामें, उदास कां राहतें ?....

...बाजारांत मटाराच्या शेंगा स्वस्त मिळतात...

...सासूबाई मटारभात कां करीत नाहींत ?...

...शेजारच्या उमाताईकडे दिवाळीचें तळण चाललें आहे ?—

...आपल्याला तें परकें कां वाटत नाहीं ?....तोंडाला पाणी कां सुटतें ?...

...अबोली रंगाची साडी परीट कां आणून देत नाहीं?...परिटाऽऽऽ येशिल कधिं परतूऽऽन...

...कपडे चार दिवसांनंतर परत कां मिळतात? ...कपडे फाटल्यास त्याला परीट जबाबदार कां नसतो?....

...एकावर एक तीन जाड गाद्या...उशाला एकावर एक दोन उशा ...तरी झोंप कां येत नाहीं?...

....डोळ्यांत काजळ घातलेली खोली आपली व्यथा पाहून रडत कशी नाहीं?....

...अनंता...ऑफिसांत कशाला गेला?....नोकरीच कशाला करायला हवी?....नोकरी सोडावी असें त्याला कां वाटत नाहीं?...कां?

....ऑफिसांत तो बटाटेवडा खात असेल... भटाचा चहा पीत असेल....

....सासूबाई स्वैंपाक करतात त्या करतात....डोक्याला जरा चोळत कां नाहींत?...

....ती उठते...हुरहुरीचा हात धरून उठते....

....भराभरा तिन्ही गाद्या उपसते...गुंडाळते...उशा फेकून देते... (त्यांच्यांतला कापूस कां बाहेर पडत नाहीं?...)

....तीन गाद्या आणि दोन उशा यांच्याखालीं 'शल्य' या कथेचें हस्तलिखित सांपडतें...आणि त्याला टोंचलेली टांचणीहि...

...हरवलेलें हस्तलिखित सांपडतें...

...पण मग ती स्वतःच हरवते...

...समोरच्या टोपलींत सासूबाईंनीं आणून ठेवलेल्या भुईमुगाच्या शेंगा हंसतात...

●

या कथेच्या नाजुकपणाबद्दलच्या मल्लिनाथीला शब्दांनीं पेलूं नये.... अशा प्रकारच्या लेखनाला टांचणी (किंवा शिंपला) सांप्रदायाचें लेखन

म्हणणें सोपें वाटत असलें तरी त्यांतील टोंचणी सामान्यांनाहि जाणवावी. ' शल्य ' या कथेंत टिंबाटिंबागणिक ती साकारली आहे, आणि त्यामुळें शल्याला टांचणीचें टोंक आलें आहे.

नाजुकाबाईंच्या ' खोली ' या कथेचें असेंच कांहींसें आहे. एक तरुण गृहस्थ आपल्या विवाहित स्त्रीला आपली नवी जागा दाखवितो याविषयींची ही एक नाजूक, करुणरम्य भावकथा ! जाणत्यांनीं या कथेचें फार कोडकौतुक केलें. ज्यांना फार कळत होतें ( आणि म्हणूनच मुळींच कळत नव्हतें ) त्यांनीं तिची टवाळी केली. महाराष्ट्रांतील एक नामवंत प्राध्यापक मला म्हणाले,

" या गोष्टींत तुमच्या या लेखिकेला सांगायचें आहे तरी काय ? हा म्हशा आपल्या ठकीला जागा दाखवायला घेऊन जातो. गाळा चवथ्या मजल्यावर असल्यामुळें तो तिला आवडत नाहीं. जिने चढतां-उतरतांना त्रास होईल, पाणी वर चढणार नाहीं. ठीक आहे. यावर उपाय म्हणजे दुसरी जागा पाहाणें हा आहे. त्यांत ' व्यथा ' कसली ? हिला क्षयाची भावना तर नाहीं ना ! बरें, जागा पाहतांना तेंच. या ठकीनें केलेलीं फुलें ठेवण्याबद्दल ती त्याला विचारते. तो म्हणतो, ' तीं ठेव कुठें तरी ! ' यांत ' शल्य ' कसलें ? बाहेरच्या खोलींत त्याला स्वातंत्र्य असावें, स्वैंपाक-घरांत तिची मालकी असावी असा हा साधा हिशेब आहे. साध्या शब्दांनीं हिला खोल जखमा होतात, हिचा स्वर कांपरा येतो ! हिचीं बोटें गोंधळ-तात, नंतर तीं थरथर कांपतात. हिला झालें आहे तरी काय ? अर्धांग तर झाला नाहीं ना ?...जागा पाहून झाल्यावर हे लोक परत येतात. ' गाळा कसा वाटला ? ' एवढेंच तो तिला विचारतो आणि ती तर जागा पसंत आहे किंवा नाहीं, भाडें काय, शेजार कसा आहे, कशाचीहि चौकशी करीत नाहीं. अत्यंत मूर्ख आणि अव्यवहारी जोडपें वाटतें हें ! ती त्याच्यापेक्षां जास्त मूर्ख आहे एवढेंच ! शिवाय यांत पातळांच्या आणि सदऱ्यांच्या रंगाचे जे उल्लेख आहेत त्यावरून ठकीच्या बापाचें कापडाचें दुकान असावें असें वाटतें. हें सांगण्याकरतां इतके शब्द फुकट घालविण्याची काय जरुरी होती ?...अन् मूर्खा, ही गोष्ट चांगली आहे म्हणून तूं मला सांगतोस ? "

'मूर्ख' हें प्रेमळ संबोधन आमच्या प्राध्यापकांनीं माझ्याकरितां वापरलें होतें, हें वेगळें सांगायला नको! हें सर्व येथें सांगण्याचा हेतु हाच कीं, टीकाकारांचा अशा प्रकारचाहि एक वर्ग असूं शकतो.

वास्तविक 'खोली' या कथेचें श्रेष्ठत्व वेगळें समजावून सांगावें लागूं नये. 'खोली' चवथ्या मजल्यावर आहे यावरूनच तिची उंची कळावी, तिची खोली नांवावरून स्पष्ट व्हावी. खरें तर या कथेंतल्या टिंबाटिंबाशीं आणि अक्षराअक्षराशीं थांबून तिची धुंदी अनुभवायला हवी. 'ती ठेव कुठें तरी' हें वाक्य तर त्या वर्षाच्या कथांतलें एक श्रेष्ठ वाक्य ठरावें. (१) 'फुलें' या नामाऐवजीं 'तीं' हें सर्वनाम आलें. येथें टांचणीचा पहिला आघात. (२) (३) आपण दोघे मिळून तीं कुठेंतरी ठेवूं असें म्हणण्याऐवजीं 'ठेव' असा आज्ञार्थ आला, 'आपण' ऐवजीं 'तूं' आलें. अशा रीतीनें आणखी दोन टांचण्या एकदम टोंचल्या गेल्या. (४) फुलें फ्लॉवर-पॉटमध्यें ठेवायचीं असतात त्याऐवजीं 'कुठेंतरी' म्हटलें गेलें. येथें चौथी टांचणी खुपसली गेली. शिवाय 'कुठेंतरी' हा शब्दसमुच्चय 'ती ठेव' यापेक्षां जास्त पसरट असल्यामुळें या शेवटच्या शब्दाची टांचणी जास्त खोलवर जाते व यांतूनच 'व्यथा' निर्माण करणारें 'शल्य' निर्माण होतें. अशा टांचण्या 'खोली'मध्यें जागोजाग पडलेल्या आहेत. त्यामुळें 'खोलींत' भरून राहिलेली व्यथा गहिरी होते. फुटलेल्या पेनमधून शाई ठिबकत रहावी त्याप्रमाणें दुःख सारखें ठिबकत राहतें...

...पण 'खोली'विषयीं इतकेंच. तिच्या परीक्षणाची लांबी तिच्या-पेक्षां जास्त वाढूं नये.

येथवर नाजुकाबाईच्या कथा-कर्तृत्वाचा मागोवा घेतला. मराठी कथेला त्यांनीं काय काय दिलें याची थोडी तरी जाणीव यांतून व्हावी. प्रश्न असा कीं, बाईनीं मराठी कथेला दिलें तरी काय काय? या प्रश्नाचें उत्तर देणें कठीण जावें. (बाईनाहि तें सोपें वाटूं नये.) प्रश्नाचें थोडक्यांत (पण पुरें नव्हे) उत्तर असें कीं, बाईनीं महाराष्ट्राला शेंगा नसलेला कां होईना पण शेवगा दिला. हळवी, सुकुमार, कातरवेळ दिली; टिंबें दिलीं; हरवणें दिलें—आणि सांपडणें सुद्धां. मराठी रसिकतेनें हें जपावें, वाढवावें.

बस्स इतकेंच!

◎ ◎ ◎

# ४

# सिंह आणि उंदीर

‘ सिंह आणि उंदीर ’ या कथेचा मूळ लेखक इसाप. ही सर्वविश्रुत कथा प्रा. फडके, खांडेकर आणि माडखोलकर कशी लिहितील हें पु. ल. देशपांडे यांनीं मागें दाखविलें होतें, तें तेथें आठवावें. हीच कथा सानेगुरुजी, गंगाधर गाडगीळ, पु. भा. भावे आणि द. मा. मिरासदार कशी लिहितील हें दाखविण्याचा माझा हा प्रयत्न. याशिवाय अलीकडे रूढ होत असलेल्या नवशैलींतहि हीच कथा शेवटीं सांगितली आहे. हें धाडस वाटावें.

### साने गुरुजी

## सिंह नि उंदीर : एक गोड गोष्ट

एक सिंह एकदां दुपारचा झोंपला होता. फुलाफळांनीं वांकलेल्या झाडानें त्याच्यावर आपल्या दाट छायेची छत्री धरली होती. झाडानें का विचार केला, हिंस्र प्राण्यास जागा कशी द्यावी? त्याचा स्वभावच होता छाया देण्याचा. ती माणसांनीं घ्यावी नि सर्पांनीं घ्यावी. गाईंनीं पांघरावी नि सिंहांनीं ल्यावी. निसर्गाच्या राज्यांत ना भेद, ना भाव ! ना आपला, ना परका ! हीच आपली भारतीय संस्कृति. व्यासांची. रामकृष्णांची. गांधीजींची.

सिंह झोंपला असतां तिकडून उंदराचें एक बाळ आलें आणि त्याच्या अंगावर बागडूं लागलें. जसें मातेच्या अंगावर मुलानें खेळावें तसें. पण

त्यामुळें सिंहाचा निद्राभंग झाला, नि त्यानें उंदराला आपल्या पंज्यांत धरलें.

उंदीर बिचारा कळवळून ओरडला, " आई, मायमाउली, तुझी शिकवण. तूं सांगितल्याप्रमाणें वागलों. भारतीय संस्कृतीचें बाळकडू तूं पाजलेंस. त्याप्रमाणें चित्त निर्मळ ठेवलें. आतां सिंहाच्या तावडींत सांपडलों आहें. त्यांतून माझी सुटका नाहीं. बघ आई, चित्तचक्षूंनीं पाहा. गेला तुझा बाळ ! जसा रोहिदास, जसा चिलया, तसा मी. आई ! "

तें हृदयद्रावक बोलणें ऐकून सिंहाला कळवळा आला. तो म्हणाला—

" अरे, तूं इतका कां बरें घाबरलास ? सिंह म्हणजे का क्रूरता ? सिंह म्हणजे का भीति ? सिंह म्हणजे धडाडी नि धिटाई ! सिंह म्हणजे प्रेम नि सेवा ! " बोलतां बोलतां सिंह सद्गदित झाला. त्याच्या दोन्ही डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. शेवटीं अश्रू टिपून तो म्हणाला,—

" जा, प्रेमळ मित्रा, जा. आपल्या मुलामाणसांत जा. सुखी हो. 'सर्वे सुखिनः सन्तु.' भारतीय संस्कृतीचा दिव्य नि भव्य संदेश. कुठें राहतोस बरें तूं ? कशावर बरें होते तुझी गुजराण ? "

" मी राहतों किराणा मालाच्या दुकानांत. तिथला माल चोरून खातों नि राहतों." बिचारा उंदीर आपल्या पापकृत्यांच्या जाणीवेनें शरमिंधा झाला.

सिंह त्याचें सांत्वन करण्यासाठीं म्हणाला,—

" भूक म्हणजे का चोरी ? भूक देवानें दिली. तूं खातोस ती गुळाची ढेप नि ते शेंगदाणे निर्माण केलें देवानें. वाण्यानें का ते केले ? वाण्याचा का त्याच्यावर अधिकार ? तें सारें देवाचें. " सिंहानें उंदराचे डोळे पुसले.

उंदीरहि गहिंवरला. तो म्हणाला,—

" महाराज, आपले उपकार मी कसे विसरूं ? दिलेलें प्रेम का विसरतात ? विसरायला ते का घेतलेले पैसे ? प्रेमाची फेड मी प्रेमानें कधींतरी करीनच करीन."

सिंह म्हणाला, " हे का उपकार ? धाकट्या भावावर का कुणी उपकार करतें ? हा उपनिषद्धर्म."

सिंहानें दिलेलें प्रेमाचें ओझें घेऊन उंदीर गेला.

कालांतरानें तो सिंह पारध्यांनीं बांधलेल्या जाळ्यांत सांपडला. ओरडून त्यानें आकाशपाताळ एक केलें. त्याची गर्जना ऐकून उंदीर तेथें धांवून आला. सिंहदादाला जाळ्यांत पाहून त्याचें काळीज तिळतिळ तुटलें. " भाऊ, तुझें असें कसें रे झालें ? " तो म्हणाला नि त्यानें जाळें तोडून सिंहाला मोकळें केलें.

मोकळा झाल्यावर सिंह गद्गदून म्हणाला,—

" तुला दिलेलें प्रेम इतक्या लवकर परत घ्यावें लागलें. असें सव्याज परत करायला ती का ठेव होती ? प्रेम निर्व्याज करायचें असतें. जसें आई मुलावर करते. "

" आई. आई. आईची आठवण. माझ्या भावा, मी जातों आतां. आई डोळ्यांत प्राण आणून माझी वाट पाहात असेल. न मातुः परं दैवतम् ।"

आईची आठवण निघतांच सिंहालाहि गहिंवरून आलें. तो म्हणाला, " आई, आई. तुमची आई, आमची आई. आई म्हणजे प्रेमाचा पाझर. आई म्हणजे क्षमेची मूर्ति. आई म्हणजे... "

पण पुढें त्याच्या तोंडून शब्दहि बाहेर पडले नाहींत, आणि डोळे पाण्यानें भरलेले असल्यामुळें पळून जाणारा कृष्णमूर्ति उंदीरहि त्याला दिसला नाहीं.

बाळांनों, संपली माझी गोष्ट. नाशिकच्या तुरुंगांत ही मीं सांगितली. सर्वांना आवडली. आहे ना गोड ?

●

**गंगाधर गाडगीळ**

## सिंह आणि उंदीर : अनुभवाची एक पातळी

दुपारची वेळ होती. वारा मेलेल्या म्हशीसारखा पडला होता. आपल्या तीक्ष्ण सुळ्यांनीं ऊन अंगाचे गिधाडासारखे लचके तोडीत होतें.

एका रानांत एक सिंह वृक्षाच्या छायेंत विश्रांति घेत पडला होता. गाफीलपणें झोंपल्यामुळें त्याचें तोंड उघडें पडलें होतें. आणि त्यांतला एक पिंवळा सुळा कवळींतल्या सोन्याच्या दांतासारखा चकाकत होता. झोंप लागली असूनहि त्याचा एक संशयी डोळा अर्धवट उघडा दिसत होता. शांत लागलेल्या झोंपेमुळें समाधानाचें तेल ( कीं तूप ) त्याच्या चेहेऱ्या-वरून ओघळत होतें. थोडा वेळ कांहींच घडत नव्हतें, आणि म्हणूनच खूप कांहींतरी घडेल असें वाटत होतें.

इतक्यांत सिंहाच्या अंगावर बागडणाऱ्या एका उंदरानें त्याची झोंप मोडली. कांचेला तडे जावे तसे त्याच्या झोंपेला अनेक तडे गेले. सिंह चवताळला. संतापानें त्याच्या मस्तकांत फणा काढली. रागानें मोठ-मोठ्यांदा गर्जना करून त्यानें सर्व जंगल गदगदां हलविलें. जंगलांतल्या शांततेची बरणी फुटून तिचे शेंकडों तुकडे झाले. मग आपल्या तोंडाचें बोळकें उघडून सिंहमहाराज ओरडले,—

" काय रे क्षुद्र प्राण्या, कां माझी झोंप मोडलीस ? कां ? कां झोंप मोडलीस माझी ? आतां तुला मी क्षणार्धांत ठार करतों...What do you mean ? ऑं :! " बोलतांना सिंहाच्या तोंडांतला सुळा प्रकाशांत उर्मटपणें चकाकत होता. मघांशीं अर्धवट मिटलेला त्याचा डोळा आतां अर्धवट उघडा होता...

बापड्या उंदराची घाबरून अगदीं गाळण उडाली. कल्हईवाल्याच्या भात्यासारखी त्याची छाती खालींवर होऊं लागली.

" सिंहमहाराज, जाऊं द्या एक वेळ मला. गरिबाला सोडून द्या. मी निश्चित कधींतरी तुमच्या उपयोगीं पडेन. तुमचे उपकार कधींहि विसर-णार नाहीं." लाचारीच्या शब्दांचीं बद्द आणि गुळगुळीत नाणीं त्यानें सिंहापुढें टाकलीं.

सिंह कांहींसा गरीब आणि बराचसा मूर्ख होता. उंदराचें बोलणें ऐकल्यावर अचानक आकाशांत ढग यावे तशी सिंहाच्या मनांत दया आली. आणि त्यानें उंदराला सोडून दिलें. उंदीर आनंदानें नाचत घरीं आला. शाळा सुटल्यावर मुलें घरीं येतात तसा.

नंतर एकदां तोच सिंह पारध्यांनीं टाकलेल्या जाळ्यांत अचानकपणें सांपडला. आरडाओरडा करून तें सारें अरण्य त्यानें अगदीं डोक्यावर घेतलें. लहान मूल खेळांतलें घर उचलून घेतें तसें.

तितक्यांत तो उंदीर कुठून तरी तिथें धांवत आला. उन्हाळ्यांत धांवत येणाऱ्या सरीसारखा अवचित. त्याला पाहून सिंहाच्या डोळ्यांत आनंदाच्या चांदण्या चमकल्या. सुखानें त्याला घेरी आली.

मग उंदरानें भराभर तें जाळें तोडलें. अवघड, किचकट गणित हुशार विद्यार्थ्यानें सोडवावें तसें. जाळें तोडून त्यानें सिंहाची सुटका केली.

क्षितिजाच्या टोपलींत वेटोळें घालून बसलेल्या वाऱ्याला फार आनंद झाला. आपल्या मोठ्या ढेरीवरून त्यानें हात फिरविला, आणि एका कल्पनेनें टुणकन् त्याच्या डोक्यांत उडी मारली. मग तो धांव धांव धांवला. धांवतांना त्यानें अनेक ढगांच्या टोप्या उडवल्या. कांहींचीं नाकें ओढलीं. कांहींचे कान लांब केले. आणि मग सगळ्यांना तो सांगत सुटला. उंदराचें कौतुक !

पु. भा. भावे

# केसरी नि मूषक

एकदां वनराज केसरी दुपारच्या वेळीं एका डेरेदार वृक्षाखालीं विश्रांति घेत पहुडले होते. इतक्यांत एक मूषक आला नि त्यांच्या अंगावर खेळूं लागला. त्यामुळें वनराजाची निद्रा चाळवली. क्रोधाविष्ट होऊन त्यानें मूषकाला पकडलें. आतां केसरी त्याला ठार करणार, इतक्यांत गयावया करीत तो मूषक म्हणाला,—

" सिंहमहाराज, तुम्ही सर्व अरण्याचे मालक. मेहेरबानी करून एक वेळ मला माफ करा. परत असा गुन्हा केल्यास आपण मला जबाबदार धरून खुशाल ठार मारावें."

" खबरदार—नव्हे खामोष—नव्हे सावधान ! " सिंह ओरडला. " अरे, तूं म्लेंच्छ कीं फिरंगी ? मालककरितां धनी, मेहेरबानीकरितां कृपया, माफकरितां क्षमा, परतसाठीं पुनश्च, आणि जबाबदारकरितां उत्तरदायी हे शब्द योजून हेंच वाक्य परत म्हण."

उंदरानें तसें केल्यावर केसरीजी म्हणाले,—

" अरे मूषका, मीं तुला मुक्त कां करावें हें कृपया सांगशील काय ? "

उंदीर म्हणाला, " धनी, आपल्यावर कधीं विपत्ति आली तर खात्रीनें (जीभ चावून)—निश्चयानें मी आपल्याला तींतून मुक्त करण्याची पराकाष्ठा करीन."

सिंहराव हंसला नि म्हणाला, " तूं रे माझी काय सेवा करणार ? तरी मी तुला मुक्त करतों. उपद्रव देणाराचा वध करायला मी काय यावनी संस्कृतीचा पाईक आहें ? असो. पण तूं चाकरीला कुठें असतोस ? वेतनमान आदि कसें आहे ? महर्घतेचा तुला उपद्रव होत असेल नाहीं ? "

" गोखले पथावरील शेठजींच्या विकानांत मी विनामूल्य सेवा करतों... खरोखर सिंहरावजी, आपण धन्य आहांत. आपल्यासारखा पूज्य मान्यवर शोधतां गवसायचा नाहीं...ठीक तर. येतों मी. शुभवासर..."

पुढें योगायोगानें हाच सिंह एका जाळ्यांत फसून सांपडला. त्याची गर्जना ऐकून उंदीर त्वरेनें तेथें आला आणि आपल्या अणकुचीदार दांतांच्या साहाय्यानें तें जाळें तोडून त्यानें सिंहाची मुक्तता केली. मग तो म्हणाला,—

" पूज्य सिंहराव, माझ्यावरचें उत्तरदायित्व मीं पार पाडलें. आपल्याला आतां तक्रार करण्यास— नव्हे, तंटा करण्यास जागा नाहीं. मी आतां विकानांतील चाकरीवर उपस्थित होण्यासाठीं जातों."

गुंडी दाबल्यावर विद्युद्दीप उजळावा त्याप्रमाणें केसरी हंसला आणि वीरोचित पदन्यास करीत तेथून चालता झाला.

●

## द. मा. मिरासदार

# शेवट

दुपारचे बारा वाजले असावेत. ऐन उन्हाळ्याच्या कडाक्यानें धरणी नुसती तापली होती. तिच्यांतून निघणारे वाफारे नाकाला जाणवत होते. वारा अगदीं पडला होता. आई मेल्याप्रमाणें गपचिप होता. झाडें पण गप् उभीं होतीं. मध्येंच एखादी फांदी सळसळे, पण वारा कांहीं अंगापर्यंत पोंचत नव्हता आणि अंगाची काहिली कमी होत नव्हती. सारें अरण्य कसें निपचित पडलें होतें.

एका वृक्षाच्या छायेंत सिंहमहाराज पहुडले होते. "जिवाची लई कासाविशी होतेया. घडीभर पडतों जरा सावलीला. तंवर संभाळ काटर्यास्नी." असें धनिणीला सांगून ते आराम करायला आलें होते.

इतक्यांत खेळतखेळत एक उंदीर तिथें आला. हा उंदीर माण नामक देशांतला असून दिसायला अगदीं अप्रतिम होता. या उंदरानें सिंहाच्या अंगावर खेळून त्याची झोंपमोड केली. सिंहमहाराज कातावले. शेरडीच्या पिल्लाला उचलावें तसें त्यांनीं बखोटीला धरून त्या पिल्लाला उचललें. आणि ते ओरडले,—

"काय रं भाड्या, लई तरास देतुयास ! धरूं का रं तुला दाढंला ? दाढंलाबी लागायचा न्हाईंस म्हना तूं !...." यामुळें उंदीर इतका घाबरला कीं त्याला मुतायलाच झालें. सिंह तें पाहून गदगदून हंसला आणि पचाक्-कन् थुंकला. आपली मांडी कराकरा खाजवूं लागला.

सिंहाचा अवतार पाहून उंदीर पार घाबरला. त्याच्या तोंडून शब्द फुटेना. शेवटीं गयावया करून तो म्हणाला,—

"सिंव्हम्हाराज, असं सुदिक करूं नका. पोरंबाळं दुवा देतील बगा. म्यांबी तुमच्या कंदीना कंदी तरी उपेगी पडनच पडन. राइट करेट सांगतों पघा. इकतीसुद्धां मिष्टिक् न्हाई यामंदीं."

"गप्पा बरीक चांगल्या हाणतोस कीं रं गड्या ! मामलेदाराच्या कारकुनावानी बोलतुयास. बोलन्यांतबी विंग्रजी शब्द. अपटुकेट साह्येब

हायेम जनूं शेरांतला ! " असें म्हणून सिंह इतक्या मोठ्यांदां हंसला कीं त्याच्या नाकांतला पातळ पदार्थच बाहेर आला. " जा रं. तुला एक वेळ जित्ता सोडतों. परत इकडं फिरकलास तर टांगडंच मोडीन. याद राखून ठेव ! येशील का परत या बाजूला ? "

" अरारारा, हें काय इचारनं झालं म्हाराज. परत इकडे म्हनून यायचा न्हाई. इक्तं आर्जंट काम आमाला कशापायीं पडतंया ? " असें म्हणून उंदीर घुमाट पळाला.

यानंतर एकदोन पावसाळे गेले. एकदां जाळ्यांत सांपडलेल्या सिंहाचें ओरडणें ऐकून उंदीर तेथें आला आणि कचाकच जाळें तोडून त्यानें सिंहाला मोकळें केलें.

—पण गंमत अशी कीं, हा सिंहहि वरच्या गोष्टींतला नव्हता आणि त्याला सोडविणारा उंदीरहि. केवळ पुढें दिसेल तें चावायचें आणि त्याचे तुकडे करायचे या स्वभावधर्माप्रमाणें उंदरानें तें जाळें तोडून टाकलें होतें.

●

## नवशैली

## व्यथा

उन्हाळ्यांतला एक दिवस. तापलेला, पोळलेला. होरपळणारें शरीर. त्यांत होलपटणारा जिवाचा ससा. मनाचें कबूतर.

एक अरण्य. निबिड. भयंकर. त्या अरण्यांतील एक झाड. आगळें नि वेगळें. दाट छायेचें. त्या छायेला झोंपलेला एक सिंह. दमलेला. श्रमलेला. उन्हाळ्यांत शिजणाऱ्या मुंबईकरांना त्याच्या व्यथेची कल्पना यावी.

दुपारच्या वेळीं बाहेर पडलेला एक उंदीर. व्रात्य. कांहींसा खेळकर, बराचसा खोडकर. असा ... त्यानें चाळवलेली सिंहाची झोंप.

सिंह रागावला. त्याच्या डोळ्यांतून ठिबकलें. रक्त. रागाचें. ज्वाला. हिरव्यानिळ्या.

" माझ्या सहनशक्तीची ही सीमा. तूं आतां मरावेंस. सान्त आणि अनन्त यांतलें अंतर. जीव घेणारें. तुला कळावें.,"—सिंह.

" या घाणेरड्या अरण्याला लागलेलें आपण एक उजळ गालबोट. आम्ही त्यांतले दगड. पण आम्ही कंटाळवाणे असलों तरी निरुपयोगी ठरूं नये. आम्हीं आपल्याला त्रास दिला ही आमची मर्यादा....एकच विनंति. मुक्तीची."—उंदीर.

" रागानें मनांत घेतलेला आकार. पण तो शमावा. आपल्या म्हणण्यांतला आशय जाणवला. टोंकदार. त्याचा आकार आणि रेषा समजल्या. जीवदान दिलें. तुला....निरोप....तीन अक्षरांत निर्माण होणारी थरथर. तूं आतां जावेंस."

असाच एक दिवस. भुंडा. सिंहगर्जना. उंदरानें ऐकलेली. आकाशाला तडे पाडणारी. जाळ्यांत सांपडलेल्या सिंहाचें उंदराला झालेलें दर्शन. बोचलेली आठवण. उपकार फेडण्याची.

कुरतडून उंदरानें तें जाळें तोडलें. सिंहाला परत मिळालें. स्वातंत्र्य.... हरवलेलें...जाळ्यांत गुदमरलेलें.

सिंह आनंदला. त्याला हवें होतें तें मिळालें होतें. पण मिळालें होतें, तें आतां नको वाटलें. जाळ्यांत सांपडण्यापूर्वीची आठवण...त्याला टोंचूं लागली. कसली तरी व्यथा. गहिरें दुःख. हृदयांत खोल खोल कुठेंतरी सलणारें....

जातांना तो म्हणाला,

" उंदरा, आभार. आभाराचे शब्द अशा संदर्भांत दगड बनतात. पण या दगडांनाहि वाचा फुटावी. कधीं तरी..."

◎ ◎ ◎

५

# अपचन आणि सामाजिक आशय

लेखनाचे एकंदर चार प्रकार शिष्टमान्य व्हावेत. एक गंभीर-गंभीर, दुसरा विनोदी–विनोदी, तिसरा गंभीर–विनोदी आणि चौथा विनोदी–गंभीर. यांत आणखी पोटप्रकार असूं शकतील. वरील प्रकारांना आपण जर गं$^{१}$ आणि गं$^{२}$ व वि$^{१}$ आणि वि$^{२}$ म्हटलें तर या इतर प्रकारांना गं$^{३}$, गं$^{४}$, गं$^{५}$ ... गं$^{न}$ त्याचप्रमाणें वि$^{३}$, वि$^{४}$, वि$^{५}$... वि$^{न}$ असें म्हणतां येईल.

आजच्या लेखाचा जो विषय आहे तो गं$^{१}$ या विभागांत मोडतो. गं$^{२}$ या दृष्टीनें या लेखाकडे पाहिल्यास तो फसल्यासारखा वाटेल. वि$^{१}$ या दृष्टीनें पाहिल्यास तो पसरल्यासारखा वाटेल. वि$^{२}$ या दृष्टीनें त्यास टोंक नाहीं असें वाटेल. गं$^{१}$ या एकाच दृष्टीनें पाहिलें असतां त्यांच्यांतील थेट-पणा आणि प्रत्यायक भेदकपणा आपणांस जाणवेल. परंतु, गं$^{१}$ वरील लेखाकडे गं$^{२}$, वि$^{१}$ किंवा वि$^{२}$ या दृष्टिकोणांतून पाहणें हेंच स्वतःला फसवून घेण्यासारखें आहे. तशा दृष्टिकोणांतून हा लेख पाहिला जाऊं नये ही प्रामाणिक इच्छा. विनंति.

आजच्या कथेंतील सामाजिक आशय हा या लेखाचा विषय. कथेंत सामाजिक आशय असावा याबाबत कांहीं फारसें दुमत होईल असें वाटत नाहीं. 'फारसें' हें येथें महत्त्वाचें आहे. सुप्रसिद्ध 'भोंगळे संशोधनसंस्थे'नें याबाबत केलेल्या संशोधनाची माहिती अशी :

शेंकडा १०० टक्के लोकांना सामाजिक आशय म्हणजे काय हें माहीत नसतें.

शेंकडा ७ टक्के लोकांना सामाजिक म्हणजे काय एवढेंच माहीत असतें.

शेंकडा ·००००१७५ लोकांनाच ‘ आशय ’ याचा कांहींतरी अर्थ माहीत असतो. या हिशेबानें अवघ्या महाराष्ट्रांत ( पुणें, मुंबई, विदर्भ, मराठवाडा, कारवार, बेळगांव, निपाणी, भालकी इ. इ. इ. सह ) हा अर्थ समजणारे फक्त ३।। लोक निघतात. यांतील अर्ध्याला आशयांतील ‘ आ ’च फक्त समजतो. सामाजिक आशय याचा ‘ खरा ’ माहीत असलेला एकच माणूस जिवंत होता. तो नुकताच या आशयांत बुडून मरण पावला.

शेंकडा १०१ टक्के लोकांच्यांत ‘ सामाजिक आशय ’ म्हणजे काय, याबाबत तीव्र मतभेद असतात. सामाजिक आशय म्हणजे काय, याविषयींचें अज्ञान या मतभेदाच्या आड येऊं शकत नाहीं. मत असण्याचा ज्ञान असण्याशीं कांहीं संबंध नसतो असें पूर्वींच्या संशोधनांतून आढळून आलें आहे.

शेंकडा ९८½ टक्के लोकांच्या मतें सामाजिक आशय लेखनांत असणें आवश्यक आहे. उरलेले दीडशहाणे लोक उरलेल्या दीड टक्क्यांत समाविष्ट आहेत.

चौदा वर्षांखालील मुली आणि मुलें यांतील ६० टक्के मुलांनीं सामाजिक आशय हवा असल्याची मागणी केली. ( मुलींच्यांत ही जाणीव दिसली ही तर विशेष आनंदाची गोष्ट आहे ! ) २० टक्के मुलांनीं ‘ थामादित आथय नतो ’ म्हणून आवर्जून सांगितलें. हीं मुलें २ ते ४ वयाचीं व बोबडीं होतीं. वय वर्षें दोनपर्यंतच्या मुलांनीं ‘ सामाजिक आशय ’ असें म्हणतांच रडून कल्लोळ केल्यामुळें त्यांचीं मतें कळूं शकलीं नाहींत. शिवाय या मुलांना नीट बोलतांहि येत नव्हतें.

या टक्क्यांची बेरीज करतां महाराष्ट्रांत २०० टक्क्यांपेक्षां जास्त लोक आहेत असें दिसेल. अर्थात्, हें बरोबरच आहे. नाहीं तरी महाराष्ट्रांतील लोकसंख्या जरा जास्तच आहे. शिवाय एकाच माणसाला महाराष्ट्रांत अनेक मतें असूं शकतात व आंकडेशास्त्र हेंहि नाहीं म्हटलें तरी एक गमतीचें शास्त्र आहे.

फारसें दुमत होण्याचें कारण नाहीं, असें जें म्हटलें याचा अर्थ शेवटीं एवढाच, कीं व्यक्ति तेवढीं मतें असल्यामुळें शक्यतों मतभेद होऊं नयेत. अर्थात् कांहीं थोड्यांजवळ सदसद्विवेकबुद्धि असल्यामुळें त्यांपैकीं प्रत्येक

व्यक्तीचें स्वतःचें एक आणि तिच्या सदसद्विवेकबुद्धीचें दुसरें मत असण्याचा संभव. पण सुदैवानें अशा व्यक्तिच थोड्या. त्यामुळें एकदोन टक्क्यांचा फरक पडावा.

सामाजिक आशय म्हणजे काय याविषयीं समाजाचा, जनताजनार्दनाचा कौल घेणें हेंच इष्ट वाटावें. पण तें या बाबतींत जमणें कठीण. म्हणून येथें स्वतःचींच कांहीं मतें मांडण्याचें हें धाडस.

सामाजिक आशय म्हणजे काय याबद्दलचें आमचें मत नंतर पाहूं. पण तो निदान शहरी मराठी कथेंत नाहीं असें आमचें निश्चित मत आहे. नवकथा, नवकथा म्हणून तिचें एवढें स्तोम माजविलें जाऊनहि छटाक, नवटाक, सामाजिक आशयसुद्धां तिच्यांत असूं नये यासारखी खेदाची गोष्ट दुसरी कोणती असेल ?

बहुतेक शहरी कथा मानसिक-वातावरणप्रधान असतात (याला आमचे इंग्रजांच्या तोंडानें पाणी पिणारे लोक 'मूड क्रिएशन्' असें म्हणतात. आम्ही त्याला 'मड् क्रिएशन' म्हणतों ). वास्तविक, वातावरण निर्माण करणें हें ईश्वराचें काम असून त्याचा अभ्यास करणें हें हवामानशास्त्रज्ञाचें काम आहे. येथें कथालेखक कसा येऊं शकतो हेंच आमच्या अल्पबुद्धीस समजत नाहीं. अर्थात् हें वातावरण निर्माण करण्याच्या हेतूनें कां होईना, पण लेखक व्यक्तींचें हें रसायन त्यांत वापरतात. मात्र व्यक्ति ही समाजाचाच एक भाग असल्यामुळें तिच्यांतून समाजदर्शन होईल अशी शंकासुद्धां नको. कारण व्यक्ति असलेली शहरी कथाहि व्यक्तित्वहीन असूं शकते: कांहीं शहरी कथांचीं नुसतीं नांवें पाहिलीं तरी हें आपल्या लक्षांत येतें.

**रिक्ता, रिकामा, अपुरा, रिता, अपुरी,**
**रिकामी, एकटा, खुळी, एकटी, खुळा.**

अगोदरच व्यक्ति एक. त्यांत ती रिक्त किंवा अपुरी किंवा खुळी. सामाजिक आशय यांत यावाच कसा ? ह्या लेखकांनीं अर्ध्या, पाव अशा माणसांवर लिहायचेंच काय तें बाकी ठेवलें आहे.

या दृष्टीनें ग्रामीण कथेकडे पाहतां तिनें केवढातरी सामाजिक आशय कथेला दिला आहे. ('एवऽऽवला मोऽऽथ्था '.....भोंगळे संशोधन संस्थेच्या अहवालांतील एका बालकाचे हे बोबडे बोल. बोलतांना

या मुलानें आपले चिमुकले हात शक्य तितके पसरले होते. या दोन हातांतील अंतर २ फूट ११।। इंच भरलें.) ग्रामीण कथांतून नेहमींच चावडी, पार, शाळा, देऊळ, जत्रा, बाजार इत्यादि सार्वजनिक ठिकाणांचें चित्रण आढळतें. शहरी कथेंतहि सार्वजनिक स्थळांचीं चित्रें असतात; पण तेथें व्यक्ति आणि समाज एकरूप झालेलीं नसतात. गाडींतून प्रवास करणारी स्त्री, किंवा गर्दीतून वाट काढणारा माणूस, किंवा गजबजलेल्या ऑफिसांत काम करणारा तरुण हीं पात्रेंसुद्धां शहरी कथेंत एकटींच असतात. ग्रामीण व्यक्तींचा जसा 'कालवा' तयार होतो तसें यांचें होत नाहीं. गाडीपासून, गर्दीपासून, ऑफिसापासून दूर पळण्याची या लोकांची धडपड असते. अशा पलायनवादी नायक-नायिका आणून कथेंत सामाजिक आशय कसा येणार? या व्यक्ति समाजाला बाहेरून चिकटविल्यासारख्या वाटतात. समाजाचाच त्या एक भाग आहेत असें मुळींच वाटत नाहीं. आश्चर्याची आणि खेदाची गोष्ट अशी कीं, नवकथा-लेखकांना याचें कांहींच वाईट वाटत नाहीं. हे न. क. ले. दोन्ही हात हवेंत उडवून म्हणतात, "या व्यक्ति एकट्या किंवा अपुऱ्या आहेत म्हणूनच आमचे कथाविषय होऊं शकल्या आहेत!" आतां काय म्हणावें या लेखकांना! सामाजिक आशयाच्या नांवानें शून्य आणि शिवाय बोलतांना वर हें औद्धत्य. या सामाजिक-आशयशून्य लेखकांना आणि त्यांच्या कथांना सुज्ञ मराठी वाचकहि डोक्यावर घेऊन नाचतो, यांतील सामाजिक आशय आम्हांला चिंता-

या विवेचनावरून सामाजिक आशय म्हणजे काय याची कांहींशी कल्पना वाचकांना आली असेल. सामाजिक आशय असलेली कथा म्हणजे जनताभिमुख कथा होय. लोकांची, लोकांच्यासाठीं, लोकांनीं लिहिलेली—अशा कथेंतच सामाजिक आशय असतो. जनतेकडे पाठ फिरवलेल्या, जनतेपासून दूर पळणाऱ्या भीरु, पळपुट्या नवकथेंत तो येणें अशक्य आहे. नवकथेची वरील प्रकारें व्याख्या करावयाची झाल्यास 'खुळ्यांनीं, खुळ्यांकरितां लिहिलेली खुळी कथा' अशी करतां येईल.

नवकथा लिहिणारे सर्वच लोक कांहीं वेडे किंवा प्राध्यापक नाहींत. त्यांतल्या कांहींनीं मार्क्सवाद वाचलेला असतो. आश्चर्य म्हणजे तो

कांहींना समजलेलाहि असतो. अशा परिस्थितींत समाजाच्या आर्थिक स्थितीचें कांहीं विदारक आशयपूर्ण चित्रण यांच्या कथांतून येईल अशी आपली अपेक्षा असते. पण—

शहरी कथेंत खरें दारिद्र्यवर्णन अभावानेंच तळपतें. कारण, आर्थिक दारिद्र्य त्यांत गृहीतच धरलेलें असतें. आणि आपल्याला दिसतें तें मनाचें दारिद्र्य. उदाहरणार्थ, मराठी कथेच्या एका शंकराचार्यांनीं लिहिलेल्या 'किडके लोक' या कथेंत एका घरांतील लोकांच्या किडलेल्या मनाचें दर्शन होतें. येथें खरें तर या लोकांच्या मनांचें (किंवा लेखकांचें) दारिद्र्यच दिसतें. आतां लेखकांच्या दारिद्र्यांत नवीन तें काय सांगितलें ? वाचक म्हणतो, "हें तर आम्हांला माहीतच होतें."

याउलट ग्रामीण कथेंत मात्र आपल्याला खरेंखुरें दारिद्र्य दिसतें. 'लक्तरें' अशीं फसवीं नांवें नवकथेला देऊन तिच्यांतलें दारिद्र्य लपत नाहीं. तर हें नांव न वापरतांहि ग्रामीण कथेंत गांवाकडचें दारिद्र्य उघडें होतें. या कथेंत दारिद्र्यामुळें होणारी गांवच्या लोकांची पिळणूक (तेल गाळण्याच्या चरकाच्या पार्श्वभूमीवर ही पिळवणूक बोचरी व प्रत्ययकारी होते), त्यामुळें निर्माण होणारे तंटेबखेडे, मारामाऱ्या, दारू, गांजा यांसारखीं व्यसनें, बायकांचा छळ, लोकांची उपासमार, कर्जे-खटले यांचीं प्रत्यायक वर्णनें येतात व त्यांना केवढा तरी उंच व खोल सामाजिक आशय प्राप्त होतो.

आशयाची उंच आणि खोल पातळीच नेहमीं गांठली पाहिजे असा कांहीं आमचा हट्ट नाहीं. कांहींशा खालच्या पातळीवरसुद्धां हा आशय ग्रामीण कथेंत अवतार घेत असतो. ग्रामीण चुटके, चवदार किस्से, लफडीं, भानगडी, व्यभिचार, चावडीवरील गप्पाटप्पा, भुताखेतांच्या गोष्टी यांतून-सुद्धां एक वेगळाच आशय निर्माण होतो. खेदाची गोष्ट अशी कीं, तथा-कथित श्रेष्ठ लेखक नागरी कथेला लाभले असूनहि सगळीकडे कोंडून राहिलेला सामाजिक आशय तिच्यांतून प्रकट होत नाहीं. या कथेंतहि उपासमार, द्वंद्वें, व्यसनें, व्यभिचार इत्यादि प्रकार नसतात असें नाहीं. पण ते सगळे मानसिक स्वरूपाचे असतात. वैचारिक उपासमार, वैचारिक द्वंद्वें व मानसिक व्यभिचार यांतून सामाजिक आशय कसा निर्माण व्हावा ? स्वतः-

शींच कुढणाऱ्या, विचारांचा कापूस पिंजणाऱ्या या नायक-नायिकांना अंबर चरख्यावर सूत काढायला लावलें पाहिजे; आणि भावनांचा तोच तोच काथ्याकूट करणाऱ्या या लोकांना तागाच्या गिरणींत किंवा काष्ठौषधीच्या दुकानांत कामाला लावलें पाहिजे. असें केलें तरी खूपसा सामाजिक आशय निर्माण होईल. पण तें कसें शक्य व्हावें? कारण या कथांतले सर्व लोक कर्तृत्वशून्य, स्वतःशींच बडबडणारे, स्वतःच बुडून जाणारे असे असतात. त्यांच्यांतील सामाजिक आशय शोषून घेणारा, नागरी पात्रांना आणि त्यांच्या जन्मदात्यांना लागलेला हा रोग कधीं नाहींसा होईल तो सुदिन!

ग्रामीण लेखकांना अशी काय किमया साधली आहे कीं ज्यामुळें त्यांच्या कथेचा पदर ओढीत सामाजिक आशय तिच्या मागोमाग धांवत येतो! अनेक ग्रामीण कथांचा अभ्यास करून आमचें असें ठाम मत झालें आहे कीं, व्यक्ति आणि समाज यांना जोडणारी सांखळी म्हणजे 'तंबाखू' ही वल्ली होय. चावडीवर मंडळी गप्पांसाठीं जमली म्हणजे प्रथम चंच्या उलगडतात, पिशव्या सुटतात, तंबाखू हातांत घेतली जाते, तिला चुना लावला जातो. तंबाखूची पिशवी, चुन्याची डबी या सर्वत्र फिरतात. तंबाखूचे बार भरले जातात, तंबाखूबरोबर पानेंहि खाल्लीं जातात. गालफडांतून पानतंबाखू फिरूं लागतात, मुखरसानें भिजलेलीं संभाषणें होऊं लागतात, पिचकाऱ्या हाणल्या जातात, छानदार रंगरंगोटी होते आणि गप्पा सुरू होतात.

"आयला, त्या जोशी मास्तरानं शिंदाच्या मुलीला फूस लावून पळवल कीं..." लक्ष्या जाधव एक लांबलचक पिचकारी हाणीत बोलतो.

"तू काय. हीं बामनं अलीकडं फार माजल्यातीं." बापू पवार कानकोरण्यानें दांतांतला मळ काढीत म्हणतो.

"या भडव्याला पकडून दावलीं पायजेत् सूर्याचीं पिल्लं. डोळं मिटून दूध पितो. म्हनाव दांडकं नाहीं पाहिलं का गा?"

"या बामनाचं चुकलंच म्हना. पन तिनं तरी काय करावं म्हंता? बाप गांजेकस आन् आई बाहेरख्याली. एक भीक मागूं दीना, दुसरं जेवूं घालीना..."

"मी तर म्हंतो ह्ये फौजदारीचं लिगाड बी त्या नाना कुलकर्ण्यांच्या गळ्यांत बांधावं. बसूं द्या लढत कोंबड्यावानी..."

"ही अगदी बेष्ट आयड्या काडली तुमी..."

तेवढ्यांत कोणीतरी येऊन वरडतं.

"झाला ख्योळ खल्लास...एकदम खल्लास...."

"आरं, म्हंजे काय बोलतुयास?..."

"न्हाई म्हंजे अगदीं खल्लासच. अगदीं इचारायलाच नको...."

"आरं पन वरडतोयस् का निस्तं बेंबीच्या देठापास्नं? सांगशील का न्हाई काय झालं गा?" नाना पाटील काडीनं बेंबींतला मळ काढीत म्हणतो.

"अवो, काय सांगूं न् काय नगो. रामा पवारानं दारू पिऊन बाइलीला मारलं आणि ठारच केलं न्हवं का? मरनाच्या पंथालाच लागलीय ती."

"थुत् तेच्या. मग त्यांत काय येवडं जगावेगळं झालं? बस्. उगी डोक्यांत राख नगो घालूं. तुपल्या बायकोला तूं हानतच नसशील कीं? बस. बस. पान खा वाईच..." नामा पाटील फक्कन् हंसतो आणि उघडी मांडी कराकरा खाजवीत बोलतो.

पहिल्या प्रसंगांत ब्राह्मण मास्तरानें मराठ्याच्या मुलीला पळवलें, ब्राह्मण हे फार माजले आहेत हा आशय तयार झाला. जातिजातींत निर्माण होणारी कटुता आणि कोर्टकज्ज्यांची हौस यांचें दर्शनसुद्धां त्यांत होतें. ग्रामीण आर्थिक परिस्थितीवर केवढा भेदक प्रकाश येथें टाकला आहे! (मार्क्सवाद अर्धाकच्चा कां होईना, पण माहीत असलेले प्राध्यापक वर्ग-कलहाचें चित्र आपल्या कथांतून निर्माण करण्याऐवजीं पैशामुळें नवरा-बायकोंत होणारीं क्षुद्र भांडणें रंगविण्यांत स्वतःला धन्य मानतात. 'कलह' याचा अर्थ हाच का? आणि 'वर्गकलह' म्हणजे काय शाळेच्या वर्गात चालणारे कलह असें कां यांना वाटतें?) त्याचप्रमाणें ग्रामीण जनतेचा नैतिक प्रश्न किती गुंतागुंतीचा होत चालला आहे याचीहि खोचक जाणीव येथें आपणांस होते. दुसऱ्या प्रसंगांत दारू पिऊन नवऱ्यानें बायकोला

निर्दय मारहाण केली; लोकांनीं ही बातमी मोठ्या चवीनें ऐकली व तिच्याकडे सहजासहजीं दुर्लक्ष केलें हा भेदक सामाजिक आशय जाणवतो.

अगदीं वरवर पाहिलें असतांहि एवढा सामाजिक आशय आपल्याला दिसतो. पण जरा शोधक दृष्टीनें आणखी खोल पाहिलें तर आणखी बऱ्याचशा आशयाचें लोणी आपल्या हातीं लागतें. वैयक्तिक आशय जाऊन सामाजिक आशय येतो तोसुद्धां कलात्मक पद्धतीनें. नकळत. पाऊल न वाजवितां.

वरील प्रसंगांतलें खोल सामाजिक आशयाचें स्वरूप असें :

(१) ग्रामीण लोकांना आरोग्याचें शिक्षण दिलें जात नाहीं, ते अस्वच्छ राहतात व त्यामुळें गांवाचें आरोग्य बिघडतें. ( उदा० पान खाणें, पचापचा थुंकणें, कानकोरण्यानें दांत कोरणें, मांडी कराकरा खाजविणें इ. इ. )

( २ ) ग्रामीण विभागांत स्त्रीविषयक जुन्या समजुती अजून तशाच कायम आहेत. ( पाटलाचें पान खाणें हें मरणाच्या पंथाला लागलेल्या बाईला वांचविण्यापेक्षांहि महत्त्वाचें आहे. )

( ३ ) खेडेगांवांत लोकांना पुरेसें काम न मिळाल्यामुळें गप्पा मारायला फार वेळ मिळतो. खेड्यापाड्यांत पसरलेली बेकारी यांतून स्पष्ट होते.

( ४ ) येथील लोकांना सभ्य भाषेंत बोलायची संवय नसते. शिव्यांचा सर्रास उपयोग हे लोक करतात. ( शिव्या देण्याचीच काय ती ' समसंधि ' यांना मिळते. पण इंग्रजी शिव्यांवर मात्र वरच्या वर्गांचीच ' मिरास ' टिकून राहते. ) गांवचा पाटीलसुद्धां ' भडव्या ', ' आयला ', ' मायला ' अशा शिव्या देतो. ( खरें म्हणजे या विभागांत शिव्यांना इतकें सामाजिक महत्त्व आहे कीं, शिव्यांतील सामाजिक आशय या विषयावर ' मावळ तालुक्यांतील श्या : उद्गम आणि विकास ' अशा स्वरूपाची ग्रंथरचना होणें आवश्यक आहे. )

वानगीदाखल वर फक्त दोन उदाहरणें घेतलीं आहेत. पण त्यावरून शब्दाशब्दागणिक सामाजिक आशय ग्रामीण कथेंत कसा ठांसून भरला आहे हें लक्षांत येतें.

याउलट एका नवकथेंतील खालील उतारा पाहा—

" मीना....मीना..."

" उं... ऽऽ " फक्त एवढेंच.

" मीना...मिनु...मिनी...मिने...मिन्या...मिनट्ले...." त्याची आंतरिक तिडीक शब्दरूप होत होती.

" ऊंऽऽऽ. गुर्र्र्....."

" ए मिन्या...म्यांऽऽउ....म्यांऽऽऽऊं.. " तो म्हणाला. भावनांचा स्फोट होऊं न देतां तो त्यांना बांध घालण्याचा नेटका प्रयत्न करीत होता.

मग ती कॉटवरून उठली आणि स्वैंपाकघरांत निघून गेली. त्याला सगळी खोली, सगळें जग रितें, उणें, भकास वाटूं लागलें....

यांतील सामाजिक आशय समजणें कठीण आहेच, पण उंऽऽऊं... करणारें हें दुसरें पात्र स्त्री आहे कीं मांजरी आहे हेंसुद्धां कळत नाहीं. आणि तिच्याशीं गुंजन करणारा तिचा नवरा कीं प्रियकर, कीं बोका आहे हें पण कळत नाहीं.

आणखी एक संवाद पाहा—

" अं हं...हें अगदीं बरोबर नाहीं. इथं फार घाई होते आहे...फार फार घाई होते आहे."

" उंः घाई होते आहे म्हणे...भ्याड...भ्याड. भितरी भागुबाई कुठली..." आतां चारमिनार सिगरेट पेटली होती. धुराचे भपकारे सुटत होते.

" डॅम् इट्...डॅम् इट् ऑल्...आय कांट गेट इट्....आय... "

" यू इडियट्....डर्टी इडियट्...यू कॉवर्ड...लिटल माउस... माउसी..."

वाचकांना आश्चर्य वाटेल. (खरें म्हणजे ज्यांना नवकथेचा परिचय आहे अशा लोकांना वाटूं नये.) पण हा संवाद दोन व्यक्तींतील नाहीं. एकाच व्यक्तीचें एक मन येथें दुसऱ्या मनाशीं बोलत आहे. मोठ्या साहेबाला भेटण्याआधीं या छोट्या साहेबाच्या मनांत चाललेलें हें विचारांचें द्वंद्व म्हणे. (हा आणखी एक किडका माणूस !)

सिगरेट्, इंग्रजी शिव्या यावरून हा कोणी विलायती साहेबच आहे आणि हा संवाद इंग्लंडांतील असावा असेंहि वाटावें. पण सिगरेट चार-

मिनार आहे यावरून हा गांवठी साहेब आहे हें तरी कळतें. नाहीं तर हेंहि कळायला मार्ग नव्हता. कोणी म्हणेल, सिगरेट म्हणजे सामाजिक आशयाचें केवळ पोतेंच असलेली तंबाखू. आणि डॅम् इट्, इडियट्, कॉवर्ड यांत शिव्याहि आल्या. परंतु अशा रीतीनें ही आशय आणण्याची केविलवाणी धडपड पाहून हंसूंच येतें. नुसती गावरान तंबाखू, पान, चुना व शुद्ध ग्रामीण टोंकदार शिव्या यांत जो थेटपणा आहे तो या विलायती तंबाखूंत आणि साहेबी शिव्यांत नाहीं, हें एखादें गांवठी पोरसुद्धां सांगूं शकेल.

वरील उदाहरणांवरून नवीन नागरी कथा ही सामाजिक आशयाला कशी पारखी होत आहे हें दिसलें. त्याचप्रमाणें ग्रामीण कथा हीच खरी जनताभिमुख कथा हेंहि जाणवलें. आतां सामाजिक आशय असलेली म्हणजेच ग्रामीण कथा (किंवा ष्टुरी) म्हणजे जनतेची, जनतेसाठीं, जनतेनें लिहिलेली कथा हें समीकरण पचणें सोपें जावें.

नवी कथा ही जनतेची नसतेच पण ती जनतेसाठींहि नसते. आमची कथा ही केवळ आमच्या समाधानासाठीं लिहिली आहे, लिहिण्यांत मिळालेला आनंद हाच तिचा खरा हेतु; इतर कांहीं समानधर्म्यांना तो मिळाला तरी त्याचें सार्थक झालें असें जॉईस किंवा इलियट्च्या ऐटूपणानें नवे लेखक वाचकांना आणि टीकाकारांना बजावीत असतात. आमचा या लेखकांना असा स्पष्ट सवाल आहे कीं, मग आपण लिहितां तरी कशाला? स्वतःचा कागद आणि शाई नासायला ते मुखत्यार आहेत. वाटल्यास आपल्या कथा त्यांनीं आपल्या पातळीच्या उच्चभ्रू लेखकांना वाचायला द्याव्या. पण या मासिकांत छापून येण्याची धडपड कां? समाजांत प्राध्यापक हे बोटांवर मोजतां येण्यासारखे असून तेली, तांबोळी, कारकून, हमाल असेच लोक जास्त असतात हें साधें सत्यसुद्धां यांना कधीं समजत नाहीं. यांची कथा जनतेनें लिहिलेली नसते हें याच कारणासाठीं उघड आहे.

चालू सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक घटना यांचा गंधसुद्धां या लोकांना असतो असें दिसत नाहीं. आतां गांधी-वधासारखी भारतालाच काय, पण जगाला हेलावून सोडणारी घटना भारतांत घडली. त्यावर काय कथा लिहितां आल्या नसत्या? पण आमच्या नवीन कथा-लेखकांना त्याचें

काय होय ? फक्त ग्रामीण कथाकारांनींच ( यांना आम्हीं इतरत्र 'छुरीकार' असें म्हटलें आहे. ) हा प्रसंग टिपून तो आपल्या कथांतून पेरला आहे. गांधीवध सोडा, भारत हा १९४७ पूर्वी परतंत्र देश होता. नंतर तो स्वतंत्र झाला, त्याची फाळणी झाली, येथें दंगेधोपे झाले, पंचवार्षिक योजना झाल्या, त्या अयशस्वी होत आहेत, महागाई वाढत आहे. पण याचें पुसट चित्रसुद्धां नवीन कथेंत कुठें आढळत नाहीं.

या लेकाच्यांना पारतंत्र्याचा राग नाहीं कीं स्वातंत्र्याचें प्रेम नाहीं. भारताला आज स्वातंत्र्य-शाहीर, योजना-शाहीर, भूदान-महाकवि, ग्राम-दान-नाटककार, समूह-विकास-कथाकार हवे आहेत.

स्वतःचीं किंवा स्वकीयांचीं किरकोळ दुखणीं, स्वतःचे हाडकुळे पगार, वैयक्तिक हेवेदावे, प्रेमप्रकरणें, प्रेमकलह यांतच गुरफटलेले हे लेखक पाहिले म्हणजे आम्हांला जमिनींत तोंड खुपसून बसणाऱ्या शहामृगाचीच आठवण होते. या सर्वांमुळें आम्ही अत्यंत चिंताक्रांत झालों, निराशहि झालों. शेवटीं याचा गं[१] या पातळीवरून विचार करतां आम्हांला एका नवीन सिद्धान्ताचा प्रत्यय आला. तो आम्ही येथें थोडक्यांत मांडतों.

या सगळ्याचें कारण या लेखकांना झालेलें अपचन हेंच असावें असा आमचा कयास आहे. आतां हें इंग्रजी वाघिणीचें दूध पिऊन झालें किंवा कसें हें सांगण्यासाठीं नवीन संशोधनच करावयास पाहिजे. पण अपचन ( chronic indigestion ) हेंच आजच्या लेखनांतील सामाजिक आशयाच्या अभावाचें कारण होय असें आम्हांस वाटतें. हें अपचन देशी उपचारांनीं जेव्हां जाईल तेव्हां सामाजिक आशयाचा सूर्य मराठी वाङ्मय-क्षितिजावर मोठ्या डौलानें तळपूं लागेल.

आमचा हा सिद्धान्त जेव्हां आम्हीं कांहीं लेखक-मित्रांसमोर मांडला तेव्हां त्यांनीं अर्थातच नाकें मुरडलीं व शेक्सपियर, मिल्टन्, शेली, कीट्स् या थोर लेखकांत सामाजिक आशय कोठें दिसतो असें आम्हांला विचारलें. आम्ही तर म्हणालों कीं, हे आंग्ल लेखकच काय पण व्यास-वाल्मीकि यांच्यांतसुद्धां तो दिसत नाहीं. पण म्हणून काय झालें ? या श्रेष्ठींना सामाजिक दृष्टि नसली ( आणि त्यांना अपचनहि झाल्याचा कांहीं पुरावा नसला )

म्हणून काय झालें? मराठी वाङ्मयांत ती यावयास पाहिजे. शिवाय मुख्य म्हणजे या लेखकांच्या वेळीं सामाजिक आशयाविषयींचा आमचा सिद्धान्तच मुळीं मांडला गेला नव्हता हेंही सुज्ञांनीं लक्षांत घ्यावयास हवें.

कोठा साफ ठेवण्याचें आमचें पथ्य पाळलें, पचनशक्ति सुधारली आणि अपचनाची तक्रार कायमची मोडली म्हणजे सामाजिक आशय आणण्याच्या युक्त्या आपोआप सुचूं लागतात. याविषयीं आमचा एकच अनुभव सांगतों.

आमच्या एका मित्रानें 'हांक' या नांवाची एक कादंबरी लिहिली. साधी तरुण-तरुणीची प्रेमकथा होती ती. गुंतागुंत-निरगांठ-उकल इ. सगळें कांहीं ठीकठाक होतें. शेवटीं नायक नायिकेला बाहुपाशांत घेतो असें दृश्य होतें व त्याच वेळीं चंद्राला ढगाबाहेर आणण्याची व्यवस्था केली होती.

सामाजिक आशय नसल्यामुळें प्रकाशकांनीं ही कादंबरी छापायचें नाकारलें. मग हे लेखक आमच्याकडे आले. सामाजिक आशयाचें आमचें वेड त्यांना माहीत होतें. आणि आम्हीहि कांहीं अगदीं साध्या युक्त्या वापरून चुटकीसरशीं त्यांत सामाजिक आशय आणून टाकला.

पहिलें म्हणजे कादंबरीचें नांव 'हांक' ऐवजीं 'सामाजिक हांक' असें ठेवलें. दुसरें : नायक-नायिकांच्या तोंडीं आगरकर, चिपळूणकर, लोकहितवादी यांच्या निबंधांतलीं वाक्यें घातलीं. मुळांतलीं वाक्यें अर्थात् जशींच्या तशींच ठेवलीं.

वसंता आणि शैलजा या एका प्रेमळ जोडप्याचा संवाद असा होता :

"वस्सू, मंला आज फाऽऽर कंटाळा आलाय् गडे...आज आपण फिरायला जाऊं या. कुठें तरी दूर...दूऽऽर. अं....अं?"

"छैलू, लडू नको हं बाळ. आपण किनई आज भूऽऽर ज्याऊं. हातरे काऊ. का रे आमच्या छैलूला ललवतोस?...."

यांत आम्हीं एवढाच बदल केला.

अं अं म्हटल्यावर शैलजा पुढें म्हणते....

"आजची स्त्री चूल आणि मूल यांना सोडून घराबाहेर पडल्याशिवाय तिच्यांतून नोरासारखी नवी स्त्री जन्म घेणें शक्य नाहीं." कपाळावरील घर्मबिंदु पुसत शैलू म्हणाली.

आणि वसंता उत्तरतो :

" छैलू, लडू नको हं, बाळ. आपण किनई आज भूऽर जाऊं. हात रे काऊ, काले आमच्या छैलूला ललवतोस ? शैला, तूं आज मला दिव्यदृष्टि दिलीस. तूं धन्य आहेस. नवी स्त्री धन्य आहे. चल. आपण आत्तांच्या आत्तां गोखले-हिलवर फिरायला जाऊं आणि स्त्री ही अबला आहे हें सुभाषित पुरून टाकूं. सामाजिक सुधारणेच्या नव्या मनूचें निशाण फडकवीत ठेवल्याशिवाय मराठी स्त्रीचा उद्धार होणें अशक्य आहे. अशक्य अहे..." वसंताला बोलतांना धाप लागली. तरीहि त्यानें आपलें वाक्य पुरें केलेंच.

या पद्धतीनें सगळीकडे संवाद वाढविले. मधून मधून वसंता आणि शैलजा यांना व्याख्यानांना नेलें, हिंगण्याला नेऊन आणलें, श्रद्धानंद आश्रमांत नेलें, सामाजिक प्रश्नांबाबत जाडींजाडीं पुस्तकें त्यांच्या टेबलावर ठेवून तीं वाचवून घेतलीं. उरलेलीं उशाला दिलीं. त्यांच्याकरितां मोठमोठ्या सभासुद्धां भरवल्या. आणि त्यांत सामाजिक प्रश्नांवर प्रचंड खळबळ करणाऱ्या चर्चा घडवून आणल्या.

आणि कादंबरीच्या शेवटीं मीं एक श्रेष्ठ सामाजिक बदल केला.

वसंतानें शैलजाला आपल्या बाहुपाशांत एकत्र केलें आणि त्याच वेळीं पौर्णिमेचा चंद्र ढगांतून बाहेर पडून डौलानें प्रकाशूं लागला. वसंत शैलाला म्हणाला,

" शैलू, शेवटीं आपली सामाजिक प्रीतीची हांक एकमेकांना पोचली म्हणायची. (यापुढें आम्हीं एक खिडकी उघडून टाकली व त्यामुळें) **चंद्राच्या किरणांनीं खिडकींतून खोलींत प्रवेश केला आणि त्याचा प्रकाश समोरच्या भिंतीवरील आगरकरांच्या फोटोवर पडला. आगरकर** जणूं **कांहीं त्यांना हंसून म्हणत होते, " बाळांनों, सुखी व्हा."** (जाड ठशांतील शब्द व वाक्यें आमचीं).

नवा सामाजिक आशय प्यालेली ही कादंबरी प्रकाशित होऊन हातोहात खपली हें वेगळें सांगावयास हवें काय ?...

'इतकं सोपं आहे हें सामाजिक आशय आणणं.' केवढा तरी आशय व्याख्यानांतून, ग्रंथांतून पडलेला आहे. फक्त पाट्या वाहणें हेंच काय तें लेखकांचें कार्य आहे. आमच्या या अनुभवाचा फायदा घेऊन नवीन होतकरू लेखकांनीं तरी सामाजिक आशय येनकेन प्रकारेण कां होईना पण आपल्या लेखनांत आणावा. तोळा-मासा, छटाक-नवटाक करीत करीत हें शेर-अच्छेरापर्यंत त्यांनीं वाढवावेंच असा आमचा त्यांना कळकळीचा संदेश आहे.

◎ ◎ ◎

६

# ग्रामीण ष्टुरी : योक आभ्यास

शहरी जनतेनें ग्रामीण जनतेवर मोठा अन्याय चालविल्याचें छातीठोकपणें सांगतांना कित्येक शहरी पुढाऱ्यांना आम्हीं पाहिलें आहे. तें कसेंहि असो, ही आक्रमक वृत्ति कथेच्या क्षेत्रांत मात्र अगदीं उलटी झाली आहे. नागरी कथेचा गांवाकडे उल्लेखसुद्धां झालेला आढळत नाहीं, पण ग्रामीण कथा मात्र पार शहरांत घुसली आहे. आबालवृद्धांना गांवच्या चवदार हकीकती वाचणें आवडतें, तरुण मुलींना तर ती एक फॅशन वाटते आणि ग्रामीण किस्से हे कित्येक प्राध्यापकांनाहि आवडलेले आहेत. ग्रामीण लोक ज्या नवलाईनें ' टैम ', ' कांक्रिट ' असें इंग्रजी शब्द वापरतात तसेच बोलतांना ' श्या ' वापरणारे प्राध्यापकहि आहेत.

ग्रामीण कथा म्हणजे नवकथा नव्हे हें उघड आहे. " जी कथाच नवं, ती नवकथा कशी आसल ? " हे एका ग्रामीण कथाकाराचेच उद्‌गार. म्हणूनच ग्रामीण कथेचा आगळा वेगळेपणा दाखविण्यासाठीं तिला वर ' ष्टुरी ' असें म्हटलें. अशा ष्टुरीचें ' ष्टुरीत्व ' किंवा ' किस्सात्व ' कशांत आहे हें पाहिलें पाहिजे.

पहिल्यांदाच आपल्या लक्षांत येतात त्या ' श्या ' म्हणजे शिव्या. भडव्या ( पाठभेद : भाड्या ), मायला, बायलीला, च्याबायली, इची भन, आयला, भांचोद, भोसडीचा अशा या कांहीं शिव्या. नागरी वाङ्मयांत फुल्या टाकून शिवी सुचविण्याचा जो प्रकार आहे तो परिणामकारक वाटत नाहीं. उदाहरणार्थ, ' तूं गाढव आहेस ' असें सरळ म्हटल्यास जें परिणामकारकपणें समजतें तें ' तूं ××× आहेस ' असें म्हणून कसें समजेल ? खरें तर अशा पद्धतीनें ज्यांनीं कथांत शिव्या घातल्या त्या नागरी लेखकांना

शिव्यांचें प्रयोजन समजलेलें नाहीं हें उघड आहे. भाषा अर्थघन करण्याच्या दृष्टीनें शिव्यांचा किती उपयोग होतो यासंबंधीं आणखी एक उदाहरण अभ्यास करण्यासारखें आहे. खालीं दिलेलीं दोन वाक्यें पाहा :

'रामा, ऊठ. तें काम करून टाक.' 'राम्या, ऊठ भडव्या. आयला, त्ये काम कोन तुझा बा करल व्हय्? उठतोय्स का मोडूं टांगडं?'

यांतलें कुठलें वाक्य जास्त परिणामकारक आहे, कुठलें उच्चारलें असतां रामा खरोखरच उठून काम करील हें वेगळें सांगावयास नको. "कथा प्रत्ययकारी होण्यासाठीं शिव्या सर्रास, बिनसंकोचानं वापरल्या पाहिजेत. ग्रामीण लेखनांत शिव्या न वापरणं हें सभ्यतेला सोडून आहे," असें 'ग्रामीण लघुकथा : तंत्र आणि मंत्र' या ग्रंथाच्या लेखकानें स्पष्ट म्हटलेंच आहे. हे लेखक पुढें म्हणतात : "साधारणपणें दर पॅरेग्राफमध्यें एक आणि दर संवादांत दोन तरी शिव्या यावयास पाहिजेत. शिव्या सहज दिल्या जाव्यात. कृत्रिमतेचा वासहि त्यांत असूं नये." ग्रामीण शिव्या या स्वभावतःच प्रासादिक असतात आणि त्या उच्चारतांच प्रादेशिकतेचें वलय त्यांच्याभोंवतीं फिरूं लागतें. त्यांचा ताल आणि लय लक्षांत घेऊन जेव्हां शिव्या वापरल्या जातात तेव्हां तर 'शिव्यांसारखं दुसरं प्रभावी अस्त्र असूं शकत नाहीं.'

आपलें लक्ष वेधून घेणारें ग्रामीण छुरीचें दुसरें वैशिष्ट्य म्हणजे तिच्यांतले इंग्रजी शब्द. प्राफीट, मिष्टिक, करेट, टैम, कांक्रिट, शायडी, अपटुकेट, कंप्लेट, पाइंट, एष्टी, आइल, आरगुमेंट, टिपिशन, टैट, अर्जेंट, बालिष्टर, फर्मिशन, हाल, अपीशल, ग्याट् असे हे कांहीं शब्द. या शब्दसंपत्तींत सारखी नवीनवी भर पडत आहे ही एक समाधानाची गोष्ट. ग्रामीण भाषेचें गंगाजमनी स्वरूप या अशा शब्दांच्या वापरांतून तीव्रतेनें जाणवतें. ग्रामीण लोकांचें व्यक्तिमत्त्व कित्येकदां इतकें प्रभावी असतें कीं, त्यामुळें इंग्रजी शब्दांना जो मूळ अर्थ असतो त्यापेक्षां वेगळाच अर्थ त्यांना प्राप्त होतो. या संदर्भांत एक वाक्य अभ्यासावें :

"सायबानं काय मिष्टिक केली आसल कुना ठावं. पन गड्या, विंजण फट्शिरी सुरू झालं कीं. आं:..."

ग्रामीण कथेंत मिष्टिक केल्यामुळें इंजिन सुरू होतें तें असें. एखाद्या माणसाच्या मोठेपणाचें नुसतें प्राकृत भाषेंत वर्णन करण्यापेक्षां 'सदा कुळकरनी मोठा जंक्शन मानूस' असें म्हटलें कीं कुळकर्ण्याविषयीं दहा वाक्यें लिहून जें समजणार नाहीं तें जाणवतें. एखादें काम सांगितल्यावर 'हा निघालोंच' असें म्हणण्याऐवजीं 'हा एक्स्प्रेस निघालोंच कीं' असें म्हटलें म्हणजे एक वेगळाच प्रत्यय येतो.

ग्रामीण शब्दांचा आणखी थोडा अभ्यास करायला हवा. कथेला जसा घाट असतो तसा शब्दांनाहि घाट असतो. ग्रामीण घाटाचे असे कांहीं शब्द पाहूं. नवा ग्रामीण घाट धारण केल्यामुळें शब्दांत नवेंच चैतन्य कसें येतें तें या शब्दांवरून जाणवतें.

| **नागरी** | **ग्रामीण** | **नागरी** | **ग्रामीण** |
|---|---|---|---|
| पोट | प्वॉट् | अरे | आरं |
| पोर | प्वॉर | अरेरे | अरारा ( रा रा रा ) |
| इतकं | इक्तं | अन्याय | अन्याव |
| नुकसान | नुस्कान, लुस्कान | असं | आसं |
| अरे बापरे | अग बाबौ | अरे पण | आर तिच्यामारी |
| साफ | शाप | बघितला | बघटला |
| विहीर | हीर | डोकें | डोस्कं, डोक्सं, ड्वाकं |

ग्रामीण ष्टुरिरायटरचें कौशल्य आणखी एका ठिकाणीं प्रकट होतें. नागरी लेखकाच्या मानानें अगदींच तुटपुंज्या प्रमाणांत असलेला मालमसाला (material) तो अत्यंत प्रभावीपणें वापरतो. मांडीचा उपयोग मुख्यतः कराकरा खाजविण्याकरितां होतो. चांगल्या, मजबूत मांड्या असल्या म्हणजे त्याचे पट फिरतात आणि पैलवानाची आकृति त्यामुळें स्पष्ट होते. गप्पा जशा येथें मारल्या जात नाहींत, 'हाणल्या' जातात, त्याचप्रमाणें तंबाखूची किंवा पानाची पिचकारी 'हाणली' जाते. ही पिचकारी लालभडक असते आणि ती हाणली जात असतांना 'पचाक्न्' हाणली जाते. ( या विशिष्ट लयींत तंबाखू किंवा पान खाल्लें न गेल्यामुळें कित्येक ग्रामीण

कथा फसल्या आहेत, प्रत्ययकारी झाल्या नाहींत हें दाखवून देतां येईल.) दाढ आणि गालफडें यांचा उपयोग पानतंबाखूच्या गोळ्या ठेवण्याच्या दृष्टीनें फारच होतो. दांतांचा आणि कानांचा उपयोग नागरी कथेंत तितका परिणामकारकपणें केला जात नाहीं. ग्रामीण कथेंतील पात्रें सदैव दांत आणि कान कोरीत असतात. अर्थात् ही सफाई काडी किंवा हिरकुटाच्या साहाय्यानें होत असते. एका नवथरानें सफाईसाठीं कानकोरणें आणलें आणि त्यामुळें हा अनुभव अगदीं बोथट होऊन गेला.

जुन्या शहरी कथा-कादंबऱ्यांत नायिकांच्या पायांत लडिवाळपणें घोटाळणारीं कुत्रीं सोडलीं तर अलीकडे त्यांत कुत्रासुद्धां फिरकतांना आढळत नाहीं. ष्टुरीमध्यें आपल्याला कुत्रीं वारंवार भेटतात. भुंकण्यासाठीं आणि सदैव पसरलेल्या शांततेचा भंग करण्यासाठीं या कुत्र्यांचा फारच उपयोग होतो. 'कालवा' हा एक वेगळाच प्रकार आपल्याला या कथेंत भेटतो. याचा उपयोग शहरी वाङ्मयांत पाणी पुरवण्यासाठीं, फार तर नायक-नायिकांना त्याच्या कांठीं बसायला होऊं शकतो, पण ग्रामीण वाङ्मयांत नुसताच 'कालवा' होत असतो. गपगार असणाऱ्या प्रदेशामुळें, चपाचपा लागणाऱ्या उन्हामुळें, ल्हा-ल्हा करणाऱ्या कुत्र्यामुळें, अचानक होणाऱ्या कालव्यामुळें वातावरण ( atmosphere ) चढतें.

त्यांत आणखी एखादी 'बाई' आणि तिचें कांहीं लफडें आणलें म्हणजे आवश्यक तें 'सेक्स अपील' येतें. ("तिच्यामारी...पाटलानं नवंच खबुतर पकडलया कीं...काय त्येचं शिक्रेट आसंल कुना ठावं...")

या सर्व मालमसाल्याशिवाय आणखी अतिशयोक्ति सढळ हातानें वापरली आणि शेवटीं गोष्टींत रंगलेल्या वाचकाला एक सणसणीत धक्का दिला कीं 'मिक्चर' फक्कड होतें. 'फस्कल्लास ष्टुरी' असाच धन्योद्‌गार गाफील वाचकाच्या तोंडून निघाल्याशिवाय राहत नाहीं. भुतेंखेतें, हडळी, जखिणी यांचा उपयोग शहरी कथेंत कांहींच नाहीं, पण येथें मात्र 'सस्पेन्स' वाढविण्यासाठीं त्यांचा फारच उपयोग होतो. एका यशस्वी कथेंत तर 'सेक्स' आणि 'सस्पेन्स' दोन्ही साधण्यासाठीं हडळीचा कौशल्यपूर्ण उपयोग केला आहे.

आतां जरा आणखी वरच्या पातळीवरून ष्टुरीचा अनुभव घेऊं.

'ष्टुरीं'त एक निराळाच ( especial ) ताजेपणा ( freshness ) असतो. शहरी ( urban ) कथेंत बापूराव कारकून शिळ्या आणि लिवलिवीत पोळीचे तुकडे चिवडीत असतात, तर ग्रामीण ( suburban ) कथेंतला बाप्या जाधव बाजरीची कुरकुरीत ताजी भाकरी ( bread ) झुणक्याबरोबर खातो. भाकरी खाऊन झाल्यावर तो बापूराव कारकुनाप्रमाणें उजव्या हाताचा टेकू देऊन नाजुकपणें डाव्या हातांतल्या फुलपात्रांतून पाणी पीत नाहीं, तर लोट्यानेंच गटागटा पाणी पितो. येथें तांब्याच भांडें बनतो हें लक्षांत घ्यावें. त्यामुळें बाप्याच्या हालचालीला कमालीची घनता ( solidity ) येते. तसेंच बापूराव आणि बाप्या जाधव यांतला फरक आपल्याला येथें तीव्रतेनें जाणवतो. बाप्या जाधव म्हटल्यानें आपल्याला बाप्याविषयीं खूपच जास्त माहिती कळते. आडनांवाचें आवर्त त्याच्याभोंवतीं गरगरूं लागतें. आणि हा अनेक बाप्यांचा प्रतिनिधि नसून वेगळा ( आणि म्हणूनच आगळा ) जाधवांचा बाप्या आहे हें जाणवतें. ( 'जाधवांचा' हें इटॅलिक्समध्यें वाचावें. ) कित्येकदां हें आगळेपणा देणारें दुसरें नांव आडनांव नसतें, तर जातीचें असूं शकतें. उदाहरणार्थ, गणा चांभार, भिकू सुतार, विठा मांग वगैरे...नागरी कथेचें थिटेपण हें या ठिकाणीं जाणवतें.

ग्रामीण कथेंत एक निराळाच मोकळेपणा ( freedom ) प्रत्ययाला येतो, तर नागरी कथेंतील कोंदटपणा ( stuffiness ) आपल्याला बोचतो. झावबाच्या वाडींतील बंडोपंत कारकून हे चार भिंतींच्या खोलींत कुढत असतात, तर गणा चांभाराच्या बिबवेवाडींतील घराला एक भिंतच नसते. यांतून गणाचें दारिद्र्य दिसतें, हा तिय्यम आणि भडक ( bold ) परिणाम साधावयाचा नाहीं. तर मोकळेपणा हा कोंदटपणासारखा भरून राहिलेला नाहीं ( राहूं शकत नाहीं ) हें दाखवावयाचें आहे. बरें, हा वेगळा सांगावा ( to tell ) लागत नाहीं. तो स्वतःच बोलका ( telling ) होतो. पाणी जसें उताराकडे वहातें तसा येथें अहेतुकपणें परिणाम होतो. ग्रामीण कथांतला हा मोकळेपणा place ( वास्तु ) च्या बाबतींतच फक्त खरा नाहीं. ( जेथें मराठी शब्द जास्त अवघड तेथें तो कंसांत टाकला आहे. ) खरें तर हें 'मोकळेंत्व' वास्तूच्या बाबतींतहि प्रकर्षानें जाणवावें.

झावबाच्या वाडींतील बंडोपंतांचें क्षितिज तुळई असूं शकतें ( क्षितिज = तुळई ). तर गणा चांभाराचें क्षितिज म्हणजे खरेंच क्षितिज असतें. ( म्हणजे तुळई = क्षितिज किंवा क्षितिज > तुळई. )

एक प्रकारचें राकट सौंदर्य ग्रामीण लोकांच्या वागणुकींत नेहमींच दिसतें. हा 'Abandon' ( वैपुल्य ) नागरी कथेंत सांपडत नाहीं. नागरी कथेंतला नायक उकाड्यानें जीव चालला असला तरी अंगभर कपडे घालून आणि त्यावर टाय लावून आणि बूटमोजे घालून उन्हांत शिजतो. ग्रामीण नायक हा उघड्या छातीनें, उघड्या अंगानें वावरत असतो. उन्हांत भाजून करपलेली त्याची कातडी आणि निसर्ग यांत नायलॉन, सिल्क, मांजरपाट यांचीं आवरणें येत नाहींत. जुन्या मराठी कादंबरींतील नायकनायिका शर्ट किंवा ब्लाउज यांना न लागलेली धूळ तर्जनीनें हळूच उडवतात. हा कृत्रिम नाजुकपणा ग्रामीण जनतेंत आढळणार नाहीं. खालील तीन वाक्यें पाहा :

'पण बंडा वकिलाचें लक्षच तिकडे नव्हतें. काडीनें बेंबींतला मळ काढीत तो गुंग होऊन गेला होता.'

'उघड्या मांडीवर चढलेला बारका किडा हाताच्या एका झटक्यांत मारीत पांडा लव्हार म्हणाला...'

'नमस्कार चमत्कार झाल्यावर अप्पासाहेब बोटानें शेंडीशीं खेळत म्हणाले...'

पांडा कराकरा मांडी खाजवतो, पच्‌दिशीं थुंकतो आणि पालुपदा-सारख्या शिव्या हांसडतो. तो निःसंकोचपणें दांत कोरील आणि कान साफ करील. अघळपघळ बोलेल, वलावला बोलतच राहील, आवश्यक त्यापेक्षां आजूबाजूचीहि माहिती सांगेल आणि तो भीडभाड कशाचीच बाळगणार नाहीं. शेवटीं भराभरा लांबलांब टांगा टाकीत चालेल, वेळ-प्रसंगीं पळेलसुद्धां.

वर म्हटल्याप्रमाणें हा मोकळेपणा इतरत्रहि जाणवतो. गणा चांभार जेव्हां हंसतो तेव्हां मोकळेपणानें गडगडून हंसतो, हंसतांना त्याचें शरीर गदगदां हलतें, न्हाव्याच्या फवाऱ्यासारखी त्याची थुंकी सारखी उडत राहते आणि

हंसतां हंसतां त्याच्या डोळ्यांला पाणीहि येतें. या वेळीं मोकळेपणाला खोली (depth) येते आणि गणाची मनोऽवस्था आपल्याला समजते. बंडोपंत हंसतात, पण ते हंसतांना खोली (room) च्या बाहेर हंसणें ऐकूं जाणार नाहीं अशा बेतानें हंसणें चोरतात. अगोदरच आकुंचित स्वरूपाचा अनुभव. आतां त्याला असलेली थोडीशी (scant) खोली (येथें परत depth) नष्ट होते. गणा चांभार आपल्या भावना, विकार, विचार, संवेदना संपूर्ण-पणें निर्लेप स्वरूपांत प्रकट करतो. त्याचा अनुभव आपल्याला जसाच्या तसा पाहायला, ऐकायला मिळतो. त्याच्या बोलण्याचालण्यांत जो expansiveness ( प्रसरणशीलता ) आहे तो विशेष लक्षांत रुजतो. शहरी माणसाच्या मनावर जे असंख्य ताण असतात ते येथें ढिले पडतात आणि त्याचें संपूर्ण व्यक्तित्व, त्याच्या मनोऽवस्था आपल्याला दिसतात. अतिशयोक्ति चालत असली तर असें म्हणतां येईल कीं, गणा चोरीसुद्धां चोरून करणार नाहीं, तर उघडउघड (open) करील.

या अत्यंत वरच्या पातळीवरून आणखी एकच मुद्दा पाहूं. नायकाची अनन्यसाधारण अस्तित्वावस्था दाखविण्यासाठीं खालील वाक्यांचा ( composition ) कसा उपयोग होतो तें पाहा.

" आंग्याचा नामा झोपडींतून बाहेर पडला. झोपड्या, लहानमोठीं झाडें यांची गर्दी त्यानें उत्साहाच्या भरांत मागें टाकली. टेकडी वलांडून त्यानें डोंगर तुडवला. रानटी पानाफुलांचे उग्रमादक गंध त्याच्या मस्तकांत शिरले....डोंगर उतरून तो थेट खाडीच्या दिशेनें चालला. पण भडवा चालला होता वर पाहून. त्यामुळें वाटेंतच अचानक एका खड्ड्यांत अडमडला....' बायली, पडलों कीं खड्ड्यामंदी '..."

म्हणजे येथें

( १ ) झोपडी ( स्थिरता )

↓

( २ ) झोपड्या ( स्थिरस्ता आणि गति )

↓

( ३ ) लहान झाडें ( गति )

↓

( ४ ) मोठीं झाडें = उत्साह
( १ + २ + ३ + ४...)
↓
( ५ ) टेकडी = उंची
↓
( ६ ) डोंगर = आणखी उंची
↓
( ७ ) रानटीं पानेंफुलें = उत्साहाचें उधाण—ह्याचीं आंदोलनें
↓
( ८ ) खाडी = खोली = आणखी आंदोलनें.
↓
९ खड्डा → बायली ( शरीरस्पंदन आणि त्याला मिळालेलें शब्दरूप )

वर नामा आंग्र्याच्या प्रगतीचे टप्पे शोधले आहेत. झोपडी ते खाडी हा अनुभव जास्त उंच उंच होत चालला आहे...ही उंची यांत उल्लेख नसलेल्या आकाशामुळें खरी जाणवते. पण या उंचीला खोली प्राप्त होते ती अगदीं शेवटीं. झोपडी ते खड्डा असा हा अनुभव उंच + खोल + लांब आहे. रानटी पानाफुलांचा उग्रमादक वास उंचीला वास आणतो आणि त्यामुळें उंची जास्तच उंच व नंतरची खोली जास्तच खोल बनते.

चर्चा जास्त जास्त शास्त्रीय होत चालली आहे म्हणून आतां थांबावें. वास्तविक शास्त्रीयत्वाचें ग्रामीण कथेला वावडें नाहीं हें यावरून लक्षांत यावें. आतां आपली पूर्वीची पातळी परत गांठली पाहिजे.

तंबाखूचा वर ओझरता उल्लेख केलाच होता. पण तंबाखूचें महत्त्व ग्रामीण कथेंत खरोखर इतकें आहे कीं, तंबाखू हें तेथें एक निराळें ' कॅरॅक्टर 'च होतें, असें म्हणावयास हरकत नाहीं. ग्रामीण कथेच्या संदर्भात तंबाखूला निराळें व्यक्तित्वच प्राप्त होतें. तिचें चेतनीकरण होतें असें म्हणावें. तंबाखू नसेल तर या कथेला रंगत नाहीं. तंबाखूच्या पुरचुंड्या सुटतात तसतशी कथेची पुरचुंडीहि सुटत जाते. तंबाखू खाणाऱ्याच्या गालफडांत जसजशी रंगते तसतसें त्याचें व्यक्तित्व जास्तजास्त खुलूं लागतें.

तंबाखूची गोळी या गालांतून त्या गालांत सारखी फिरत ठेवीत बोलत राहाणें, ही अवघड गोष्ट या लोकांना सहज साधते. असें करतांना त्यांचा आवाज घोगरा होतो. नागरी कथेंत ( आणि क्वचित् ग्रामीणहि ) आवाज घोगरा होतो, पण तो निराळ्या वेळीं आणि निराळ्या कारणासाठीं. 'हें' कांहीं वेगळेंच. 'तें' 'हें' नव्हे हें येथें जाणवतें. तंबाखूची गोळी तोंडांत असणारा पाव्हणा जितक्या मोकळ्या मनानें बोलतो तितक्याच मोकळ्या तोंडानें थुंकतोहि. तंबाखू आणि पान हीं जेव्हां बरोबर खाल्लीं जातात तेव्हां अर्थातच जास्त मौज असते हें निराळें सांगावयास नको. पानाचा रस तोंडांत संभाळून लोकांना समजेल असें बोलणें हें किती अवघड, पण तें ग्रामीण लोकांना अचूक, बिनसायास जमतें.

ग्रामीण कथेचा शेवट ही एक विशेष अभ्यसनीय बाब आहे. राजापुरी तांब्याचा घाट कांहीं वेगळाच असतो म्हणूनच तो राजापुरी तांब्या असतो. तसेंच ग्रामीण कथेचा घाटच कांहीं वेगळा असतो म्हणूनच ती ग्रामीण कथा असते. यांत शेवटाला इतकें महत्त्व आहे कीं, ओ. हेन्री, मॉप्सॉं ( पाठभेद : मोपासां ) यांच्या गोष्टींतहि शेवटाला इतकें महत्त्व नसेल. हें महत्त्व इतकें अनन्यसाधारण आहे कीं 'कांहीं महत्त्वाचे शेवट' हा एक निराळ्या अभ्यासाचा विषय व्हावा. नागरी कथेंत विशेष कांहीं असें कधींच घडत नसतें, म्हणून तिच्या शेवटीं कांहीं विशेष घडलें नाहीं तर त्याचें कांहीं वाटत नाहीं. कारकून किंवा शिक्षक यांचीं सूक्ष्म सुखदुःखें हे विषय असलेल्या नागरी कथा बहुधा ऑफिसांत किंवा शाळेंत सुरू होतात आणि घरीं त्यांचा शेवट होतो. कधीं कधीं हें उलटें होतें. आणि कधीं कधीं जेथें सुरुवात तेथेंच शेवट. या सर्व प्रकारांत अनन्यसाधारणत्व यावें तरी कसें ? हें नसल्यामुळें वाचक अर्थातच लेखकाच्या शेवटाकरितां न थांबतां स्वतःच तिचा शेवट करून टाकतो.

ग्रामीण कथेंत एका वेगळ्याच शेवटाची अपेक्षा असते. कारण त्या गोष्टींत स्वभावतःच अशी कांहीं अस्वस्थता, खळबळ ( action ) असते. कोणाचें कांहींतरी लफडें, भानगड, मारामारी, हाणाहाणी, भांडण, दारू असले जिवंत विषय या कथांना लाभतात. त्यामुळें त्यांचे शेवटहि तितकेच चांगले जमवतां येतात. रसिक वाचकाला अशी कलाटणी शेवटीं अपेक्षित

असतेहि आणि नसतेहि. हें असणें आणि नसणें एका वेळीं असतें हें येथें महत्त्वाचें आहे. असा शेवट अपेक्षित असतो, कारण शेवट मजेदार नसला तर गंमत कसली ? आणि अपेक्षित नसतोहि. कारण चतुर लेखक शेवट नेमका कसा करणार याचा 'पत्त्या' मात्र वाचकाला नसतो. आणि गोष्ट वाचून संपल्यावर तो म्हणतो, "आरं तिच्यामारी, हा पाइंट हुता व्हय् ?... आमच्या डोस्क्यामंदी शिरलाच नाय पघा !"

ग्रामीण कथेच्या या वैशिष्ट्याविषयीं चर्चा चालू असतां आम्हीं एका ग्रामीण कथालेखकाला विचारलें, "शेवटीं ही गंमत तुम्ही कशी काय आणतां सांगा बुवा !"

त्यावर ते म्हणाले,

"ह्ये का तुमचं इचारनं झालं गा ? रायटिंगमधलं हें टाप शिक्रेट तुम्हांला सांगटलं म्हंजे ख्योळ खल्लासच कीं समदा. बरं तें ऱ्हाऊं द्या.... जरा तमाखू काढा कीं...."

तंबाखू काढीत आम्हीं त्यांच्याच बरोबर असलेल्या दुसऱ्या एका मध्य-देशीय कथाकारांना हाच प्रश्न विचारला,

"थेच मी मन्लो आणि थेच मी मन्तों. ही खाजगी माहिती सांगिल्ली मंजे काय ऱ्हायलं. काबा ?"

—ग्रामीण ष्टुरीच्या अभ्यासानें येथें संपावें.

◎ ◎ ◎

७

# मेघदूतावर ‘क्ष’ किरण

कविकुलगुरुकालिदासविरचित श्रीमेघदूत या काव्यखंडांतील रामगिरी म्हणजे रामगड कीं रामटेक कीं रामशेज असा वादविवाद आज चालू आहे. खरें म्हणजे त्यास वाक्कलह, वाक्ताडन किंवा वादंगच म्हणावयास पाहिजे. या वाग्युद्धांतून निर्माण होणारें दौर्मनस्य, मित्रभेद, काटव इत्यादि परिणाम विषादजनक आहेत. कांहीं विनोदी लेखकांनीं यांत भाग घेऊन विनोद आणि हास्यरसांची निर्मिति केली. त्यामुळें या काटवांत थोडेंसें चाटव येण्यास मदत होईल हें खरें. वाईटांतून कधींकधीं चांगलें निघतें तें असें.

आमचा या वादसिंधूंत पडण्याचा मानस नव्हता. कारण क. कु. गु. कालिदासावर लिहिणारे आम्ही कोण ? परंतु विषयच मोठा आणि शिवाय चिकित्सेचें आम्हांसहि अगदींच ज्ञान नाहीं असें नाहीं. आमचे मातामह भिषग्भूषण आयुर्वेदाचार्य नानाशास्त्री वैद्य यांच्या मार्गदर्शनाखालीं आम्हीं ‘ चिकित्सा प्रभाकर ’ चाळला. आम्हीं वैद्यकीच करावी अशी आमच्या मातामहांची इच्छा होती. पण पुढें प्रतिरक्षालेखा-कार्यालयांत चाकरी लागल्यामुळें तें राहिलें. ( व बरीच मनुष्यहानि टळली असें आमचे पितामह विनोदानें म्हणत. ) यामुळें आमची ‘ एरंडोऽपि द्रुमायते ’ अशी स्थिति झाली असल्यास नवल नाहीं. शिवाय अखेर सत्य हें कोणाला तरी उघड करणें आवश्यकच असतें. म्हणून आमचा हा प्रयत्न जरी ‘ खटोटोपो भयंकरः ’ वाटला तरी खऱ्या विद्वज्जनांकडून आमच्या या पाटवाचें कौतुक होईल, दुर्विदग्धत्वाचें लांछन आम्हांला लागणार नाहीं अशी आम्हांला आशा आहे. आम्ही काय लिहिणार ? लिहितां लिहवितां केवळ तो प्रभाकरच आहे याची आम्हांला नम्र तम जाणीव आहे.

रामगिरीसंबंधीं जो कूट प्रश्न आहे त्याचा विचार करतांना येणारी मुख्य अडचण ही सबंध रामचरित्राबद्दलचीच आहे. रामचरित्र हें प्रभु रामचंद्राच्या जन्माआधींच लिहिलें गेलें, अतएव तें इतर चरित्रांपेक्षां फारच विभिन्न आहे. अगोदर लिहिल्या गेलेल्या चरित्राप्रमाणें वागण्याचा दुर्धर प्रसंग दुसऱ्या कोणा चरित्रनायकावर आला असेल असें वाटत नाहीं. परंतु श्रीरामचंद्राला हें ग्रंथप्रामाण्य मानावें लागलें. ( आजच्या बुद्धिप्रामाण्यवादी रावणांना हें आवडणार नाहीं. ) हा मुख्य मुद्दा लक्षांत ठेवला म्हणजे घोटाळा होण्याचा काय संभव आहे हें आपल्या ध्यानांत येतें. वाल्मीकीनें लिहिलेलें रामचरित्र वेगळें आणि रामचंद्रानें त्यांत स्वतः केलेले पाठभेद वेगळे. वाल्मीकिरामायणाची खिसा-प्रत नेहमीं स्वतःजवळ नसल्यामुळें असें झालें असणें अगदीं शक्य आहे. मुळांतच अशा रीतीनें गोंधळ असल्यामुळें आजच्या विद्वान् टीकाकारांची चांगलीच सोय झाली आहे.

असें असतांहि आजपर्यंतच्या ग्रांथिक, दांतिक, कपौलिक, काल्पनिक, मौखिक तसेंच सांगोवांगी पुराव्याचें आलोडन आणि परिशीलन 'क्ष' किरणांच्या साहाय्यानें केलें असतां आम्हांला असें स्वच्छ दिसतें कीं, मेघदूतांतील रामगिरीचें निश्चित स्थान कोणतें हा खरा वादविषय होऊं नये. कारण इतर कुठल्याहि ठिकाणीं रामगिरी हा स्थित नसून पुनवडींतील ( पुण्यपत्तनाचें किंवा पुण्याचें जुनें नांव ) आमच्या वडिलोपार्जित रामनिवासांतच तो स्थिर आहे.

पुण्यांतच आम्ही अलीकडे स्थायिक झालों असल्यामुळें पुण्याबद्दलच्या प्रेमभावानें हें लिहिलें जात असल्याचा संभव आहे असें कित्येकांना वाटेल. पण हा पूर्वग्रह अयुक्त आहे. प्रतिरक्षा-लेखा-कार्यालयाच्या आमच्या राममूर्तिसाहेबांनीं आमची पुण्याला नियुक्ति केल्यामुळेंच आम्ही अलीकडे येथें असतों. पुण्याविषयीं आम्हांला स्निग्धता असल्यामुळें आम्ही असें लिहितों असें मानणारांनीं पुण्यांतच आमचें सासुरवाड असून आमचे श्वशुर व सासूबाई ( साहेब ) येथेंच रहात असतात हें विसरणें सहृदयतेचें लक्षण खासच नव्हे.

मेघदूताचें पृथक्करण करतांना पहिलाच प्रश्न येतो तो भूगोलाचा.

वाल्मीकि आणि राम यांना सोडून दिलें तरी कालिदास, यक्ष, मेघ आणि भारत या सर्वांच्या भूगोलाचा येथें विचार व्हावयास पाहिजे. कालिदास हा मोठा प्रतिभासंपन्न कवि होता हें निर्विवाद आहे. परंतु बालपणांत तो अतिशय जडबुद्धि आणि मंदमति होता असें दांतिक पुराव्यावरून दिसतें. सारांश, भूगोल शिकण्याचें जें वय असतें त्या वयांत तो भूगोल शिकला असेल कीं नाहीं हें शंकास्पद आहे. तसेंच प्रतिभावंत कवीनें भूगोलशास्त्र-पारंगत असावेंच असा कांहीं नियम नाहीं. वसंतऋतूंत महाराष्ट्रामध्यें डोंगरांना पाझर फोडणारे, ओढ्यांना खळखळायला लावणारे, शीतल वायुलहरींना वहायला लावणारे प्रतिभावंत कवि आपल्याकडे नाहींत असें नाहीं. आतां राहिला यक्ष. विरहाआधीं प्रेमसुख उपभोगणें आणि विरहानंतर विरहदुःख साहणें हेंच ज्याचे मुख्य उद्योग व केवळ बदल म्हणूनच जो मालकाचें काम कधींकधीं करीत असे, अशा यक्षानें भूगोलाच्या रूक्ष पुस्तकांत डोकावून पाहणें हें सुद्धां सुतराम् कठीण.

मेघाच्या भूगोलाविषयीं काय सांगावें ? आकाशांतून विहार करणाऱ्या मेघानें पृथ्वीच्या भूगोलाची पर्वा कां करावी ? विस्तीर्ण तलावाची भीति त्याला कधींच वाटूं नये. उलट तलावावर खुशाल वांकून त्यानें तलावांतलें चांदणें न्याहाळावें. तसेंच मेघाचा प्रवास हा त्याच्या स्वतःवर थोडाच अवलंबून असतो ? वाऱ्यानें परप्रत्ययनेय ढगाला मन मानेल त्याप्रमाणें पळवावें व त्याच्या दिशा बदलाव्या. वाऱ्याला पाठ देण्याचें हें मेघाचें जीवनविषयक तत्त्वज्ञान यक्षाला माहीत नसेल, त्याचें सामान्य ज्ञानहि त्याच्या भूगोलाइतकेंच कच्चें असेल असें म्हणवत नाहीं. मेघाचें वांकडें पाऊल पडलें नसेलच व तो दुसऱ्या मार्गानें गेला नसेलच असें म्हणायला पुरावा नाहीं. हिंदुस्थानच्या भूगोलाकडे नजर टाकली असतांहि तो सारखा बदलत गेला असण्याचा संभव नाहीं असें म्हणवत नाहीं. तसें म्हटलें तर कुमारसंभवांत कालिदासानें उल्लेखिलेला हिमालय ( हिमालयो नाम नगाधि-राजः ) आणि तेनसिंग नोर्केनें ज्या पर्वतावर आरोहण केलें ( माउंट एव्ह-रेस्ट ) तो एकच असें म्हणायला तरी काय पुरावा आहे ?

आपल्या माहितींतच भारताचा भूगोल बदलला आहे. बंगाल्यांतील एका नव्या योजनेला ‘ दंडकारण्य योजना ’ असें नांव आहे. याचा फायदा घेऊन

राम वनवासांत गेला तो बंगालमध्येंच असें सांगणारा एखादा वंगपंडित शें-दीडशें वर्षांनंतर निघाला नाहीं म्हणजे मिळविली. स्वतंत्र भारताचा भूगोल सारखा बदलत आहे असें आपले पंतप्रधान कित्येकदां अभिमान-पूर्वक सांगतांना आढळतात. आणि हें योजनाबद्ध काम नेहमीं चालू राहणार असल्यामुळें भारतीय भूगोलाचें नष्टचर्य जवळ आलें आहे असें मानायला हरकत नाहीं.

एवढेंच कशाला ? पुण्याचा भूगोलसुद्धां गेल्या पन्नास वर्षांत कितीतरी वदलल्याचें आम्ही लहानपणापासून प्रत्यक्ष पाहात आहोंत. पुण्याच्या भूगोलां-तील गुंतागुंतींबद्दल कितीतरी आख्यायिका प्रसिद्ध आहेत. कित्येकांनीं पुण्यांतील बोळांमुळें निर्माण होणाऱ्या चक्रव्यूहाबद्दल लिहिलें आहे. इतरांचें राहोच, पण जगाच्या भूगोलांतील बारकावे सांगणारे जोगल-पेणकर यांसारखे भूगोलतज्ज्ञहि पुण्याच्या या बोळांत चुकले होते अशी आख्यायिका आहे. पुण्यांतील आमच्या मातुलांच्या घराजवळच्या भूगोलाची हीच स्थिति झाली. पुणें नगरपालिकेंत निवडून येण्याआधींचा त्यांच्या घराआसपासचा भूगोल आणि नंतरचा भूगोल यांत कुठल्यातरी आक्टान्वयें इयत्ता तिसरीकरितां टेक्स्ट बुक म्हणून मंजूर केलेलें आमचें लहानपणचें, भूगोलाचें पुस्तक तिसरें, आणि आमचा नातू आज वाचतो तें ‘ भूगोलविलासाचें पुस्तक ( चषक तिसरा ) ’ यांइतका फरक पडला. कोलंबसालासुद्धां भूगोल कच्चा म्हणूनच ना अमेरिका सांपडली ! सारांश, भूगोलाच्या आपल्या ज्ञानाबद्दल कोणींच अभिमान बाळगण्यांत कांहीं अर्थ नाहीं. मग क. कु. गु. कालिदास किंवा यक्ष किंवा बिचारा मेघ यांनीं भूगोलासंबंधीं कांहीं चुका केल्या असल्यास त्या क्षम्यच नाहींत काय ?

भूगोलाच्या या अडचणींशिवाय आणखी एक अडचण म्हणजे निरनिराळ्या नांवांची. एकाच माणसाला अनेक नांवें ठेवण्याचा हव्यास हा केवळ बायकांच्यांतच असतो असें नाहीं. उलट देवदेवतांची स्तुति करण्याचा एक प्रकार म्हणजे त्यांना अनेक नांवें ठेवणें हा समजला जातो. सूर्याचीं बारा नांवें, गणपतीचीं शेंकडों नांवें, विष्णूचीं हजार नांवें दुसरें काय दर्शवितात ? बरें, गणपतीला लंबोदर, वक्रतुंड, विकट किंवा एकदंत म्हणून त्याची स्तुति काय साधते हें समजत नाहीं ! आतां रामचंद्राला तरी

नुसतें राम म्हणण्याचें सोडून रघुकुलतिलक, रघुनंदन, इक्ष्वाकुवंशप्रभव, भरताग्रज, रघुनाथ, रघुपति, दशरथसुत अशीं नांवें कशाला ? रघुकुलतिलक म्हणजे स्वतः रघूच असूं शकणार नाहीं काय ? आणि दाशरथि म्हणजे रामच असें सुचविणें म्हणजे दशरथाला चार पुत्र होते या सत्याविषयीं अज्ञान बाळगणें नव्हे काय ? पण खेदाची गोष्ट ही कीं, कविकुलगुरूंनींसुद्धां असे संदिग्ध शब्द जाणून बुजून वापरण्याचा प्रमाद केला आहे. ' राम ' यासारखा साधा, सुटसुटीत शब्द दुसरा नाहीं. मरणसमयींसुद्धां हाच शब्द वापरला जातो हें स्वानुभवावरून नव्हे तरी इतरांच्या अनुभवावरून आम्ही सांगूं शकतों. असें असूनहि वेगवेगळे शब्द वापरून कवित्व काय दिसतें ? महत्त्व आशयाला कीं शब्दाला ?...क्षणभर आपण कविकुलगुरूंचें सोडून देऊं. ' निरंकुशः कवयः । ' पण पुण्याचे लोकसुद्धां या प्रमादांतून सुटलेले नाहींत तेथें कालिदासाचें काय ? पुण्याजवळच्या जमिनीचा जो एक उंचवटा आहे त्याला हनुमान टेकडी, गोखले हिल, पेन्शनर टेकडी किंवा फर्ग्युसन हिल अशीं चार नांवें पुणेकरांनीं दिलीं आहेत याला काय म्हणावें ?... हें जर आम्हांला माहीत नसतें तर रामनिवासासंबंधीं आमचा जो सिद्धान्त आहे तो मांडतांना हनुमान टेकडीचा उपयोग करतां न येऊन आमची पंचाईत झाली असती. असो.

पुण्यांतील आमचें राहतें घर हाच रामगिरी हा जो सिद्धान्त आम्ही मांडणार आहोंत त्याच्या पुराव्याच्या स्वरूपाबद्दल वर उल्लेख आहे. पुस्तकीं पुराव्याप्रमाणेंच काल्पनिक पुरावाहि आम्ही जमेस धरणार आहोंत. वादविषय असलेली मेघदूत हीच एक काल्पनिक कलाकृति असल्यामुळें काल्पनिक पुराव्यासहि विद्वानांची हरकत असण्याचें कारण नाहीं. अर्थात् तर्कशास्त्रांना ' वाट पुसत ' आम्ही आमचा सिद्धान्त सादर करणार असल्यामुळें ते वास्तविक आहेत असें वाटावें यासाठीं कसोशीनें प्रयत्न करणार आहोंत. ( आत्मश्लाघेचा दोष पत्करूनहि हें येथें सांगितलें पाहिजे कीं प्रस्तुत लेखकानें विश्वविद्यालयाच्या मध्यमा या परीक्षेसाठीं तर्कशास्त्र हा विषय घेतला होता व सुप्रसिद्ध तर्कतीर्थ कुटमुटियाशास्त्री यांच्या दीपिकांचें परिशीलन करून तो परीक्षा उत्तीर्णहि झाला होता. ) मौखिक पुराव्याबद्दलहि कोणी विद्वज्जन आशंका घेणार नाहींत.

असा विश्वास वाटतो. कारण केवळ ऐकलेल्या आणि लक्षांत ठेवलेल्या श्रुतिस्मृति आपण जेथें प्रमाण मानतों तेथें सांगोवांगीचा आधार घेण्यासहि प्रत्यवाय नसावा. प्रभु रामचंद्रानें सीतात्यागासाठींहि किंवदंतीचा (तीहि दुसऱ्यानें ऐकलेल्या) आधार घेतला हें रघुवंश काव्यसागरांत पुन:पुन: निमज्जन केलेल्या रसिकवृंदास वेगळें सांगावयास नको. उत्तमोत्तम संस्कृत ग्रंथपुष्पांचा मन:पूत आस्वाद घेणारा केवळ भुंगाच असा टीकाकार कुल-दीपक मल्लिनाथ यानें म्हटल्याप्रमाणें मौलिक पुराव्याला किंचित्हि धक्का न लावतां (ना मूलं लिख्यते किंचित् ।) तसेंच अनपेक्षित असलेलें कांहींहि न बोलतां (नानपेक्षितमुच्यते ।) आम्ही लिहिणार आहोंत. मनोरंजन हा लेखनाचा मुख्य हेतु असल्यामुळें आणि आम्ही शुद्ध कलानंदवादी असल्यामुळें आम्हांला मुळापर्यंत जाण्याची कांहींच जरुरी वाटत नाहीं. तसेंच 'न अनपेक्षितम् उच्यते' अनपेक्षित कांहींच लिहिणार नाहीं. कारण आमच्याकडून अनपेक्षित असें कांहींच नाहीं हें आतांपर्यंतच्या विवेचनावरून चाणाक्षांच्या ध्यानांत आलेंच असेल. मुरारीची तिसरीच वाट (मुरारेस्तृतीय: पन्था: ।) याप्रमाणें आम्ही अगर्दीच कांहीं मुलुखावेगळें करतों आहोंत असें मात्र वाचकांस वाटूं नये.

तिलगुडोपम असा आमचा जो सिद्धान्त आहे त्याकडे आतां वळूं. मुळा नदीच्या तीरावर असलेल्या पुण्यनगरींतील पर्वतीजवळचा रामनिवास म्हणजेच रामगिरी हा आमचा सिद्धान्त. मेघदूतामध्यें वर्णिलेली सर्व वनश्री पूर्वीं पर्वतीजवळ होती असें मानण्यास जागा आहे. सध्यां येथील आसपासची झाडी तोडण्यांत आली असली तरी कांहीं वर्षांपूर्वीं येथें घनदाट झाडी होती. आपल्या लहानपणीं प्रस्तुत लेखक याच झाडींतील एक वटवृक्षावर सूरपारंब्या खेळलेला आहे. आणि प्रस्तुत लेखकाला त्या वेळीं पडलेल्या एक चौरस इंच खोकेचा वृक्षलांछनवत् असा व्रण अजूनहि त्याच्या शिरोभागीं आहे. परवां लेखक त्या बाजूला फिरावयास गेला असतां त्याला त्याच जुन्या जागीं तेथील झाडी नष्ट होऊन उजाड भूप्रदेश व तेथें उभ्या असलेल्या पुणेरी भेळ आणि पाणीपुरी यांच्या गाड्या दिसल्या. साहजिकच लेखकाला भडभडून आलें यांत नवल नाहीं. तीस-चाळीसच काय तर गेल्या दहाबारा वर्षांत ही वनश्री येथून गेली तर रामकालीं येथें खूपच वनश्री असण्याचा संभव आहे हें निर्विवाद.

संशयी मनाला अशीहि शंका येईल कीं, पर्वती या टेकडीला आणि तिच्याजवळील रामनिवासाला रामगिरी म्हणणें कितपत बरोबर आहे? आतां पर्वतीच्या नांवावरून कांहीं निदान करावयाचें असेल तर ती पूर्वी उंचच असली पाहिजे हें आहे. रामोत्तर कालांत तिची उंची कमी झाली असणें अगदीं शक्य आहे. पर्वतीला ' तुंग ' म्हणणें म्हणूनच बरोबर आहे. दुसरें म्हणजे येथें सापेक्ष दृष्टीनें पाहणें आवश्यक आहे. हनुमान टेकडीशीं तुलना करतां पर्वती ही उंचच म्हणावी लागेल. म. म. पुरुषोत्तमशास्त्री देशपांडे आदि विद्वानांनीं सुचविल्याप्रमाणें या टेकडीला पर्वती म्हणून हिणविलें जातें हें बरोबर वाटत नाहीं. ( जिज्ञासूंनीं शास्त्रीबोवांचे ' खोगीर भरती ' आणि ' नसती उठाठेव ' हे ग्रंथ पाहावे.) तसेंच उंचीचा विचार करतांना समुद्रसपाटीपासूनच्या उंचीचा विचार करावयास पाहिजे. हा केला असतां पुणें हेंच मुळीं समुद्रसपाटीपासून उंच असल्यामुळें पर्वती ही वाटते यापेक्षां जास्त उंच आहे हें उघड आहे. ( पुण्यांतील विद्वानांची उंचीहि त्यामुळें तुलनेनें इतर विद्वानांपेक्षां जास्त आहे हें वेगळें सांगावयास नको ! ) तसेंच मुंबईच्या अभ्यासिकेंत बसून पर्वतीला ' बुटकी ' किंवा ' नकटी ' टेकडी म्हणणें सोपें असलें तरी आधुनिक टीकाशास्त्राप्रमाणेंच प्रत्यक्ष घाट चढून पुण्याला येणें व टेपनें पर्वतीची उंची मोजणें आवश्यक आहे.

याशिवाय सीतेसारख्या बाईमाणसाला घेऊन पर्वतीपेक्षां फार उंच ठिकाणीं रामचंद्र गेले असतील असें वाटत नाहीं. पर्वतीची उंची या दृष्टीनें ' बेताची ' वाटते. ( अजूनहि कित्येक ' बाईमाणसें ' पर्वतीवर लीलया चढून जातांना आढळतात. ) याशिवाय आणखी महत्त्वाचा पुरावा आम्ही आतां उद्धृत करतों. रामनिवासचा आम्हीं उल्लेख केला त्याला लागूनच डाव्या बाजूला ' सीता गुंफा ' आणि उजव्या बाजूला ' लक्ष्मण झुला ' या दोन इमारती आहेत. नदी ओलांडून पलीकडे गेल्यावर रामसेवक हनुमान यांच्या नांवानें प्रसिद्ध असलेली टेकडी आहे. ही टेकडी रामनिवासाच्या तिसऱ्या मजल्यावरून स्पष्ट दिसते. ( रामचंद्राकडे सेवाव्रत पत्करल्यानंतर मारुतिरायानें रामस्पर्शानें पावन झालेल्या जुन्या रामनिवासाजवळच पण कांहीं अंतरावर आणि कमी उंचीवर वास करावा हेंहि सेवकाच्या विनयाला

शोभून दिसतें. ) खुद्द रामनिवासांतच रामपंचायतनाचीं अनेक छायाचित्रें आहेत. देवदारू वृक्षाच्या शाखेपासून केलेल्या काष्ठचतुष्टयांत बसविलेलीं असून कांचपात्रावगुंठित असलेलीं हीं छायाचित्रें रामराज्यारोहणानंतरचीं असावींत असें इतिहास सांगतो. येथील अनेक चित्रांपैकीं एकांत एका घायाळ झालेल्या पक्ष्याचें चित्र आहे. हें बहुधा रामभक्त जटायू याचेंच असावें असें समजावयास आधार आहे. निदान न्यायशास्त्राप्रमाणें तें तसें नाहीं असें कोणी दाखवीत नाहीं तोंपर्यंत तें तसें आहे असें समजणेंच युक्त ठरेल. मात्र या चित्राखालीं ' बर्ड इन् स्पेस ' हें शब्द कसे आले हें आम्हांला समजूं शकत नाहीं. यांतील स्त्रियांचीं चित्रें हीं आमच्या घराण्यांतील पूर्वजांच्या स्त्रियांचीं असावीं असें आम्ही समजत होतों. परंतु तीं सीतेवर पहारा करणाऱ्या दानव कन्यांचींच असावींत असा आमचा नवीन कयास आहे. या मतांतरामुळें आमच्यावर टीका होईल हे निःसंशय. परंतु सुप्रसिद्ध ' घरसोड ' न्यायाप्रमाणें हें युक्तच आहे. आमच्या रामनिवासांत श्रीरामचंद्रांचीं आणि संबंधितांचीं छायाचित्रें अनेक आहेतच, परंतु रामचंद्राच्या चांदीच्या पादुकाहि येथील देव्हाऱ्यांत असून त्यांची आमच्याकडे पिढ्यान्‌पिढ्या पूजा होत आली आहे.

छायाचित्रें आणि मूर्तिविषयक चर्चा चालूच आहे म्हणून आणखी एक उल्लेख करण्यास हरकत नाहीं. द्वारकेजवळ सांपडलेल्या कांहीं मूर्ति पाहून रामाचा वनवास तिकडेच झाला असावा असा कांहीं लोकांनीं अंदाज केला आहे. अंदाज करण्यास कांहींच हरकत नाहीं. पुढें चुकणारीं अंदाजपत्रकें दरवर्षीं अनेक केलीं जातात. पण महत्त्वाचें एवढेंच कीं हा अंदाज बरोबर नाहीं. द्वारकेजवळ सांपडलेल्या ज्या मूर्ति आहेत त्या बलराम आणि रेवतीच्या आहेत असें आम्हांस वाटतें. या मूर्तींतील बलरामानें उजव्या हातांत जरी नांगर धरला असला तरी डाव्या हातांत मुसळ धरलें आहें. तसेंच रेवतीचाहि डावा हात उगारलेला असून उजव्या हातांत कमळ आहे. बलरामाऐवजीं रामाची आपल्या बुद्धिबलानें द्वारकेंत स्थापना करून सत्यापलाप करणाऱ्यांना मारण्यासाठींच बलरामानें एका हातांत मुसळ धरलें आहे व रेवतीदेवींनीं डावा हात उगारला आहे असा आमचा स्पष्ट अभिप्राय आहे. हा सत्यापलाप होण्यापूर्वीं बलरामाच्या

हातांत मुसळ नव्हतें व रेवतीदेवीचा हात उगारलेला नव्हता असें वृद्ध लोक अजून द्वारकेजवळ बोलतांना आढळतात.

आमच्याकडील कागदोपत्रीं रामलक्ष्मणांचा उल्लेख रामभाऊ किंवा लक्ष्मणराव आणि सीतेचा उल्लेख सौ. सीताबाई असा केलेला आढळतो. पण यामुळें घोटाळा निर्माण होण्याचें कारण नाहीं. राम-लक्ष्मणांचे उल्लेख दक्षिणेंत रामस्वामी किंवा लक्ष्मणस्वामी असे केलेले आढळतात. त्याचप्रमाणें मराठी मुलखांत रामभाऊ किंवा लक्ष्मणराव येणें हें युक्तच दिसतें ( जसें तामिळांत ‘ येन स्वामी, येन समाचारा ’; त्याचप्रमाणें मराठींत काय राम-भाऊ, ठीक आहे ना इ. ) एवंच, रामचंद्र, रामस्वामी आणि रामभाऊ या तीन निरनिराळ्या व्यक्ति नसून ती एकच व्यक्ति आहे हें रसिकांना आकळावें.

राहतां राहिली मुठा नदी.‘ रेवां द्रक्ष्यसि’ असें यक्ष मेघाला म्हणतो. ती रेवा म्हणजेच मुठा हें वरील भरभक्कम पुरावा पाहिल्यानंतर तरी मान्य व्हावें.ब्रह्मबंधू इ. टीकाकारांना आमचें म्हणणें पटलें असूनहि त्यांनीं आपलाच हट्ट चालविला आहे. याबद्दल आम्हीं काय लिहावें? सुवर्णस्मित या इंग्रज लेखकानें म्हटल्या-प्रमाणें ‘ पराभूतोऽपि विवादते ( Vanquished though, he argues still–Goldsmith ) अशी यांची स्थिति झाली आहे. गोल्डस्मिथकडूनच त्यांचे कान टोंचण्यापलीकडे आम्ही तरी काय करणार ? रेवा म्हणजे नर्मदा कशावरून, असें टीकाकार पुनःपुनः विचारतात. आम्ही म्हणतों रेवा म्हणजे नर्मदा नव्हेच. कारण रेवा म्हणजे मुठा नदी होय. गंगेला ज्याप्रमाणें गँजिस किंवा भागीरथी म्हणतात किंवा सिंधूला इंडस म्हणतात, त्याचप्रमाणें रेवा म्हणजे मुठा असें समजायला आमची कांहींच हरकत दिसत नाहीं. आमचा हा रामठेका सोडायला आम्हांला योग्य असें कांहींच कारण अजून आढळलें नाहीं.

चित्रकूटाविषयीं जें विचित्रकूट आहे त्याचाहि उल्लेख येथें करावयास हवा. चित्रकूट हा प्रयागच्या जवळ आहे तसेंच नाशिकजवळहि तो आहे असें कांहीं विद्वान् म्हणतात. आमचें या बाबतींत कांहींच भांडण नाहीं. आमचें एवढेंच म्हणणें कीं, पाटण या एकाच नांवाचीं गांवें ज्याप्रमाणें उत्तर गुजरात, सौराष्ट्र व सातारा या तिन्ही जिल्ह्यांत आहेत. ( या

मौलिक माहितीबद्दल पाटण-सातारा, येथील वक्रतुंडशास्त्री पाटणकर यांचा मी आभारी आहें. ) याशिवाय बिहारांतील पाटणा व ( मच्छली ) पट्टण हीं वेगळींच. शिवाय तळेगांव ( दाभाडे ), तळेगांव ( ढमढेरे ) किंवा मांजरी ( खुर्द ) आणि मांजरी ( बुद्रुक ) यांसारखीं गांवें कितीतरी आहेत. देशपांडे आणि कुलकर्णी या नांवाचे लोक गडहिंग्लजप्रमाणेंच टिंबक्टूलासुद्धां असूं शकतात. त्याचप्रमाणें चित्रकूट हा अनेक ठिकाणीं असणें शक्य आहे आणि पुण्याजवळील ज्या डोंगराला हल्लीं पर्वती म्हणतात तिला पूर्वी चित्रकूट म्हणत असणें यांत विचित्र असें कांहींच नाहीं.

येथें आणखी एका मताचा समाचार घेऊं. ब्रह्मबंधू या टीकाकारांनीं रामगिरी हा मावळ तालुक्यांत आहे असें आग्रहानें प्रतिपादिलें आहे. मावळांतहि जमिनीचा एखादा उंचवटा असणें अगदीं शक्य आहे. प्रश्न एवढाच आहे कीं, मुठा नदी तेथून वहाते काय? आमचा रामनिवास त्याच्याजवळ आहे काय? त्या उंचवट्यास पर्वती म्हणतात काय? तसेंच रामाचें वास्तव्य तेथेंच झालें होतें काय? दुसरें असें कीं, पुण्यासारख्या विद्येच्या ( भावी ) माहेरघरीं राहण्याचें सोडून राम हा जर मावळांत गेला तर तेथें काय त्याला तेथील मावळ्यांच्या मदतीनें हिंदवी स्वराज्य स्थापन करायचें होतें? सारांश, आमचें विदग्ध मत असें आहे कीं, रामगिरीचें स्थान पुण्याच्या पलीकडे ताणूं नये. विस्तारभयास्तव येथें जास्त लिहितां येत नाहीं. परंतु रामटेकचा उल्लेख येथें करण्याचा मोह होतो. रामटेक म्हणजे रामगिरी नव्हे हें रामटेकच्या नांवावरूनच उघड आहे. राम नागपूरच्या बाजूला गेला असतां तेथें उभ्याउभ्या टेकला म्हणून त्या जागेला तेव्हांपासून रामटेक म्हणूं लागले. रामचंद्रानें आपला निवास ' रामनिवास, पुणें ' येथें केला, म्हणूनच त्या ठिकाणाला रामनिवास म्हणतात याबद्दल दुमत होऊं नये. रामगिरी हा अद्याप ढगांत आहे असें कांहीं रसिकांचें म्हणणें आहे. हें विधान सत्य असलें तरी अतिव्यापक आहे असें आम्हांला वाटतें. पर्वतीवरहि कधीं कधीं ढग येतात त्याचप्रमाणें इतर ठिकाणीं ते येतात एवढ्या मर्यादित अर्थानेंच वरील विधान सत्य आहे. सारांश, आमचा उक्त सिद्धान्त ' शेखमिन्याचा डोला आणि पर्वतीला पायऱ्या ' किंवा ' नातें कोरकोरुनी काढिती ' यांतला प्रकार खचितच नाहीं.

येथपर्यंत आम्हीं साधार, सांगोपांग आणि साक्षेपी असें जें विवेचन केलें यावरून खालील समीकरणें मांडण्यास हरकत नाहीं. तीं समीकरणें अशीं :—

रामभाऊ = रामचंद्र.

सौ. सीताबाई = सीता.

बाथरूम = सीतेची न्हाणी.

मुठा = नर्मदा.

पर्वती = चित्रकूट = रामगिरी.

रामनिवास = रामगिरीवरील रामाची पर्णकुटी.

या समीकरणांवर आक्षेप घेणाऱ्या विद्वानांचें आम्ही कांहीं संशोधकांनीं परिश्रमपूर्वक केलेल्या

दक्षिण = उत्तर

या मौलिक समीकरणाकडे लक्ष वेधूं इच्छितों. सध्यां पूर्व = पश्चिम हें समीकरण सिद्ध करण्यांत त्यांतील एक गुंतले आहेत असें ऐकतों. तें एकदां सिद्ध झालें म्हणजे सूर्य खरोखरच पश्चिमेला उगवूं लागेल यांत कांहीं संशय नाहीं.

रामगिरी हा विदर्भांत किंवा रामगडला किंवा नाशिकजवळहि नाहीं हें ज्ञान होऊन तो नेमका कोठें आहे हें जेव्हां आम्हांला जाणवलें तेव्हां आम्हांला अत्यानंद झाला. प्रतिरक्षा-लेखा-कार्यालयांतील कामामुळें आम्हांला येणारा अनन्यसाधारण शीण आम्ही क्षणभर विसरलों. त्या वेळीं आम्ही सुप्रसिद्ध शास्त्रविद् आर्किमिडीज् याचेप्रमाणें नहाणीघरांतच होतों. तेवढ्यांत आम्हांला हा दिव्य साक्षात्कार झाला. वास्तविक मेघदूताचें पृथक्करण आणि व्याकरण आम्ही मनांत कित्येक दिवस करीत होतों. परंतु त्या दिवशीं वेगळा प्रकाश पडला. आणि आर्किमिडीज्प्रमाणेंच ‘सांपडलें रे सांपडलें’ अशी अनुष्टुभ् वाणी आमच्या तोंडांतून श्लोक पावली. नळाचें पाणी गेलें असल्यामुळें व बंबांतील संपलें असल्यामुळें आम्ही प्रत्यक्ष जलांत बुचकळ्या मारूं शकलों नाहीं, तरी ज्ञानगंगेत मात्र भरपूर डुंबलों. त्या थोर शास्त्रज्ञाप्रमाणें आम्हींहि पुण्याच्या रस्त्यांतून धांवत सुटलों असतों. नाहीं असें

कोणीं सांगावें ? परंतु आमचा छोटा नातू शत्रुघ्न ( मोठा लबाड आहे हो गुलामाचा ! त्याच्या अंगावरील धुळीनें आमचे कपडे कित्येकदां मलिनीभूत झाले आहेत. ) यानें आजोबांची गंमत म्हणून नहाणीघराला बाहेरून कडी घातल्यामुळें इतिहासाची पुनरावृत्ति झाली नाहीं. शत्रुघ्नाला आमच्या हातून मिळालेल्या एका लहानशा चपेटिकेवरच हें निभावलें.

' मेघदूताचें पृथक्करण ' किंवा ' क्ष किरणांतून मेघदूत ' हा आमचा लेख आषाढाच्या प्रथम दिवशीं पुरा होत आहे. या विषयावर आम्हीं इंग्रजींत केलेली रचना ' केमिकल ॲनॅलिसिस् ऑफ् क्लाउडमेसेंजर ' या नांवानें सर्वश्री मंदमति आणि तीव्रमति ( डंडरहेड ॲंड हेडस्ट्रॉंग ) इंग्लंडांत आणि फ्रान्सांत प्रसिद्ध करीत आहेत हें कळविण्यास आनंद होतो. मेघदूतरसिकांस हे दोन्ही योगायोग मोठेच वाटतील याविषयीं आम्हांस तिळमात्र संशय नाहीं. या शुभदिनीं म्यां शंभुशर्मा सूर्यवंशी-कुलोत्पन्न अत्यल्पमतीनें गुंफलेला हा गद्यहार कविकुलगुरु श्रीकालिदासरसिकचरणारविंदीं अर्पण करतांना मला अत्यंत आनंद होत आहे.

◎ ◎ ◎

८

# कांहीं शब्दांविषयीं अब्द अब्द

आइन्स्टीनचा सापेक्षता-सिद्धान्त जगांतल्या फक्त साडेतीन शहाण्यांना कळत असे. आश्चर्याची गोष्ट अशी कीं, आइन्स्टीन हा स्वतः या साडेतीन शहाण्यांतला एक होता. हेगेलला खरें काय म्हणावयाचें होतें हें तर त्या बेट्याला स्वतःलाच माहीत नव्हतें. त्याचें खरें गुपित पुण्यांतल्या एका प्राध्यापकालाच माहीत होतें. ( सुदैवानें हे सद्गृहस्थ आज हयात नाहींत. ) नवी मराठी ही अशीच एक अद्भुत गोष्ट आहे. या नव्या मराठींत असे कांहीं मजेदार शब्द आहेत कीं ज्यांचे 'खरें' अर्थ अवघ्या महाराष्ट्रांत चारदोन लोकांनाच काय ते माहीत आहेत. या निवडक लोकांच्याशिवाय ते 'कुण्णाकुण्णाला' माहीत नाहींत. कांहीं जुनेच शब्द पण ते हे लोक अशा खुबीदारपणें वापरतात कीं त्यांतून फक्कडसा गोंधळ निर्माण होतो. आतां हा गोंधळ 'आगळा' असतो म्हणून बरें. नाहींतर भलतीच पंचाईत झाली असती. माझ्या पीएच्. डी.च्या प्रबंधासाठीं अशा कांहीं शब्दांचे गुप्त अर्थ मीं मोठ्या हिकमतीनें पळवून आणले आहेत. शिवाय कांहीं शब्दांना बोलके करण्यासाठीं त्यांच्याशीं प्रस्तुत लेखकानें ( स्वतःच्या दातांची पर्वा न करतां ) टक्कर दिलेली आहे. ( आम्हीहि कांहीं कमी नाहीं. 'व्युत्पत्तिकोश' आणि 'उद्गम आणि विकास' हे आम्हीं लिहिले नसले तरी अभ्यासिले आहेत. ) पळवून आणलेल्या व स्वतः शोधलेल्या अशा गुप्त शब्दार्थांच्या आधारांवर रचिलेल्या आमच्या पीएच्. डी.च्या प्रबंधांतील हीं कांहीं पानें.

× × ×

विश्वविद्यालयाच्या ग्रंथालयांत मी एकदां वाचीत बसलों होतों तेव्हां तेथें मला एकटा पाहून या नव-शब्दांपैकीं दोघांनीं मला गांठलें. आशय आणि अभिव्यक्ति हे ते दोन भयंकर शब्द. या दोन शब्दांनीं मला सुरुवातीला अगदीं राहू-केतूंसारखे पीडले. आशय म्हणतांच आपण महापूर आलेल्या नदींत पडलों आहोंत व तेथें गटांगळ्या खात असतांना नाकातोंडांत पाणी जाऊन आपला जीव हैराण झाला आहे असें मला वाटायचें. 'अभिव्यक्ति' या शब्दाची तर विलक्षण धास्ती मीं घेतली होती. हरिभाऊ आपट्यांच्या कादंबऱ्यांतून दबतदबत जाणाऱ्या व्यक्तीचा उल्लेख आला कीं आपण भीतीनें गपकन् डोळे मिटत असूं आणि दोन-चार शब्द एकदम ओलांडून पुढचें वाचायला लागत असूं, असें कोण्या एका लेखकानें लिहिलेलें मला आठवतें. कल्पना करा, येथें नुसतीच व्यक्ति नाहीं, तर चांगली 'अभिव्यक्ति'. अभिव्यक्ति या शब्दाला मी सुरुवातीला इतका कांहीं घाबरत असें कीं तो वाचनांत आल्यावर त्यापुढचें माझ्या हातून वाचूनच व्हावयाचें नाहीं. 'अभिव्यक्ति' म्हणतांच हातपाय थंडगार पडणें व सर्वांगाला दरदरून घाम सुटणें असले प्रकार होऊं लागले. एक थोर लेखक साध्या व्यक्तीला एवढा घाबरत असे, तर मी अभिव्यक्तीला इतका घाबरायचों यांत आश्चर्य कसलें ?

'आशय' आणि 'अभिव्यक्ति' या शब्दांचे अर्थ मला आजमितीलासुद्धां नीट माहीत नाहींत. तरीसुद्धां हे शब्द वेळोवेळीं मीं अत्यंत परिणामकारकपणें वापरलेले आहेत. मी मागें नोकरी करीत होतों तेव्हांची गोष्ट. एकदां आमचे हेडक्लार्क श्री. अजिंक्य यांचें आणि माझें भांडण झालें. तेव्हां ते मला रागारागानें म्हणाले,

"मिस्टर गायतोंडे, तुम्ही मूर्ख आहांत. यू आर ॲन इडियट्..."
मीं त्यांच्याकडे एक जळजळीत नेत्रकटाक्ष टाकला आणि म्हणालों,

"असेन असेन. मी मूर्ख असेन, पण तुम्ही मात्र अगदीं शुद्ध आशय आहांत."

श्री. अजिंक्य भयंकर संतापले.

"काय म्हणालांत तुम्ही मला गायतोंडे? परत बोला. पण लक्षांत ठेवा आपण कोणाशीं आणि काय बोलतों आहोंत तें!"

" होय, होय ! " मी दोन्ही हात हवेंत उडवून बाणेदारपणें म्हणालों, " मी काय म्हणालों आहें याची मला पूर्ण जाणीव आहे. बोला, मी तुम्हांला ' आशय ' म्हणालों. यावर काय म्हणणं आहे तुमचं ? तुम्ही नुसते आशयच नाहीं तर चांगले 'महा'आशय आहांत. "

अजिंक्यसाहेब माझ्यावर चांगलेच भडकले. मीं घातलेला घाव त्यांच्या अगदीं वर्मीं लागला होता. पण करतात काय ? ' आशया ' पेक्षां भारी शिवी न सांपडल्यामुळें ते नुसते ' साहेबाला सांगतों ', ' रिपोर्ट करतों ' वगैरे पोकळ धमक्या देत चरफडत गप्प बसले. आणि सुदैवानें हें प्रकरण एवढ्यावरच निभावलें.

आमच्या ऑफिसांत गन्सॉल्विस नांवाची स्टेनोग्राफर होती. तिच्या बाबतींतहि एकदां मोठीच गंमत झाली. त्या दिवशीं ती मोठ्या रुबाबांत ऑफिसला आली होती. तिला एकटीला गांठून मी म्हणालों,

" मिस् गन्सॉल्विस, यू आर अगदीं टेरिब्ली अभिव्यक्ति बुवा ! "

तें ऐकल्यावर पोरगी माझ्यावर अतिशयच खूष झाली. इतकी कीं, त्या दिवशीं जेवणखाण, चहापाणी सगळा खर्च तिनेंच केला.

पण गन्सॉल्विसला अभिव्यक्ति म्हटल्यामुळें माझी खरी मैत्रीण मिस् बेबी सातपुते माझ्यावर फारच रागावली. शेवटीं अभिव्यक्ति ही काय विलक्षण चीज आहे आणि मोठमोठ्या मी मी म्हणणाऱ्या लेखकांना- सुद्धां ती कशी सारखी छळीत असते याचें वर्णन करून तिची समजूत घालतां घालतां माझें तोंड दुखूं लागलें.

आशय आणि अभिव्यक्ति यांचे खरे अर्थ मला मीं पळवून आणलेल्या कागदांतून मिळालेले नाहींत तरी त्यांच्याबद्दल मीं मनाशीं एक खूणगांठ बांधून ठेविली.

| आशय | अभिव्यक्ति |
|---|---|
| पंतोजींना येणारा मुलाचा राग | त्यांनीं मुलाला मारलेली चपराक. |
| बायकोचा संताप | नंतर फुटलेल्या कपबशा. |
| ढवळेबुवांचें शास्त्रीय गायन | श्रोत्यांना येणारी निवान्त झोंप. |
| साहेबाचा बायकोवरील राग | त्यानें केलेली कारकुनाची हजामत. |

अशीं या शब्दांचीं उदाहरणें मीं लक्षांत ठेवलीं आणि त्यामुळें या दोन भयंकर शब्दांविषयींची माझ्या मनांतली अढी कमी होऊन त्यांच्याबद्दल भीतिहि हळूहळू वाटेनाशी झाली. म्हणून कुठल्याशा युगकर्त्या कवीनें ' टिंबें ' या आपल्या कवितेंत आशयाची प्रत्ययकारी अभिव्यक्ति केली आहे असें मीं परवां वाचलें तेव्हां हा कवि आपल्या वाचकांच्या श्रीमुखांत लगावीत आहे किंवा आपल्या कवितांचें बाड त्यांच्या डोक्यांवर आदळीत आहे असें मोठें मजेदार चित्र माझ्या डोळ्यांपुढें उभें राहून माझी फारच करमणूक झाली. अलीकडे या शब्दांना मी बिलकूल घाबरत नाहीं. इतकेंच नव्हे तर ते कुठेंहि वापरून मी मोठमोठ्या साहित्यिकांना सुद्धां गारीगार करून टाकीत असतों.

आशय आणि अभिव्यक्ति या जुळ्या दुखण्याप्रमाणेंच आणखी एक व्यथा मीं लेखनाच्या आणि संशोधनाच्या उपद्व्यापामुळें स्वतःच्यामागें लावून घेतली. ही शब्दांची जोडगोळी म्हणजे ' आकार ' आणि ' रेषा.' आतां वांग्याला आकार असतो किंवा आंब्याला रेषा असतात असें म्हटलें तर तें मला समजतें. पण कथेला आकार आणि रेषा दोन्हीहि असूं शकतात ही बातमी मला परवांपर्यंत नव्हती. माझी एक गोष्ट मीं एका संपादकांना दाखवली. त्यावर त्यांनीं लिहिलें, ' कथेचा आकार व रेषा दोन्ही अस्पष्ट आहेत.' आतां खरें पाहिलें तर आकार स्पष्ट न होणें म्हणजे कलाकृतीला एक धूसरतेची डूब येणें. हें चांगल्या कलेचें लक्षण नव्हे काय? बरें, रेषा स्पष्ट होणें ही गोष्ट खरें म्हणजे चांगली नव्हे; पण काय करणार? एकंदरींत ' आंबा ' आणि ' कथा ' यांत फरक आहे हेंच खरें. ' आकार ' आणि ' रेषा ' या शब्दांचा प्रयोग जेव्हां मीं आमच्या घरीं करून पाहिला तेव्हां फारच मौज झाली.

माझी बायको रोज पोळ्या करते; पण त्यांत तोच-तोचपणा येणें तिला सहन होत नाहीं. शिवाय कोठल्याहि कलावंताला ज्याप्रमाणें आपल्या कलाकृतीचा नेमका आकार अगोदर माहीत नसतो त्याप्रमाणें तिलाहि तो माहीत नसतो, त्यामुळें कांहीं दिवसांपूर्वीं तिनें एकदां गरम पोळ्या मला करून वाढल्या तेव्हां आमचा असा प्रेमळ संवाद झाला:—

" पोळ्या कशा झाल्या आहेत हो ? "

" हूं ... "

" अहो हूं काय? जरा दोन चांगले शब्द बोललांत तर कांहीं बिघडणार नाहीं. दुसरं कुणी आपल्याकरितां मरत असलं तर त्याला बरं म्हणून कांहीं पाप लागायचं नाहीं म्हटलं ! "

आतां कांहींतरी बोलणें भाग होतें. मनाचा धडा करून मी म्हणालों, " खरं तर तुझ्या पोळीचा आकार व रेषा दोन्ही बिघडलीं आहेत. "

बायको रागावण्याचा अनुभव सर्वांच्याप्रमाणेंच मींहि घेतलेला आहे. पण त्या वेळीं मला तिच्या रागाचा वेगळाच प्रकार अनुभवायला मिळाला. मी बोलल्यावर क्षणभर काय झालें हें मला कळलेंच नाहीं. नंतर एक मिनिटभर भूकंप झाल्यासारखें वाटलें. मग वीज कडाडल्यासारखें झालें आणि शेवटीं माझ्या डोळ्यांपुढें हजारों काजवे एकदम चमकून अंधारी आल्यासारखें झालें.

मीं थोड्या वेळानें पाहिलें तेव्हां समोरच्या रोवळींतली नारळाची वाटी उडी मारून माझ्या डोक्यावर जाऊन बसली होती आणि दोन मोठाले कांदे डोक्याला चाटून बाहेरच्या खोलींत जाऊन पडले होते.

म्हणजे किती फरक पडला तें पाहा !

पूर्वीं मी एकदां बायकोला ' तुझ्या पोळ्यांचा आकार विभागणीपूर्व भारताच्या नकाशाप्रमाणें हुबेहुब दिसतो आणि पश्चिमेच्या बाजूला असलेल्या दंतुर किनाऱ्याप्रमाणें पोळीलाहि कातरलेली किनार आहे ' असें म्हटलें होतें. तेव्हां फक्त आपली मान एकदां तिरस्कारानें उडविण्यापलीकडे तिनें कांहींच केलें नव्हतें.

आकार आणि रेषा या शब्दांचे अर्थ आणि महत्त्व हीं दोन्ही मला पूर्वीं कधींहि समजलीं नव्हतीं इतकीं त्या दिवशीं समजलीं.

आतां मी ज्यांचा अर्थ पळवून आणलेला आहे अशा शब्दांपैकीं एक फार मोठा शब्द. ' कथा ' हाच तो शब्द, हें वाचून आश्चर्य वाटावें. परंतु खरें आश्चर्य पुढेंच आहे. ' रामकथा ' किंवा ' हरिकथा ' यांमध्यें कथेचा जो अर्थ अभिप्रेत असतो तो येथें खरा नाहीं हें प्रथम लक्षांत ठेवलें पाहिजे. कथा याचा अर्थ ' गोष्ट ' असें कित्येक सामान्यांना वाटतें तेंहि

बरोबर नाहीं. 'कथा' याचा गुप्त अर्थ : जिच्यांत कोणत्याहि अर्थानें कथा नाहीं असें लेखन होय. उदाहरणार्थ, कोणतेंहि प्रवासवर्णन किंवा स्वभावचित्र, किंवा एखादी जाहिरात या नवीन अर्थानें कथा होऊं शकतात. याच नियमानें एखाद्या वेळीं कवितासुद्धां कथा होऊं शकते, पण कथा मात्र 'कथा' होऊं शकत नाहीं. आहे कीं नाहीं गंमत? घटना, गुंतागुंत-निरगांठ-उकल असले प्रकार आले असतां कथा होऊं शकते का, असें कोणी (मूर्खासारखें) विचारील. अंहं...तें मुळींच शक्य नाहीं. कलेच्या बाबतींत सामान्य माणसांचे नियम मुळींच खरे नसतात हें नेहमींच सामान्य लोक विसरतात आणि त्यामुळेंच सगळा घोटाळा होतो.

'कथा' या एवंगुणविशिष्ट आगळ्या शब्दाबरोबर कांहीं मराठी क्रियापदें वापरलीं असतां त्यांना किती वेगळा अर्थ प्राप्त होतो हें आतां पाहिलें पाहिजे. हीं क्रियापदें फारच गूढ असल्यामुळें मीं पळवून आणलेले लेखक-संपादक-संवाद जसेच्या तसें येथें हें अप्रस्तुत ठरूं नये.

**लेखक** : महाराज, माझी कथा हरवल्याबद्दल मला आपण लिहिलें व आतांहि तसेंच बजावितां याचा मला अचंबा वाटतो. कां कीं, मीं ती रजिस्टर पोस्टानें आपल्याकडे रवाना केली असून तिची पोंचहि मजजवळ आहे. कथा हरवली असल्यास मोठीच पंचाईत आहे. कारण माझ्यापाशीं तिची स्थळ प्रतदेखील नाहीं.

**संपादक** : मुला, येथें तुझा थोडा गैरसमज होतो आहे. कथा हरवली म्हणजे 'जोडे हरवले' किंवा 'मूल हरवलें' या अर्थानें आपण म्हणतों तसें येथें अभिप्रेत नाहीं.

(असें म्हणून संपादकांनीं शेजारच्या ड्रॉवरांतून लेखकाच्या कथेचें बंडल काढून त्याच्यापुढें ठेवलें. 'वस्तु' धडधडीत डोळ्यांसमोर दिसत असतांना ती चक्क हरवल्याचें हा इसम आपल्याला कां सांगतो याचा लेखकाला अचंबा वाटला.)

**लेखक** : मग महाराज, कथा हरवणें याचा अर्थ कृपया आपण मला सांगाल काय?

**संपादक** : वत्सा, कथा हरवणें म्हणजे शब्दांच्या कचाट्यांतून सुटून

ती पळून जाणें. वेगळ्या शब्दांत सांगायचें तर गोष्ट ‘ सांपडणें ’ म्हणजेच कथा ‘ हरवणें ’ होय. आलं का तुझ्या लक्षांत ?

( वास्तविक, त्या गरीब बिचाऱ्या लेखकाच्या कांहींच लक्षांत आलें नसतां त्यानें उगाचच मान डोलावली व ‘ होय ’ म्हटलें. कारण वरील स्पष्टीकरणामुळें त्याचा गोंधळ वाढून अधिक कांहीं समजण्याऐवजीं पूर्वीं समजत असल्यापैकींच कांहीं तरी हरवल्यासारखें त्याला वाटूं लागलें. )

**लेखक** : गुरुदेव, कथा नीट बांधली गेली नाहीं असा शब्दप्रयोग आपण केला आहे. यावर माझ्या एका मित्रानें नीट बांधायला तो होल्डॉल् वगैरे आहे कीं काय, असें विचारलें. यासंबंधीं आपण माझें शंकानिरसन कराल काय ?

**संपादक** : बाळा, कथा आणि होल्डॉल् यांत कांहींसें साम्य आणि बराचसा फरक आहे. कथेंत कांहींहि येऊं शकतें या अर्थानें ती ‘ होल्डॉल् ’ आहे, पण होल्डॉल्मध्यें सामान एकत्र नीट बांधायचें असतें तर कथेंत आशय कलात्मकतेनें विस्कटायचा असतो. हें ‘ कलात्मक विस्कटणें ’ म्हणजेच ‘ कथा बांधणें ’ ठरावें.

**लेखक** : महाराज, कथा ‘ फसते ’ याचा अर्थहि मला पामराला कळला नाहीं. तोहि आपण कृपा करून मला सांगाल काय ?

**संपादक** : कथेविषयींचें तुझें अज्ञान पाहून वाटतें कीं कथा फसणें म्हणजे ती वेगळ्याच संपादकाच्या हातीं पडणें, किंवा तिला मोबदला न मिळणें असें तुला वाटत असेल. पण हा गैरसमज ठरावा.

**लेखक** : नाहीं महाराज, मला तसें वाटत नव्हतें. आजकाल तरुण पोरी बदमाशांच्या जाळ्यांत सांपडून फसतात त्यांतलाच हा प्रकार असावा असें मला अज्ञाला वाटतें. पण बहुधा तें चूकच असावें.

**संपादक** : तूं म्हणतोस त्याप्रमाणें तुझा अर्थ चुकलाच. येथें फरक हा कीं, कथेला स्वतः लेखकच फसवितो आणि तिचा कलात्मक शेवट करण्याऐवजीं स्वतःचा शेवट करून मोकळा होतो.

**लेखक** : गुरुजी, आतां कुठें हें कथातत्त्व माझ्या डोक्यांत थोडेंथोडें झिरपूं लागलें आहे असा मला संशय येऊं लागला आहे. आणखी एक

प्रश्न आपल्याला विचारावासा वाटतो तो हा कीं, कथा ' हुकणें ' म्हणजे काय ? एवढें आपण मला विशद करून सांगावें.

**संपादक** : अवश्य, अवश्य बेटा. कथेचें प्रथम-लक्ष्य संपादक व नंतरचें वाचक हें असतें. या लक्ष्यावर कथेचा नेम लागला नाहीं तर कथा हुकली. ' फसणें ' आणि ' हुकणें ' यांत असलेलें कांहींसें साम्य येथें जाणवावें. याला इंग्रजींत ' मिस् ' होणें म्हणतात हें आठवावें. कथा ' पोंचणें ' याचाहि वेगळाच कलात्मक अर्थ आहे. तो तुझ्या नजरेंतून हुकूं नये. हें ' पोंचणें किंवा ' पोंचविणें ' वेगळेंच असल्यामुळें केवळ संपादकाचा पत्ता बरोबर लिहून ती पोंचेलच असें नाहीं. साधें पोंचणें वेगळें आणि कलात्मक पोंचणें त्याहून फारच वेगळें.

**लेखक** : आतां आणखी एकच क्रियापद मला आपण समजावून सांगावें. कथा ' पसरणें ' म्हणजे काय हें मला कधींच कळलेलें नाहीं. शाई कागदावर पसरते, किंवा माणूस गादीवर पसरतो त्यांतलाच हा कांहीं प्रकार आहे काय ?

**संपादक** : बाळा, तुला सगळेच चुकीचे अर्थ शिकविण्यांत आलेले आहेत याचें मला फार दुःख होतें. कथेचें अंथरूण जेव्हां तिच्या आशया-प्रमाणें पसरलें जात नाहीं तेव्हां ती पसरते. पसरट भांड्यांत ओतलेल्या पाण्याला ज्याप्रमाणें खोली नसते, केवळ खोलीचा आभास असतो; त्याप्रमाणें पसरट कथेंत आशयाचा आभास असतो. जेथें आशयच ' थिटा ' असतो तेथें छोटी कथाहि पसरल्यासारखी वाटावी, तर जेव्हां तो ' घन आणि टोकदार ' असतो तेव्हां लांबट दिसणारी कथाहि बरी वाटावी.

टोंक हा माझ्या मनांत घुसून बसलेला आणखी एक शब्द. भाल्याला टोंक असतें, करंजीला टोंक असतें, पेन्सिलीलाहि टोंक असतें. पण कथेला टोंक कसें असेल या विचारानें माझ्या मनांत घर केलें आहे. ' थिटा ' या शब्दाचें असेंच. हा शब्द मला प्रथम शाळेंत ट्रिग्नॉमेट्रींत भेटला. त्या वेळीं त्यानें माझ्याशीं खूप लगट करण्याचा प्रयत्न केला पण आमची मैत्री कधींच जमली नाहीं. मी त्याला नेहमीं टाळूं लागलों. पुढें मला दाख-वायला आणलेली एक मुलगी थेट या शब्दासारखी होती. तिला आम्हीं नाकारलें. मुलीच्या नाकाच्या रूपानें आलेल्या या शब्दाला त्या वेळींहि मीं

यशस्वीपणें टाळलें. पण पुढें मी कथालेखन करूं लागलों तेव्हां ' थिटा ' एके दिवशीं पोस्टांतूनच मजकडे आला. माझ्या एका साभार परत केलेल्या कथेबद्दल संपादकांनीं लिहिलें होतें : ' कथा बरी ( बरीच ) आहे. परंतु तिच्यांतील आशय थिटा वाटावा. शिवाय त्याला टोंकच कसें तें येत नाहीं. ' यानंतर मीं ' बाण ' या नांवाची एक टोंकदार दीर्घकथा लिहिली. परंतु तीहि रामबाणाप्रमाणेंच परत आली. या वेळीं तिला 'कांहींसें' टोंक आल्याचें संपादकांनींसुद्धां कबूल केलें होतें. परंतु आतां ती बरीचशी पसरट वाटली आणि नीट बांधली न गेल्यामुळें ' नेटकी ' वाटली नाहीं असें त्यांनीं लिहिलें होतें. साहजिकच मी फार अस्वस्थ झालों. मोठ्या परिश्रमानें मीं लेखणीला आणलेलें टोंकहि फुकट गेलें होतें. या कथेला मी परत शिवलोंहि नाहीं. चिमट्याच्या टोंकांत धरून तिला मीं सरळ बंबांतच टाकलें आणि बिचारी आपला आशय, टोंक, पसरटपणा आणि विस्कळीतपणा यांसह जळून खाक झाली. त्या दिवशीं आंघोळ करतांना बरें (बरेंच) वाटलें.

' अनुभव ' या वरपांगीं निष्पाप दिसणाऱ्या शब्दाचें असेंच. अनुभव म्हणजे कामाचा अनुभव असें सामान्यांना वाटतें. वाटणारच. पण वरवर दिसतें तसें कधींच नसतें. शिवाय येथें अनुभव ' घेणें ' आणि ' देणें ' हेहि कांहीं वेगळेच प्रकार असतात.

वाटोळ्या जिन्यावरून चालत जाणें हा एक अनुभव घेणें. या जिन्यावरून भराभरा चाललें म्हणजे धाप लागते, जीव खालींवर होतो, दमल्यासारखें होतें, चक्कर आल्यासारखें वाटतें. यांतला ' चक्कर ' हा खरा अनुभव. आतां तो ' द्यायचा ' त्यासाठीं तयार करावें लागतें तें ' आवर्त '. पूर्वी माणूस जिन्याभोंवतीं फिरत होता. आतां जिन्यालाच त्याच्या भोंवतीं फिरायला लावायचें. पहिलें, अनुभव घेणें, दुसरें, अनुभव देणें. पहिल्यांत चक्कर हा अनुभव असतो, दुसऱ्यांत अनुभव हाच चक्कर होतो. कपाटांतल्या डब्यांतला लाडू काढून देणें इतकी ही सोपी गोष्ट नाहीं. देण्याच्या आधीं घेणें असतें. आणि देण्याइतकें जरी तें अवघड नसलें तरी फार महत्त्वाचें असतें.

आतां ' पिणें ' हा एक अनुभव आहे. तो घेणें कोणालाहि जमेल पण तो दुसऱ्याला देणें हें मात्र कठीण जावें. ( पिऊन शिवीगाळ करणें किंवा

मारामारी करणें हा अनुभव देण्याचा प्रकार ' भडक ' वाटावा. ) पैशांच्या बाबतींतला अनुभव बराचसा तसाच आहे. पैसे घेणें सोपें परंतु देणें कठीण; तसेंच बिल घेणें सोपें, पण देणें कठीण. अनुभव देणें याचा पारमार्थिक अर्थ येथें अभिप्रेत नाहीं. आपल्या अनुभवाच्या पातळीवर वाचकाला घेऊन जाणें, असा त्याचा अर्थ. हा फरक नीट कळण्यासाठीं अनुभव कसा व्यक्त होतो याचीं दोन उदाहरणें पाहावीं. एक माणूस रस्त्यांतून चालला आहे तेव्हां तो धक्का खाण्याचा अनुभव घेतो. अगदीं साधा अनुभव, पण तो कसा दिला जातो पाहा.

नाजुक लेखिकेच्या पातळीवरून तो असा दिला जातो :—' धक्का... हुरहूर लावणारा...जुन्या आठवणी करून देणारा....

' १ एप्रिल....या दिवसाला एक वास आहे....धुंद करणारा वास आहे...धक्का देणारा पुढें जातो...ती हरवल्यासारखी जागच्याजागीं उभी राहते...'

आडदांड लेखकाच्या पातळीवरून मात्र तोच अनुभव असा दिला जातो. ' कारं भाड्या, लई माजलास ! जरा नीट कां जाईनास रस्त्यावरून... कां मोडूं रं तुजं पॅकाट्. आं ? ...'

आतां बाईंचेंच उदाहरण घेऊं. त्यांना मिळालें काय आणि त्यांनीं दिलें केवढें ! कोणातरी माणसानें त्यांना उगाच जातां जातां धक्का दिला तेव्हां त्यांना वाटलें, ' कॉय बै हीं माणसं धक्के देतात तरी. मागें एकदां तुळशीबागेंत चाललें होतें तेव्हां अस्साच एका मेल्यानं धक्का दिला होता.' असा हा साधा अनुभव घेऊन त्यांनीं अनुभूतीचें केवढें विश्व केवळ चार ओळींत आणि चाळीस टिंबांत निर्माण केलें आहे !

टी. सी. अर्धचंद्र नांवाचे एक भले मोठे मराठी क्रिटिक् आहेत. त्यांच्याशीं झालेल्या माझ्या एका डॉक्टर मित्राच्या बोलण्यावरून मला आणखी एका शब्दाचा अर्थ मिळाला. ती एक मोठी मनोरंजक हकीकतच आहे. एकदां माझ्या मित्राला अर्धचंद्र सहज भेटले आणि ते दोघे हॉटेलांत बोलत बसले. डॉक्टरमहाशयांनीं कांहीं कथाहि लिहिलेल्या आहेत. तेव्हां ते बोलतां बोलतां म्हणाले,

" माझ्याबद्दल आपल्याला काय वाटतें ? "

" व्हेऽऽन् " इतकेंच बोलून अर्धचंद्र गप्प बसले. पुढें ते नुसते खात आणि पीतच राहिले. बोलेचनात. शेवटीं माझ्या मित्रानें विचारलें,

" अहो सद्‌गृहस्थ, व्हेन आर यू गोइंग टु प्रोसीड ?"

" तुमची व्हेन् " अर्धचंद्र परत एकदां गंभीरपणें म्हणाले आणि त्यांनीं मान हलवली, " व्हेरि सॉरी...."

" अहो ठीक आहे, व्हेन माझीच आहे ना ? मग तिच्याबद्दल तुम्हांला एवढं दुःखी व्हायचं कारण काय ?..."

" खेद वाटतो कीं व्हेन सांपडत नाहीं. " या वेळीं क्रिटिक एक सबंध वाक्य बोलले.

बऱ्यापैकीं डॉक्टर असलेला माझा मित्र एकदम कावराबावरा झाला. एवढ्या मोठ्या धडधाकट माणसाची व्हेन न सांपडणें ही फार विलक्षण गोष्ट होती.

" व्हेन सांपडत नाहीं म्हणजे म्हणायचंय तरी काय आपल्याला ? "

" इतकंच कीं आपण व्हेन हरवली आहे. एके काळीं ती आपल्याजवळ होती. " अर्धचंद्र गंभीरपणानें म्हणाले.

" महाशय, आपण माझ्या गोष्टींबद्दल बोला. आवडल्या नसतील तर भिकार आहेत म्हणा. पण ' व्हेन ' आणि ' नाडी ' याबद्दल मला आपण शिकवूं नका. कांहीं झालें तरी आयुर्वेदभीष्म किंजवडेकर वैद्यांचा मी नातू आहें..."

एवढा विनोद झाला तरी क्रिटिकमहाशय बिलकूल डळमळले नाहींत. अत्यंत गंभीरपणें मान हलवून ते परत म्हणाले,

" कलावंत म्हणून आपली जी व्हेन ती आपण केव्हांच हरवली आहे. तुमच्या व्हेनबद्दल मी बोलत नाहीं....बरं मग काय ? सिगरेट वगैरे मागवा बुवा ! "

त्यांच्या या थंडपणामुळें मात्र माझ्या डॉक्टर-मित्राला आपली व्हेन हरवली असल्याचा खरोखरच दाट संशय आला.

नाडी सांपडते काय, हरवते काय, सगळाच अजब प्रकार. पण त्याचें खरें कारण अज्ञ लोकांना शब्दांचे नवे अर्थ माहीत नसतात हेंच आहे.

कांहीं नव्या शब्दांतील जे अब्द अब्द ( म्हणजे काय ? बहुधा अब्ज-अब्ज-खू SSSप असें कांहींतरी ) मला कळलें आहे किंवा निदान तसें मी यशस्वीरीत्या दाखवूं शकतों यावर प्रकाश पाडण्याच्या दृष्टीनें श्री. अर्धचंद्र यांना मीं एकदां कसें निरुत्तर करून टाकलें यासंबंधींचा किस्सा फार मजेदार आहे.

" तुमची परवांची कथा वाचली ! " एकदां आम्ही रस्त्यावर भेटलों तेव्हां अर्धचंद्र मला म्हणाले.

" अस्सं का, वाः फार छान ! कशी वाटली ? " वास्तविक असा प्रश्न विचारण्याचा मूर्खपणा मीं करायला नको होता.

" तसं कशाला ? आपण आंतच बसूं या कीं, म्हणजे मोकळेपणीं जरा बोलतां येईल. " अर्धचंद्र म्हणाले आणि समोरच्या हॉटेलांत वळले. मी त्यांच्याबरोबर आंत गेलों. हा मूर्खपणाहि मीं करायला नको होता. ( कारण शेवटीं बिल मला द्यावें लागलें. )

आंत बसल्यावर अर्धचंद्रांनीं निरनिराळे पदार्थ खायला मागविले.

" तुमच्या कथेंत आगळें जीवनसंशोधन जाणवत नाहीं. " बटाटे-पोह्यांतील बटाट्याचें संशोधन करीत ते म्हणाले.

" पण वेगळें जीवनदर्शन तरी जाणवावें. " काटा आणि सुरी हातांत घेत मी म्हणालों.

" शिवाय कथेमध्यें थेटपणा नाहीं." सबंध बटाटावडा थेट तोंडांतच पोंचवीत अर्धचंद्र उद्गारले.

" पण त्यांतले वेगवेगळे ताण आणि लय बरोबर साधले ऑहेत नॉहीं कॉ ? " शेवटचे तीन शब्द बोलतांना माझ्या तोंडांत बटाटेवडा होता.

" तें जरी खरें असलें तरी जो एक प्रत्यायक भेदकपणा त्यांत यायला पाहिजे तो नाहीं." आपल्या हातांतला प्रत्यायक काटा भेदकपणें मसाला-डोशांत घुसवीत अर्धचंद्र म्हणाले.

" तरी त्यांत जें एक प्रकारचें प्रौढ आणि जाणतें कारुण्य आणि शिवाय नर्मकोमल परिहास आहे तो लक्षांत घेतला जावा."

" जीवनाच्या हिरव्या डोहांत तुम्हीं बुडी मारली आहे असं वाटत नाहीं." संपणाऱ्या मसाला डोशाकडे व्यथित नजरेनें पाहात ते म्हणाले, " तरीहि एक कसली तरी अनामिक हुरहूर त्यांत मला जाणवली..."

" पण निदान ' जीवन 'च्या गहिऱ्या तळघरांत सध्यां आपण बसलों आहोंत एवढें तरी तुम्हांला पटतें ना ? "...आतां माझा धीर हळूहळू सुटत चालला होता.

" तसं पाहिलं तर एका नव्या खोलीचा शोध घेण्याचा तुम्ही प्रयत्न करीत आहांत असं जाणवतं." माझ्याकडे एक कृपाकटाक्ष टाकीत अर्धचंद्र म्हणाले,

" प्रयत्न ! मला केव्हांच नवी खोली सांपडली महाराज. हा काय तिकडेच चाललों..."

म्हणून मी सरळ उठलों आणि चालायला लागलों. आणि त्या वेळीं मजकडे अर्धचंद्रांनीं जो जळजळीत नेत्रकटाक्ष टाकला त्यावरून प्रत्यायक भेदकपणा म्हणजे खरें काय हें माझ्या प्रथमच लक्षांत आलें.

मराठींतले हे आणि असे कित्येक नवेनवे शब्द आजकाल मी लीलया आणि अत्यंत परिणामकारकपणें वापरूं शकतों; आणि विश्वास ठेवा अगर ठेवूं नका, आमच्या सर्व घराण्यांत जी सहजच शब्दप्रभू ठरेल अशा माझ्या बायकोलासुद्धां मीं निदान कांहीं वेळां या शब्दांच्या साहाय्यानें निरुत्तर केलेलें आहे.

◎ ◎ ◎

१

# सर्वोदय संमेलन

त्या दिवशीं मी ठाण्याला चाललों होतों.

—पण माझ्या स्वतःच्या कामासाठीं नव्हे, हें सुरुवातीलाच स्पष्टपणें सांगितलें पाहिजे. मी चाललों होतों तो आमच्या शेजारच्या बनूमावशींच्या एका कामासाठीं. मावशींचे भाऊ मामा बरवे यांना ठाण्याच्या इस्पितळांत उपचारांसाठीं ठेवलेलें होतें. त्यांना कांहीं वस्तु पोंचवायला मावशींनीं माझ्याजवळ दिल्या होत्या. त्या कांखोटीला मारून मीं ठाणें स्टेशनवर उतरलों.

अर्थात् मला ठाण्याची कांहींच माहिती नव्हती आणि इस्पितळ कुठें आहे हें तर त्याहूनहि माहीत नव्हतें. मामा बरव्यांनाहि मीं पाहिलेलें नव्हतें त्यामुळें चौकशी करणें भाग होतें.

मी स्टेशनवर उतरलों तों त्या दिवशीं लोकांची एकच गर्दी तिथें उसळली होती. विशेष म्हणजे या गर्दींतील बहुतेकांनीं खादीचे कपडे घातलेले होते आणि ते सगळे फार कामाच्या गर्दींत दिसत होते.—निदान कामाच्या गर्दींत असल्यासारखे अतिशय लगबगीनें ते इकडून तिकडे फिरत होते. खादीचें वेड कित्येकांना असतें असें मीं ऐकलें होतें. पण खादी आणि वेड यांचा इतका जवळचा संबंध असेल अशी मला कल्पना नव्हती. हे सर्व लोक तिथें कशाकरितां आले आहेत, मला कांहींच समजेना.

मी गोंधळून तिथेंच उभा राहिलों. कुणाला तरी विचारावें असें वाटत होतें; पण ते सर्वच खादीवाले इतके कामांत होते कीं, त्यांपैकीं एकालाहि थांबवून विचारायचें धैर्य मला झालें नाहीं.

म्हणून मीं थोडासा विचार केला. तेवढ्यांत खादीचे कपडे नुसलेला एक माणूस गर्दीतून अगदीं बाजूला एकटा उभा असलेला मला दिसला. हा माणूस कामांत दिसत नव्हता. मी हातांतली पिशवी संभाळीत त्यांच्या-जवळ गेलों.

" अहो, कृपा करून इथलं इस्पितळ कुठं आलं सांगाल का ? " मीं त्याला विचारलें.

" कां ? अगदीं नेमकं मला विचारलंत ? " तो गृहस्थ जरा चिडल्या-सारखा दिसला.

" सभ्य गृहस्थ असे आपण एकटेच इथं दिसलां म्हणून मीं आपल्याला विचारलं." मी घाईघाईनें त्याला म्हणालों.

" एवढ्या गर्दीत तुम्हांला सभ्य गृहस्थ ओळखतां आला ? फार हुषार दिसतां बुवा तुम्ही ! " त्या माणसाच्या चेहेऱ्यावरचा त्रासिकपणा अजिबात गेल्याचें पाहून मला फार आनंद झाला.

" कसचं कसचं ! " मी म्हणालों. खरें म्हणजे एका त्रयस्थ माणसानें पहिल्याच भेटींत काढलेले हे उद्गार माझ्या हुशारीबद्दल अगदीं वेगळें मत असलेल्या माझ्या बायकोला सुनावले जाणें हें अत्यंत आवश्यक होतें.

" तुम्हांला इस्पितळांत जायचंय् ना ? मग चला माझ्याबरोबर. एक फार मोठं इस्पितळ इथं समोरच आलं आहे. माझंहि अनायासं एकदां परत पाहाणं होईल,—तुमचंहि काम होऊन जाईल."

" वाः वा: ! तुम्हीहि येत असाल तर फारच छान ! चांगली सोबत मिळाली."

आणि आम्ही दोघे स्टेशनबाहेर पडलों.

रस्त्यावरसुद्धां सगळीकडे एकच गर्दी उसळली होती. लोक सारखे इकडून तिकडे आणि तिकडून इकडे जात-येत होते. माणसांचा नुसता कालवा झाला होता. त्यांत आणखी सायकली, टांगे, मोटारी, बैलगाड्या यांची भर पडली होती. आसपासच्या दुकानांतूनहि खूप गर्दी झाली होती. एकंदरींत तिथें मोठीशी जत्राच भरल्यासारखें वाटत होतें.

त्या गर्दीतून वाट काढीत आम्ही दोघे गेलों. लोकांचे धक्के खातखात गेलों आणि शेवटीं एक मोठें प्रवेशद्वार दिसायला लागलें त्याच्यापाशीं जाऊन ठेपलों.

'अखिल वैश्विक बरवोदय जंमेलन'

—अशी मोठ्या ठळक अक्षरांत लिहिलेली पाटी तिथें झळकत होती. हा कांहींतरी वेगळाच प्रकार दिसला!

"अहो, पण मला जायचंय् इस्पितळांत अन् तुम्ही तर मला या जंमेलनांत घेऊन चाललांत! बरव्यांना एकदां हें सामान द्यायचंय् आणि मीं लगेच परत जाणार आहें. गेलंच पाहिजे मला लगेच."

मीं असं म्हटल्याबरोबर तो माणूस कां चपापला हें मला मुळींच कळलें नाहीं.

"हां हां! म्हणजे तुम्ही आचार्य बरव्यांबद्दल म्हणतांय् ना? आलं माझ्या लक्षांत! आपण जाऊं या ना! प्रत्यक्षच त्यांची भेट होईल." झपाझप पावलें टाकीत ते गृहस्थ म्हणाले, "अहो, त्यांना आपण भेटलोंच असं समजा ना तुम्ही!"

—परंतु तरीहि मामा बरव्यांची भेट या जंमेलनांत होईल असें मला वाटेना. कारण इस्पितळ या नांवाला साजेल असें तिथें कांहींच दिसत नव्हतें. एक मोठा शामियाना, बाजूला लहान तंबू-राहुट्या, असा सगळा प्रकार दिसत होता. वेड्या लोकांना मोठ्या बंदोबस्तांत प्रचंड भिंतींच्या आंत खोल्यांत बंद करून ठेवतात असें मीं ऐकलें होतें. मला आलेली शंका मीं बरोबरच्या त्या गृहस्थांना ताबडतोब बोलूनहि दाखवली.

तेव्हां माझ्या कानाशीं वांकून ते हळूच म्हणाले,

"अहो, ही वेड्यांना ट्रीटमेंट देण्याची अमेरिकन मेथड आहे. 'ओपन एअर मेथड' म्हणतात हिला. वेड्यांना स्वच्छंदानं राहूं द्यायचं, वागूं द्यायचं; म्हणजे ते आपोआप सुधारतात किंवा निदान आहेत त्यापेक्षां बिघडत नाहींत, असा अमेरिकन शोध आहे. तें 'कम्युनिटी डेव्हलपमेंट' म्हणून अमेरिकन वेड आपल्याकडे आणलेलं आहे ना, तसाच हाहि एक प्रकार आहे!"

या गृहस्थांचं सामान्य ज्ञान एकंदरींत फार अद्यावत् वाटलें.

"बरं, पण 'इस्पितळ' असं सरळ नांव देण्याऐवजीं नांव ठेवण्याचा हा काय अजब प्रकार आहे? का हीहि अमेरिकन मेथड?" मीं आणखी एक शंका विचारली.

" तो एक मानसशास्त्राचा प्रकार आहे बरं का ! ' बरवोदय जंमेलन ' असं अगदीं वेगळंच नांव इथं मुद्दाम दिलेलं आहे. ' इस्पितळ ' हें नांव फारच भडक वाटतं, आणि वेड्यांच्या मनावर त्याचा फार अनिष्ट परिणाम होण्याची भीति असते."

माझें पुरतें समाधान झालें नाहीं, पण या नवीन प्रकाराविषयीं माझ्या मनांत फार कुतूहल निर्माण झालें होतें. शिवाय बरव्यांना सामान दिल्यावर मला आणखी कांहींच काम नव्हतें. परत जायला गाडी होती संध्याकाळीं. तेव्हां मीं सगळीकडे हिंडायचें आणि जंमेलनांतील व्यक्ति आणि वह्री प्रत्यक्ष पाहायच्या असें ठरविलें.

पहिल्याच तंबूमध्यें आम्हांला प्रोफेसर निष्कांचन भेटले.

" जय कांचनमुक्ति ! या बाळांनों ! बसा ! जय कांचनमुक्ति ! " ते सहास्य वदनानें म्हणाले.

माझ्या वाटाड्यानें मला खुणावलें आणि आम्ही दोघे मोठ्यानें ओरडलों, " जय कांचनमुक्ति ! जय कांचनमुक्ति ! "

आम्ही बसलों आणि प्रोफेसरसाहेबांनीं लगेच भाषणालाच सुरुवात केली—

" बाळांनों, आपण सगळे कांचनदास असल्यामुळं किती दुःखी आहोंत बरं ! सदैव आपण याच्याच विवंचनेंत असतों, तेव्हां कुठं महिन्या-कांठीं पन्नास-साठ रुपये आपण मिळवूं शकतों. आणि यांत वांटेकरी किती असतात ? बायकोला दागिने हवेत. कपडे हवेत; मुलांना खेळणीं हवींत, खाऊ हवा. दूधवाला, दाणेवाला, घरवाला—सगळ्यांना कांचनाची हांव सुटलेली. पण या कांचनमृगाच्या मागं धांवून शेवटीं निष्पन्न काय होतं बरं ?—दुःख ! प्रभु रामचंद्र आणि माता सीतासुद्धां यांतून सुटलीं नाहींत बाळांनों ! तेव्हां कांचनाची हांव सोडा...स्वतःला दुःखांतून मुक्त करा... बायकोसकट इतर सर्वांना मुक्त करा !... " बोलतां बोलतां प्रोफेसर निष्कांचन थकल्यासारखे वाटले आणि ' कांचनमुक्ति ' असा दोनदां घोष करून स्वस्थ बसले. आम्हांलाहि त्यांची री ओढावी लागली.

इतक्यांत त्या तंबूच्या दाराशीं कांहीं गडबड झाली आणि एक तरुण खादीधारी धांवतच आंत आला.

" गुरुदेव, या घ्या तुमच्या सुताच्या गुंड्या ! तो पोस्टाचा कारकून त्या घ्यायला तयार नाहीं ! " तो तरुण तावातावानें म्हणाला.

" बाळा, तूं कांहीं चुकलास का ? मानव स्खलनशील आहे. कांचन-मुक्ति, कांचनमुक्ति ! " गुरुदेव धीरगंभीर स्वरांत म्हणाले.

" चुकलों गुरुदेव ! कांचनमुक्ति, कांचनमुक्ति ! " तो शिष्य शरमिंदा होऊन म्हणाला.

" मग काय म्हणालास ? तो पोस्टाचा कारकून आपल्या सुताच्या गुंड्या घेऊन कार्ड-पाकिटं द्यायला तयार नाहीं ?—बरोबर आहे ! कदाचित् आपलं सूत वाईट असेल. निष्ठा ढळली कीं धागा कच्चा येतो बाळ."

" कांचनमुक्ति ! गुरुदेव, तो कशाला धागा पाहात बसलाय्. पहिल्यांदां त्यानं 'सुताच्या गुंड्या चालायच्या नाहींत, पैसे आणा.' म्हणून सांगितलं. मी हुज्जत घालायला लागलों, तेव्हां गुंड्या उचलून त्यानं त्या रस्त्यावरच फेंकून दिल्या ! "

बोलतां बोलतां शिष्याचा आवाज चढला आणि शेवटीं तो रागानें थरथर कांपायला लागला.

" कांचनमुक्ति ! बाळा, अरे, शांत हो ! सत्य हें लोकांना आणि विशेषतः सरकारी सेवकांना इतक्या लौकर समजेल असं कसं बरं वाटतं तुला ? इतकी घाई करून नाहीं चालायचं बरं ! "

" अहो, तें ठीक आहे; पण सुताच्या गुंड्या न घेऊनच्या घेऊन शिवाय वर अपमान करायचा म्हणजे काय ?... " अन् मग घाबऱ्या-घाबऱ्या तो म्हणाला, " माफ करा गुरुदेव ! कांचनमुक्ति ! "

" अरे, असा काय अपमान केला त्यानं तुझा ? "

" अहो, तो चक्क म्हणाला कीं, या बरवोदयवाल्या मूर्खांपेक्षां ते इस्पितळांतले वेडे अधिक शहाणे आहेत ! "

" हात्तिच्या ! एवढंच म्हणाला ना ? अरे बाळा, प्रत्येकाला सत्य बोलण्याचा अधिकार असलाच पाहिजे. आपलं वेडेपण हें त्यांच्या दृष्टीनंच काय, पण कदाचित् खरोखरच सत्य असूं शकेल ! कुणी सांगावं ! असो. पण तूं हिंसा तरी केली नाहींस ना ? "

"नाहीं गुरुदेव, मी त्याला फक्त 'तुम्ही फार शहाणे आहांत!' एवढंच म्हणालों."

"ही हिंसासुद्धां कांहीं लहान झाली नाहीं. पण त्यानं कांहीं केलं का?"

"हो. त्यानं एक लांकडाचा ठोकळा माझ्या डोक्यावर भिरकावून मारला. केवढं टेंगूळ आलं आहे पाहा तुम्हीच!" डोक्यावरच्या टेंगळाकडे हात नेत शिष्य म्हणाला.

"कुछ फिकीर नही बेटा! 'गुणी गुणिनं वेत्ति'—आचार्यांनीं म्हटलेलं आहे. जा तूं आतां."

शिष्य डोकें चोळत चोळत बाहेर गेला.

नंतर पसरलेली भयानक शांतता भंग करून मीं विचारलें,—

"गुरुदेव, पण आतां आपण कार्ड-पाकिटांचं काय करणार?"

"काय करणार? अर्थातच पैसे देऊन विकत आणणार बाळ! जोंपर्यंत पोस्टांतील कारकुनाच्या मनांत 'बरवोदय' होत नाहीं, तोंपर्यंत आपण काय करणार? आचार्य हेच सांगतात, दुसरं काय? जोंपर्यंत दुसरे लोक बरवोदयाच्या मार्गानें येत नाहींत, तोंपर्यंत हेंच. एकला चालो रे! पण एक मात्र मी नक्कीच करीन. कार्ड-पाकिटं माझ्या पैशांनीं आणणार नाहीं. मी स्वतःहि तीं आणणार नाहीं. हा शिष्यच तीं आणील. त्यावर मजकूर लिहिण्यासाठींसुद्धां मी त्यांना शिवणार नाहीं. त्यालाच लिहायला सांगून त्यालाच पोस्टांत टाकायला सांगेन. काय करायचं बाळांनों! कांचनमुक्ति जमली नाहीं तर अभिमानमुक्ति करायला पाहिजे. कांहींहि करायचं,—पण कांचनाला स्पर्श नाहीं." गुरुदेव बाणेदार गंभीरपणानें म्हणाले.

मग मला कळलं कीं गुरुदेवांना त्यांचे शिष्य खूप पैसे पाठवितात. आणि ते त्यांतून स्वतःचा सगळा योगक्षेम व्यवस्थित चालवतात. पण पैशाला स्वतः स्पर्श? छेः छेः! नांव नको! पैशाला ते कधीं हात म्हणून लावीत नाहींत.

आमचें असें बोलणें चाललें होतें, इतक्यांत बाहेरच्या बाजूला परत कांहींतरी गडबड झाली. आणि 'चोर ! चोर !' 'पकडा ! पकडा !' अशा आरोळ्या ऐकूं आल्या. मीं जरा बाहेर डोकावून पाहिलें, तों निष्कांचनगुरुजींचा एक शिष्य एका फाटक्या माणसाला ओढीत ओढीत आमच्याच तंबूकडे आणीत होता.

"गुरुदेव, हा माझं पैशाचं पाकीट चोरून नेत होता." त्याला गुरुदेवांच्या पुढें आणून हजर करीत शिष्यानें सांगितलें.

"बाळा, तुझीच द्रव्याची पिशवी चोरून नेत होता ना तो? मग काय चुकलं त्या बिचाऱ्याचं? तुला कांचनाचा मोह सुटत नाहीं. हा चोर म्हणजे तुला कांचनमुक्तीचा संदेश देणारा गुरुच भेटला! सोडून दे त्याला आणि पड त्याच्या पायां. अरे, आपल्या गुरूला का कुणीं असं धरून आणतं?"

शिष्य हतबुद्ध होऊन नव्या-जुन्या दोन्ही गुरुदेवांच्याकडे पाहातच राहिला.

आणि तो आपल्या नव्या गुरूच्या पायां पडायच्या आंत एक मोठाच चमत्कार झाला.

आपल्या खिशांत लपवून ठेवलेली 'द्रव्यपिशवी' काढून ती गुरुदेवांच्या शिष्याच्या अंगावर फेंकून देत तो चोर म्हणाला,—

"खोट्या नोटा असत्याल, दुसरं काय? मला नगं त्या खोट्या नोटा! उगा नसता कार जिवाला!" आणि तो तंबूच्या बाहेर जायला वळला.

"अरे, त्या नोटा खऱ्या आहेत. घेऊन जा बघूं त्या! कल्याण असो तुझं!" गुरुदेव सहास्य वदनानें म्हणाले. शिष्य स्वतःचें पाकीट जातें म्हणून चुळबुळत उभाच होता.

"येकदां नगं म्हणून सांगितलं ना रं बाबा! खोट्या नोटा बाळगनं गुन्हा असतो. च्या बायली! आन् म्हनं, जा घिऊन! जा घिऊन!" चोरानें पैशाच्या पाकिटाकडे ढुंकूनसुद्धां पाहिलें नाहीं आणि तो त्याच पावलीं तिथून निघून गेला.

"अरेरे! त्या बिचाऱ्याची खात्री मी करूं शकलों नाहीं ना? तें कांहीं नाहीं! माझ्यांतला हा दोष जाण्यासाठीं आतां निदान दोन घटका

अन्नमुक्ति ! या काळांत मी फलाहाराशिवाय कांहींहि घेणार नाहीं." गुरुदेव म्हणाले. आणि नंतर आमच्याकडे वळून त्यांनीं सांगितलें, " बरं बाळांनो, मी जातों. मला गेलं पाहिजे." मग ते आंतल्या बाजूला अन्नमुक्ति मोडेपर्यंतच्या काळांत केवळ फलाहार करण्यासाठीं एकटे निघून गेले.

आम्हीहि तिथून बाहेर पडलों.

" कांचनमुक्ति ते अक्कलमुक्ति असा यांचा एकंदर प्रवास दिसतो ! " आम्हीं शेजारच्या तंबूंत शिरत असतांना माझा वाटाड्या म्हणाला.

या तंबूंत आम्हांला एक फारच मजेदार दृश्य पाहायला मिळालें. तंबूच्या मध्यभागीं एक गृहस्थ खालीं डोकें आणि वर पाय याप्रमाणें उभे होते. आम्हांला पाहतांच ते म्हणाले, " या मित्रांनों ! हठयोग तुम्हांला प्रसन्न होवो ! बरवी दृष्टि तुम्हांला हठयोगामुळं प्राप्त होवो ! "

सर्वांनीं हठयोग केल्याशिवाय विश्वामध्यें 'बरवोदय' होणार नाहीं अशी या ऊर्ध्वपादानंदांची खात्री होती. त्यांचा हठयोग सतत चालू असेच; खेरीज ते नेहमीं खालीं डोकें आणि वर पाय असे राहत. हातांत जोडे आणि पायांत टोपी घालीत. 'जगांतल्या सगळ्या दुःखांचें एकमेव कारण म्हणजे जग उलटें चाललें आहे हें होय,' असें स्वामीजींनीं आम्हांला सांगितलें. आणि आम्हांला तें पटत नाहीं असें वाटल्यावर त्यांनीं आम्हांला हातांवर उभे राहायला लावून विचारलें, " आतां दिसतं कीं नाहीं उलटं ? "

यावर 'हो' असें म्हणण्याशिवाय आम्हांला गत्यंतर राहिलें नाहीं.

आम्हीं स्वामीजींचा निरोप घेतला तेव्हां ते हातानें चालत तंबूच्या दरवाजापर्यंत आले आणि दोन्ही पाय जोडून त्यांनीं आमचा निरोप घेतला.

खालीं डोकें वर पाय करून ते उत्तमपैकीं पळूं शकतात आणि सकाळीं हा व्यायाम चालू असतांना जेव्हां लोक त्यांच्या मुलाखतीला येतात, तेव्हां तशा स्थितींत त्यांच्याबरोबर पळूनच लोकांना त्यांच्याशीं प्रश्नोत्तरें करावीं लागतात, असें मला कळलें. 'स्वेल् गाय' नांवाच्या अमेरिकन माणसानें त्यांची अशी एक मुलाखत घेऊन ती 'मॅड्'मध्यें प्रसिद्ध केली होती म्हणे !

ऊर्ध्वपादानंदांच्याकडून आम्ही निघालों आणि सदा-आनंदांकडे गेलों. हे गृहस्थ इतके आनंदी असण्याचें कारण म्हणजे त्यांनीं पांच मुक्ति एकदम मिळविल्या होत्या : धोबी-मुक्ति, नापित-मुक्ति, शिंपी-मुक्ति, चांभार-मुक्ति आणि संसार-मुक्ति. कपडे धुवायचे नाहींत, हजामत करायची नाहीं, कपडे घालायचे तर ते कुठेंहि शिवलेले असतां कामा नयेत, पायांत जोडे घालायचे नाहींत, आणि लग्न करायचें नाहीं, असा त्यांचा बाणा होता.

शिवलेले नेसायचें नाहीं असा त्यांचा नियम असल्यामुळें ते एक लुंगी नेसले होते आणि खांद्यावर पंचा टाकला होता. त्यांनीं नेसलेली लुंगी दोन पायांत फारसें अंतर ठेवून बांधलेली नव्हती. त्यामुळें त्यांना सामान्य माणसासारखें एकापुढें एक पाय टाकून चालतांच येत नव्हतें. दोन पाय एकत्र ठेवून बेडूक-उड्या मारीतच ते आम्हांला भेटायला आले आणि त्यामुळें आमची बरीच करमणूक झाली.

" आमच्या पांच मुक्ति म्हणजेच खरं पंचशील बरं का रे पोरांनों ! " ते म्हणाले. आणि आम्हीं होकारार्थी माना डोलावल्या.

या मुक्त माणसाचा अवतार फारच आगळा दिसत होता. धोबी-मुक्तीमुळें त्याचे कपडे इतके काळे झाले होते कीं, त्याच्या स्वतःच्या रंगाशीं ते अगदीं एकरूप होऊन गेले होते. नापित-मुक्तीमुळें त्याच्या दाढीमिशांचें रान छानदार वाढलें होतें आणि जटाभारसुद्धां कामिनिया हेअर ऑइलच्या जाहिरातींतल्या सुंदरीला लाजविण्याइतका विपुल होता. चांभार-मुक्तीसाठीं त्यानें पायांत खडावा घातल्या असत्या तरी चाललें असतें; पण त्यामुळें सुतार-मुक्तीचा प्रश्न उद्‌भवला असता; म्हणून त्यानें पायांभोंवतीं सुंभाची दोरी गुंडाळली होती. हा प्रकार चालण्याच्या दृष्टीनें कितीहि अवघड वाटला तरी दिसण्याच्या दृष्टीनें विलोभनीयच होता. बायकोपासून मिळालेल्या मुक्तीमुळें मात्र या माणसाच्या चेहेऱ्यावर एक प्रकारचा तजेला दिसत होता आणि तो प्रचंड जटाभारांतहि लपूं शकत नव्हता, हें मला कबूल करावेंच लागलें.

सदाआनंदांच्या शेजारीं होते रसनानंद. जंमेलनांतल्या ज्या सभासदांनीं

भोजनमुक्ति मिळविली नव्हती त्यांचा स्वैंपाक रसनानंद स्वतः करीत. आम्ही त्यांच्या तंबूंत गेलों तेव्हां त्यांची स्वैंपाकसिद्धि चाललीच होती.

"अरे ! या पाहुण्यांसाठीं दोन थाळ्यांतून पूर्णान्न घेऊन या पाहूं !" असें रसनानंद म्हणाले आणि आमच्यासमोर बसले. 'पूर्णान्न' म्हटल्यामुळें माझ्या तोंडाला पाणी सुटलें. कारण घरून निघाल्यापासून मीं कांहींच खाल्लेलें नव्हतें. सुदैवानें स्वयंसेवकहि लौकरच पूर्णान्नाच्या दोन थाळ्या घेऊन आला. आणि मी त्यांतील पदार्थ खायचा प्रयत्न करूं लागलों. प्रयत्न करूं लागलों याचा अर्थ असा कीं, मी तो विलक्षण पदार्थ खाऊं शकलों नाहीं. सर्व भाज्या आणि सर्व धान्यें यांचें तें एक एकत्र शिजवलेलें अजब मिश्रण होतें. या 'सर्वोदयी खिचडी'चा घांस घेणें ही एक फार अवघड क्रिया होती; कारण पूर्णान्नाचा तो गोळा च्युइंग गम्‌सारखा होता आणि तो कांहीं केल्या तुटेना. शेवटीं माझ्या वाटाड्या गृहस्थांनीं तो गोळा एका बाजूनें धरला आणि मीं दुसऱ्या बाजूनें धरला. तो तोडतां यावा म्हणून आम्ही एकमेकांपासून थोडें दूर झालों आणि मग आमच्यांतलें अंतर दहा-बारा फूट झालें तरी तो गोळा तुटेना. गोळा आपला लांबतच चालला ! पूर्णान्न खाण्यासाठीं मी फारच उतावळा झालों होतों. म्हणून शेवटीं फार जोर करून आम्हीं तो गोळा ओढला आणि आश्चर्य म्हणजे शेवटीं तो तुटलादेखील ! पण एव्हांना आमच्या दोघांच्यांतलें अंतर वीस-पंचवीस फूट झालें होतें. आम्ही दोघे दोन दिशांना भुईवर आपटलों ! परंतु गोळा तुटल्यावर आमच्यापैकीं प्रत्येकाला दहा-दहा फुटांचे दोन तुकडे मिळाले आणि ते आम्ही दोघांनीं आधाशासारखे तोंडांत घातले. या पदार्थाची चव काय होती हें मला कधींहि सांगतां येणार नाहीं, आणि कुणालाच तें जमायचें नाहीं अशी अद्‌भुत त्याची चव होती. खाणावळी-मध्यें बरींच वर्षें जेवल्यामुळें मला अनेक पदार्थांच्या चवी आणि वास ओळखतां येऊं लागले होतें. खारट पाणी म्हणजे आमटी हें मला समजत असे. आंबट पाणी म्हणजे ताक हेंहि समीकरण मीं मनाशीं बांधलें होतें. अशा निरनिराळ्या चवी ओळखण्यांत वाकबगार असलेल्या मलासुद्धां त्या विलक्षण पदार्थाच्या चवीचा पत्ता लागला नाहीं. तसेंच त्याचा वास काय होता हेंहि मी सांगूं शकत नव्हतों. भाजीला साधारणतः खंवट खोबऱ्याचा मंद वास

असतो, भाताला करपल्याचा धुंद सुवास असतो, हा तर माझा घरचा आणि रोजचा अनुभव होता. पण तरीहि पूर्णान्नाच्या त्या तुकड्याचा वास मला ओळखतां आला नाहीं. असें असलें तरी कांहीं हरकत नव्हती; पण दुःखाची गोष्ट म्हणजे आम्हां दोघांनाहि तो पदार्थ खातां येईना. म्हणजे एकदां त्याचा चावा घेतल्यावर आमचे दांत त्याच्यांत जे रुतून बसले ते निघतां निघेचनात. तोंड उघडतां येणें ही नेहमीं सहजासहजीं करतां येण्याजोगी क्रिया म्हणजे देवाजीनें आपल्याला दिलेली केवढी अद्‌भुत देणगी आहे याची कल्पना मला त्या वेळीं आली. मीं आणखी चावून पाहिलें; पण त्यामुळें दांत आणखीच खोल रुतले आणि तोंड उघडणें जास्तच अशक्य होऊन बसलें.

आम्ही अगतिक होऊन एकमेकांकडे पाहायला लागलों. भूक लागलेली, तोंडांत अन्न पण खातां मात्र येत नाहीं, अशी आमची केविलवाणी परिस्थिति झाली होती. काय करावें समजेना.

तेवढ्यांत रसनानंदांनीं आंत कुणाला तरी हांक मारली, आणि आम्ही दोघे भयंकर घाबरलों.

" अरे ! आंतून एक हातोडी घेऊन या बघूं ! " ते ओरडले. त्याबरोबर आम्हीं दोघांनीं प्रचंड जोर करून तोंडें उघडलीं आणि एकदोन मिनिटें तीं परत मिटतील या भीतीनें ' आ ' तसाच कायम ठेवला. तोंड मिटण्याची छाती होईना. पण तें उघडें ठेवणेंहि जमेना. आणि आधीं जें तोंड कायम मिटल्यामुळें दुखत होतें, तें आतां कायम उघडें राहूं पाहात असल्यामुळें दुखायला लागलें.

आमच्या या भयंकर परिस्थितीकडे संपूर्ण दुर्लक्ष करीत रसनानंद म्हणाले,

" काय, कसं झालं आहे पूर्णान्न ? सर्व जीवनरसांपासून तयार झालेलें हें एक अमृतच आहे बरं का बाळांनो ! ' बरवोदय ' ज्यांना नीट समजलेला नाहीं असें लोक याला ' अंबोण ' म्हणतात. म्हणोत बिचारे त्यांना ' बरवें ' म्हणजे काय हें कळत नाहीं तोंपर्यंत ! पण तुम्हांला आवडलं ना ? "

" हॉ हॉ ! ऑवडलं म्हॉंजे कॉय विचॉरतॉं ! फॉरच छॉन ! " असें मी तोंड न मिटतांच म्हणालों आणि आम्ही तिथून पळत सुटलों.

रसनानंदांच्या तंबूबाहेर आम्हीं पडलों. आणि मग आमचीं उघडीं तोंडें मिटण्याची व्यवस्था केली. म्हणजे तो जो भयंकर पदार्थ आम्ही खाऊं पाहात होतों तो मोठ्या कष्टानें तोंडांतून काढून टाकला.

" पूर्णान्नासारखा उत्कृष्ट पदार्थ आपल्याकडे तयार करणं शक्य असतांना सिमेंटचा एवढा तुटवडा भारताला कां पडतो हें मला कळत नाहीं ! " नीट बोलतां यायला लागल्यावर माझा वाटाड्या मला म्हणाला.

मी आतां या सर्व प्रकाराला पुरा कंटाळलों होतों.

" अहो, माझी आतां खात्री झाली बुवा, हेंच मला पाहिजे असलेलं इस्पितळ म्हणून ! आतां आपण एकदां मामा बरव्यांना भेटूं या आणि इथनं निघूं या. नाहींतर मलाच वेड लागून इथं कायम राहण्याची पाळी येईल." तोंड दुखत असतांहि मी इतकें बोललोंच. मला तिथून ताबडतोब बाहेर पडायची घाई झाली होती.

" छे: छे: ! असं कधीं झालंय् काय ? आचार्यांना पाहिल्याशिवाय तुम्ही जायचं म्हणतां ? अं ऽ हं ! मी तरी तुम्हांला असलं पाप कधींहि करूं देणार नाहीं. " माझा वाटाड्या घाईघाईनें समोरच्या शामियान्याकडे जात म्हणाला. माझाहि नाइलाज झाला आणि मी त्याच्या मागोमाग गेलों.

" अहो, तुम्हांला मामा बरव्यांना भेटायचं आहे ना ? मग आपण त्यांच्याकडेच चाललों आहोंत कीं !—" आंत जातांजातां तो मला म्हणाला.

माझ्याजवळची पिशवी संभाळत मी चालत होतों. मामा बरव्यांना एकंदरींत अशा ठिकाणींसुद्धां कां होईना, पण खूपच मान होता हें लक्षांत येऊन मला फार आनंद झाला.

आम्ही आंत गेलों तेव्हां तिथें एक माणूस नव्हता; अनेक होते. आणि सर्वांचें मिळून सामुदायिक सूत कांतणें चाललें होतें. कुणाच्या हातांत नुसत्या टकळ्या होत्या, कुणी चरखे चालवीत होते. मधल्या व्यासपीठावर बसलेले गृहस्थ चरखा चालवीत होते आणि सूत कांततां कांततां बोलत होते. इतर लोक सूत कांततां कांततां ऐकत होते. सगळीकडे गांभीर्य पसरलें होतें. आणि तिथल्या शांततेचा भंग चरख्यांच्या 'गूंऽगूंऽ' अशा आवाजानेंच काय तो होत होता. एकंदरींत तें चरख्याचें संगीत, ती सूत-कताई, तें भाषण आणि तें श्रवण सगळेंच फार मजेदार होतें.

व्यासपीठावरील गृहस्थ गंभीरपणें म्हणाले,

" सूतकताईशिवाय बरवोदय होणार नाहीं असं मला ठामपणं वाटतं. ज्याला हें मत पटत नसेल, ज्यांचा माझ्या म्हणण्याला विरोध असेल, त्यांनीं हात वर करावा. मला त्यांची विचारसरणी समजावून घ्यायला फार आनंद होईल ! "

" हे आचार्य बरं का ! " मला कोपरानं ढोशीत माझा वाटाड्या म्हणाला.

आचार्य बोलले आणि सूत कांततां कांततां त्यांनीं आपली प्रेमळ दृष्टि जमलेल्या जमावावरून फिरवली. एकाएकीं त्यांच्या दृष्टींतला प्रेमळपणा नाहींसा झाला.

" पांडुरंगरावजींना माझं म्हणणं पटलेलं दिसत नाहीं ! " आचार्यांचा आवाज व्यथित झाला होता.

त्यांनीं असं म्हणतांच समोरच्याच रांगेतला तिसरा चरखा एकाएकीं थांबला आणि पांडुरंगरावजी घाबऱ्याघुबऱ्या उठून उभे राहिले.

" आचार्य, माझा आपल्या म्हणण्याला मुळींच विरोध नाहीं. सूतकताई हा एकच धर्म मी मानतों आणि त्यामुळं विश्वांत बरवोदय होईल अशी माझी श्रद्धा आहे."

" पांडुरंगरावजी, आपण हात वर केला म्हणून आम्हांला वाटलं, कीं आमच्या म्हणण्याला आपला विरोध आहे म्हणून ! "

" आपला कांहींतरी गैरसमज होतोय् आचार्य. धागा नीट ठेवण्यासाठीं मीं हात वर उचलला आणि आपल्याला तसं वाटलं." पांडुरंगरावजींनीं स्पष्टीकरण केलं आणि तें करतां करतां स्मिताची एक रेषा त्यांच्या चेहेऱ्यावर तरळून गेली, असा मला भास झाला.

पण आचार्य मुळींच हंसले नाहींत, ते जन्मल्यापासून कधीं हंसलेच नाहींत आणि त्यांना फक्त रडतांच येतें, असें माझा वाटाड्या मला म्हणाला.

आम्हीं दोघे बाजूला उभे राहून हा विनोद पाहात होतों आणि मला हंसू आंवरत नव्हतें. पण तिथल्या गंभीर वातावरणाचा माझ्यावरहि परिणाम होऊन मी गंभीर झालों.

तेवढ्यांत आचार्यांची दृष्टि आमच्याकडे गेली आणि त्यांचा चरखा थांबला. त्याबरोबर सर्व चरखे थांबले.

वाटाड्या मला म्हणाला,

"अहो! बघतां काय? पुढं व्हा आणि देऊन टाका तें सामान! मामा बरवे म्हणतात ते हेच!"

मी आश्चर्यचकित झालों. या गर्दीत मामा बरवे कुठेंतरी असतील असा माझा समज होता; पण या सर्व संमेलनाचे ते प्रमुख असतील याची मला कल्पनाहि नव्हती.

पण आश्चर्य करायला वेळ नव्हता. मी झटकन् पुढें झालों आणि सामानाची पिशवी आचार्यांच्या पुढें ठेवीत म्हणालों,

"मामा, ही पिशवी बनूताईंनीं दिली आहे. मुद्दाम तुमच्याकरतां घेऊन आलोंय् मी."

"बनूताईंनीं दिली?—कोण बरं बनूताई?...हं हं! बनूताई नाहीं का?... त्या माउलीचं माझ्यावर केवढं प्रेम!" आचार्य म्हणाले आणि त्यांच्या डोळ्यांतून घळघळां अश्रुधारा सुरू झाल्या.

आणि त्या अश्रुधारांतून वहातच आम्ही तिथून बाहेर पडलों. जातांजातां "बनूताईंना गरीब भावाचा प्रणाम" असे आचार्यांचे उद्गार माझ्या कानांवर पडले.

माझें काम झालें होतें आणि मी खुषींत होतों. करमणूकहि भरपूर झाली होती.

"चला! आपण स्टेशनवरच्या हॉटेलांत जाऊं. तिथं जेवूं आणि नंतरच तुम्ही जा." मी माझ्या वाटाड्याला म्हणालों.

पण आम्ही सर्वोदय नगरांतून बाहेर पडलों, तेव्हां आमचा वाटाड्या अस्वस्थ झालेला दिसला. माझ्याबरोबर यायची त्याची इच्छा दिसत नव्हती. मीं त्याला खूप आग्रह केला. त्याच्या संगतींत माझा वेळ फारच चांगला गेला होता आणि त्याच्या विनोदी बोलण्यामुळें माझी करमणूक होऊन माझें कामहि झालें होतें. त्यानें माझ्याबरोबर जेवावें अशी माझी फार इच्छा होती.

तितक्यांत काय असेल तें असो, तो गृहस्थ मागें वळला आणि एकदम पळायलाच लागला. मी थांबलों आणि पाहायला लागलों, तों हा गृहस्थ बाजूच्या गर्दीत घुसायचा प्रयत्न करीत होता.

समोरून दोन-तीन पोलिस येत होते. पण त्यांना भिण्याचें या गृहस्थाला काय कारण ?

मी त्याला हांक मारणार, इतक्यांत त्या पोलिसांतला एक माझ्याजवळ आला.

" काय हो, कोण होते ते तुमच्याबरोबरचे गृहस्थ ? " त्यानें मला दरडावून विचारलें. उरलेले दोघे पोलिस त्याच्यामागें त्या गर्दीत घुसलेच होते.

" माझ्याबरोबरचे गृहस्थ ?—अं ऽ अं ऽ —त्यांचं नांव—नांव माहीत नाहीं मला ! " मी गोंधळलों आणि घाबरलोंहि. माझ्या तोंडून एक अक्षर उमटेना.

" तुम्हांला कसं माहीत असेल म्हणा ! अहो, तो वेडा आहे इथल्या इस्पितळांतला ! सकाळपासून पळून गेला होता. त्याला शोधून शोधून थकलों आम्ही महाराज ! " तो पोलिस म्हणाला.

गर्दीत घुसलेल्या दोघां पोलिसांनीं माझ्या वाटाड्याला एव्हांना धरून आणलें होतें.

" हं, हे घ्या मामा बरवे ! आतां जपा यांना. आणि इस्पितळांत पोंचल्यावर नीट रिपोर्ट करा." त्यांतला इन्स्पेक्टर दिसणारा पोलिस दुसऱ्या दोघांना म्हणाला.

" काय ? हे मामा बरवे ? मग मघाशीं मी ज्यांना भेटलों ते कोण ? " आतां आश्चर्यानें माझ्या तोंडांतून शब्द फुटायची मुष्कील झाली होती.

" होय, मीच मामा बरवे बरं का हो ! जातों मी आतां यांच्याबरोबर परत ! " माझा वाटाड्या हें मला सांगत होता, यावर माझा विश्वासहि बसला नाहीं.

ते दोघे पोलिस मामांना घेऊन जायला लागले.

मी ओरडून त्यांच्यामागें जात म्हणालों,

" अहो ! हा गृहस्थ वेडा नाहीं. फार शहाणा आहे तो ! त्याला इस्पितळांत कशाला नेतां ? मी घरीं नेईन त्यांना त्यांच्या. त्यांची बहीण आमच्या शेजारीं रहाते हो ! "

पण ते पोलिस थांबले नाहींत. मामांना ओढीत ओढीत ते दूरच चालले. त्यांच्यावरच्या अधिकाऱ्याला सांगून कांहीं उपयोग होतो कां पाहावें, म्हणून मी धांवत त्यांच्याजवळ गेलों.

" अहो इन्स्पेक्टरसाहेब, हा माणूस वेडा नाहीं. मी तुम्हांला अगदीं खात्रीपूर्वक सांगतों. सकाळपासून तो माझ्याबरोबर आहे. अगदीं एखाद्या विद्वानासारखा बोलतो हो तो. वेडे लोक खरे त्या तिथं आहेत ते." बरवोदयाच्या मंडपाकडे हात दाखवीत मीं त्याला सांगितलें.

त्यावर तो पोलिस-अधिकारी प्रथम कांहीं बोलला नाहीं. नुसता हंसला. आणि मग माझ्याजवळ वांकून कुजबुजला,

" तें खरं आहे हो ! पण ते लोक आहेत ठार वेडे ! त्यांच्या बाबतींत कांहींच करतां येत नाहीं. आतां हा मामा बरवे म्हणाल तर खूपच कमी वेडा आहे तो. सुधारेल हळूहळू. काय समजलांत ? "

इन्स्पेक्टरसाहेबांच्या बोलण्यामुळें माझें समाधान झालेंहि आणि नाहींहि.

—मी शून्य नजरेनें मामा बरव्यांना ज्या दिशेनें नेलें तिकडे पाहात राहिलों.

आवक क्र. 20026
विभाग का. कथा
क्रमांक 2209
नों. दि. 3-8-69

१०

# गाडगीळ-नियम

महाराष्ट्र मागें कां पडला?—हा प्रश्न अनादिकालापासून सर्व महाराष्ट्रीयांच्यापुढें तोंडाचा चंबू करून उभा आहे. आश्चर्य असें कीं, या प्रश्नाचें खरें उत्तर महाराष्ट्रांत एवढे मोठेमोठे लोक होऊन गेले असूनसुद्धां अजूनहि कुणालाच देतां आलेलें नाहीं. परंतु आनंदाची गोष्ट अशी कीं, या प्रश्नाचें उत्तर आतां सांपडलें आहे. स्वाभाविक विनयामुळें येथें स्वतःचेंच नांव सांगायला संकोच वाटतो. आत्मश्लाघा होईल अशी भीति वाटते. परंतु एका तपाच्या सुदीर्घ अभ्यासाचें आणि सखोल संशोधनाचें हें फल महाराष्ट्र-रसिकांच्या मुखीं घालणें हें आम्हांला आमचें परम कर्तव्य वाटलें, म्हणून हें औद्धत्य आमच्या हातून होत आहे. महाराष्ट्रानें क्षमा करावी. वरील प्रश्नाचें उत्तर ज्या नियमाच्या साहाय्यानें आम्हांला सांपडलें, त्याला आम्हीं ‘ गाडगीळ-नियम ’ असें नांव दिलें आहे. हा आमचा नियम इतका प्रभावी आहे कीं, वरील गहन प्रश्नाशिवाय इतर शेंकडों लहानमोठ्या प्रश्नांचीं उत्तरेंहि ह्या नियमाच्या साहाय्यानें खाडकन् मिळतात. राजकारण-समाजकारणापासून तों थेट नेहमींच्या व्यवहारापर्यंत नित्य आपलीं डोकीं दुखविणारीं प्रमेयें या नियमाच्या साहाय्यानें चुटकीसरशीं निकालांत काढतां येतात. उदाहरणार्थ :

( १ ) पुरुष बाजारांत गेले असतां त्यांना किडके बटाटे आणि कुजके टोमॅटोच कसे मिळतात?

( २ ) प्रत्येक नवऱ्याची बायको त्याच्या मित्राच्या बायकोच्या मानानें दिसायला कमी सुंदर, जास्त भांडखोर, जास्त कटकटी आणि कमी कामसू कां असते?

( ३ ) प्रत्येक बायकोचा नवरा तिच्या मैत्रिणींच्या नवऱ्यांच्या मानानें जास्त आळशी आणि अधिक कामचुकार कसा असतो ?

( ४ ) घरांत जेव्हां दोन भिन्न मतें असतात ( आणि तीं बहुधा असतातच ! ) तेव्हां बायकांचाच कां जय होतो आणि पुरुषांचाच कां पराभव होतो ? उदाहरणार्थ, बायकोला नाटक पाहायचें असतें आणि नवऱ्याला सिनेमा, तेव्हां नाटकच कां पाहिलें जातें ?

( ५ ) आपलें लग्न व्हायचें असतें तेव्हां, आपण स्त्री असलों तर, चांगले पुरुष आपल्याला नाकारून परस्त्रीशींच कां लग्न करतात ? आणि आपण पुरुष असलों तर विवाहेच्छु सुंदर तरुण मुली आपल्याला वगळून परपुरुषांशींच कां लग्न करतात ?

( ६ ) सार्वजनिक ठिकाणीं आपले चांगले जोडे कां नाहींसे होतात, आणि आपले जोडे जेव्हां वाईट असतात तेव्हां कुत्राहि त्यांना कां शिवत नाहीं ? तसेंच अशा ठिकाणीं सगळींच पायतणें वाईट कशीं असतात ?

( ७ ) छत्र्या, रेनकोट्स, धोब्याला दिलेले कपडे, पुस्तकें या बाबतींत वरीलसारखीच परिस्थिति कां निर्माण होते ? इत्यादि इत्यादि.

पण या प्रश्नांचीं उत्तरें देण्याआधीं या नियमाचा थोडा पूर्वेतिहास पाहणें उपयुक्त ठरेल.

सुरुवातीलाच हें प्रांजळपणें कबूल केलें पाहिजे कीं, लेखकाला हा नियम सुचला तेव्हां तो महाराष्ट्राचा विचार करीत नसून, आपण स्वतःच मागें कां पडलों याचा विचार करीत होता. त्याच्या अनेक मित्रांपैकीं कुणी बँकेंत, कुणी सरकारी नोकरींत, कुणी रेल्वेंत, तर कुणी पोस्टांत चिकटलेला होता. पण स्वतः लेखक मात्र शाळामास्तरच कां राहिला, त्याचा एक मित्र ' प्यून ' म्हणून कसा नोकरीला लागला; चढतचढत हेडक्लार्क कसा झाला, आणि रिटायर होतांना त्याला ९७॥ रुपये पेन्शन कसें बसलें ? दुसऱ्या एका मित्रानें रेल्वेंत क्लार्क असूनहि सासूच्या मदतीनें कां होईना, पण शेवटीं ' मातृ ( बायकोची ) च्छाया ' हा बंगला कसा बांधला ? आणि शेवटीं लेखकाला स्वतःला मात्र शाळेच्या कोंडवाड्यांत मुलें हांकीत, जास्त रकमेवर सह्या करून कमी पगार घेण्यांत कसें समाधान मानावें लागलें ?— या सर्व विचारमंथनांतून ' गाडगीळ—नियमा 'चा जन्म झाला.

प्रस्तुत लेखकाच्या बाळपणापासूनच त्याला अर्थशास्त्राची थोडीशी गोडी होती. त्याचे वडील अर्थखात्यांत नोकरीला होते. तेथें एकदां त्यांच्या साहेबांनीं रागानें एक फाईल त्यांच्या डोक्यावर फेकून मारली. फाईल त्यांच्या डोक्याला चाटून गेली. कसेंहि असलें तरी अर्थखात्यांतील फाईल आणि तीहि डोक्याला लागलेली ! तेव्हां-पासून लेखकाच्या वडिलांना आर्थिक आंकड्यांत गोडी वाटूं लागली. त्याच सुमाराला लेखकाचा जन्म झाला. वडिलांनीं कामासाठीं घरीं आणलेल्या फाइल्स बाल-लेखकानें आपल्या सुकोमल हातांनीं खालीं पाडून उलथ्या-पालथ्या कराव्या, वेळप्रसंगीं त्यांतील कागदांवर आपल्या बालबुद्धीप्रमाणें रेघोट्या ओढाव्या, कधींकधीं कागद बालसुलभ लीलेनें ओले करावे, कधीं फाडूनहि टाकावेत. यांतूनच लेखकाला अर्थशास्त्राची ओळख झाली आणि प्रतिपच्चंद्रलेखेप्रमाणें लेखक जसजसा मोठामोठा होत गेला, तसतशी त्याची अर्थशास्त्राविषयींची आवडहि वाढत गेली. एकदां तर लेखकानें एका फायलींत काढलेली आकृति पाहून, वडिलांच्या साहेबांनींहि त्यांची पाठच थोपटली होती. साहेबमजकुरांनीं लिहिलेल्या कांहीं मजकुरापुढें लेखकानें एक भलेंमोठें प्रश्नचिन्ह काढून ठेवलें होतें, आणि त्यामुळेंच साहेबाला आपली चूक कळून आली म्हणे !

सारांश, लेखकाला अर्थशास्त्राचें बाळकडू अगदीं लहानपणापासूनच मिळालेलें आहे. पुढें वडील सेवानिवृत्त झाल्यानंतर ते जेथें राहूं लागले त्याच्या चार घरें पलीकडे एक प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ राहत असत. बाल-लेखकाचें त्यांच्या घरीं नेहमीं जाणें-येणें असे. तें अर्थात् खेळण्याच्या निमित्तानें. पण याहि संबंधाचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. अर्थशास्त्रांतील प्रमेयें बाललेखकाला चुटकीसरशीं समजूं लागलीं, आणि तीं सर्वांना समजावून सांगून त्यानें लोकांना अगदीं चकित करून सोडलें. साहेबांनीं फेकलेली फाईल वडिलांच्या डोक्याला नुसती चाटून न जातां चांगली लागून खोंक पडली असती, किंवा अर्थशास्त्रज्ञ आणि लेखक एकाच घरांत रहात असते, तर आज लेखकानें सबंध अर्थ-शास्त्रीय जग उलथेंपालथें करून टाकलें असतें, असा त्याचा नम्र विश्वास आहे.

एकदां ‘ अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें ’ हा मौलिक ग्रंथ चाळीत असतांना प्रस्तुत लेखकाला खालील सिद्धान्त आढळला :

“ वाईट आणि चांगलीं—दोन्ही प्रकारचीं नाणीं एकदम चलनांत आलीं तर वाईट नाणीं चांगल्यांना चलनांतून बाहेर ढकलतात. ”

अर्थशास्त्राचा शास्त्रार्थ माहीत नसणाऱ्यांसाठीं हा नियम सोपा करून सांगतों. ( अर्थशास्त्रज्ञांनीं या औद्धत्याबद्दल क्षमा करावी. ) हिणकस आणि शुद्ध अशीं दोन प्रकारचीं नाणीं जर एकदम वापरलीं जात असलीं तर शुद्ध नाणीं चलनाबाहेर फेंकलीं जातात. म्हणजे व्हिक्टोरिया राणीचा छाप असलेला ( ज्यांत चांदी जास्त असते ) आणि जॉर्ज-छाप रुपया ( ज्यांत चांदी कमी असते ) असे एकदम वापरांत आले, तर राजा राणीची हकालपट्टी करतो. राणी-छाप रुपया चलन म्हणून वापरण्याऐवजीं तो वितळवून त्याची चांदी विकणें जास्त फायदेशीर होतें. असें झालें म्हणजे फक्त राजा-छाप हिणकस रुपयेच चलनांत राहतात.

हा नियम जेव्हां लेखकानें वाचला तेव्हां प्रत्येक महाराष्ट्रीयाप्रमाणें त्याच्यापुढेंहि ‘ महाराष्ट्र मागें कां पडला ? ’ हा प्रश्न होताच; आणि तो स्वतः तर मागें पडलेल्या महाराष्ट्राच्याहि मागें पडलेला होता. त्यामुळें या प्रश्नानें लेखकाच्या डोक्यांत घर केलें होतें. वरील नियमाचा महाराष्ट्राशीं कांहींतरी संबंध आहे असें त्याला अंतःस्फूर्तीनें वाटलें आणि मग त्यानें हा नियम एकदां, दोनदां, अनेकदां वाचला. शेवटीं एकदां तो ‘ मूल-तत्त्वां ’चें पुस्तक उशाला घेऊन झोंपला असतांना त्याच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडला ! आणि त्या प्रकाशांत ‘ महाराष्ट्र आणि आपण मागें कां पडलों ? ’ या प्रश्नाचें उत्तर त्याला झगझगीत दिसूं लागलें !

न्यूटनसाहेबानें सफरचंद पडतांना पाहिलें. इतर अनेकांनींहि सफरचंदें पडतांना पाहिलीं असतील. ( महाराष्ट्रांत असा देखावा क्वचित् दिसतो. गळून पडेपर्यंत सफरचंद झाडावर ठेवणारा बागवान इकडे विरळा ! ) परंतु गुरुत्वाकर्षणाचा नियम इतर लोकांना सुचला नाहीं. आमच्या समोरच्या एवढयामोठ्या भीमाक्कांना आम्हीं चांगलें पहिल्या मजल्यावरून पडतांना पाहिलें, तरीसुद्धां हा नियम आम्हांला सुचला नाहीं. भीमाक्का पडल्या तिथें एक खड्डासुद्धां पडला; पण त्याचा आमच्यावर कांहींएक परिणाम झाला

नाहीं. पण एरवीं कामचुकार असलेल्या आमच्या डोक्यानें अर्थशास्त्रांतला हा नियम वाचतांना बरोबर काम दिलें. इतर कोणालाहि हा नियम वाचल्यानंतर जी कल्पना आली नव्हती ती आम्हांला एकदम आली, आणि तीवरूनच आम्हांला ' गाडगीळ-नियम ' सुचला. ( थोर संशोधक न्यूटन यांचें उदाहरण याबरोबर देण्याचें कारण ?—पण चाणाक्ष वाचकांनीं तें केव्हांच ओळखलें असेल ! )

हा नियम असा कीं, नाण्यांच्या बाबतींत जें खरें आहे तें चांगल्या-वाईट माणसाच्या बाबतींतहि खरें आहे. व्यवहारांत आपण नेहमीं पाहतों तेव्हां इतरांचा जय, आपला मात्र पराभव; बायकोला यश आणि आपल्याला मात्र अपयश; साहेबाला बढती आणि आपल्याला मात्र कानपिचक्या; इंग्लंडच्या क्रिकेट-संघाचा जय आणि आपल्या संघाची मात्र धूळधाण. अशीं दृश्यें पाहिलीं म्हणजे साहजिकच आपल्याला दुःख होतें. पण एकदां ' गाडगीळ-नियम ' आपल्याला माहीत झाला तर हें दुःख होणार नाहीं. उलट असें होत आहे याबद्दल आपल्याला धन्यच वाटेल ! कारण चांगल्यांना गचांडी आणि वाईटांना पुष्पहार असा ' गाडगीळ–नियम 'च आहे. मग त्याबद्दल तक्रार करण्यांत किंवा दुःख करण्यांत काय अर्थ आहे ? ' ज्याचे अंगीं मोटेपण, तया यातना कठिण ' असें कांहींतरी तुकोबांनीं म्हटलेंच आहे. एकदां नवरा किंवा कुणाच्या हाताखालचा कारकून होण्याचें मोठेपण आपण स्वीकारलें, म्हणजे बायको आणि साहेब यांच्या यातना आल्याच !

सफरचंद झाडावरून सुटलें कीं तें जमिनीवर पडणारच. त्याबद्दल दुःख करण्यांत काय अर्थ आहे ? हें टाळायचें असेल तर ( १ ) सफरचंद पडण्याच्या आधींच मालकानें तें काढून घेतलें पाहिजे, आणि ( २ ) जो मालक नाहीं त्यानें सफरचंद हवें असल्यास नेमकें तें पडण्याच्या वेळीं झाडाखालीं हजर असलें पाहिजे. म्हणजे तें इतरांना न मिळतां त्यालाच मिळेल आणि त्याच्या पदरीं निराशा येणार नाहीं. ' गाडगीळ-नियमा '-पासून तर आपल्याला यापेक्षांसुद्धां महत्त्वाचे निष्कर्ष काढतां येतात. पण त्यापूर्वीं प्रत्यक्ष व्यवहारांत हा नियम किती व्यवस्थितपणें आणि जवळ-जवळ निरपवाद आपलें कार्य बजावीत असतो हें येथें दाखवायचें आहे.

आपल्या राजकारणासारख्या क्षेत्रांत आपण लक्ष टाकलें तर काय दिसतें ? आतां विषयाचें स्वरूप पाहतां राजकारणाचें उदाहरण येथें घेणें बरोबर नाहीं हें आम्हांलाहि पटतें. कारण हा लेख एका अत्यंत क्रांतिकारक शास्त्रीय नियमाविषयीं असल्यामुळें त्यांत आपल्या राजकारणासारखा विनोदी विषय येऊं नये; आणि तें राजकारणसुद्धां भारतीय लोकशाहीबद्दल. हें वाचून वाचक म्हणतील, ' तोबा तोबा ! अरे, तुम्ही काय गंभीर विषयावर लेख लिहितां आहांत का चेष्टा लावलीय् ? ' असें असूनहि सर्वांना समजणें सोपें जावें म्हणूनच मुद्दाम भारतीय लोकशाही हाच विनोदी विषय आम्हीं निवडला आहे. तरीहि विनोद ( शक्य तेवढा ) टाळून चर्चेची पातळी जास्तींत जास्त गंभीर ठेवायचा आम्ही प्रयत्न करणार आहोंत.

भारतांत लोकशाही आहे. ( या पहिल्याच विधानावर ' विनोदी ' असा आक्षेप येण्याचा संभव आहे. परंतु विनोद शक्य तेवढाच टाळायचें आश्वासन आम्हीं दिलेलें आहे हें वाचकांनीं उदार मनानें लक्षांत ठेवावें. गंभीर लेखनावरहि कांहीं अपरिहार्य अशा मर्यादा असतात. ) लोकशाहीमध्यें अडाणी, स्वार्थी, संधिसाधु, सत्तालोलुप असेच लोक निवडून येतात, असा लोकशाहीवर कांहीं लोक आरोप करतात. असें होणें हें अन्यायाचें आहे का ?— नाहीं. आपल्या नियमाप्रमाणें पाहतां असें होणेंच इष्ट आहे. ज्ञानी, विचारवंत, निःस्वार्थी, समतोल वृत्तीचे, सेवावृत्ति धारण केलेले असे जे अल्पसंख्य उमेदवार असतात ते चांगले असल्यामुळें आपल्या नियमाप्रमाणें त्यांनीं निवडणुकींत पडणें हेंच आवश्यक आहे. तसेंच चांगले लोक निवडून आले तरी ते फार काळ ' चलनांत ' राहत नाहींत. आपलें कांहींच शहाणपण चालणार नाहीं, आपण अल्पसंख्य आहोंत याची खात्री असतांहि या लोकांनीं निवडणुकीला उभें रहायचा आणि निवडून यायचा मूर्खपणा केलेला असतो, त्याबद्दल त्यांना योग्य शिक्षा मिळावयास नको का ? कर्मधर्मसंयोगानें त्यांना ती लौकरच मिळते आणि ते निष्क्रिय बनतात, किंवा कंटाळून राजकारणांतून निवृत्त होतात. खरें म्हणजे लोकशाही कारभार चालूनसुद्धां अशा चांगल्या लोकांना निवडणुकीचीं तिकिटें मिळतात हीच अत्यंत खेदाची गोष्ट आहे !

लोकशाही म्हणजे बहुमतवाल्या लोकांचा कारभार. बहुमत हें नेहमीं मूर्खांचेंच बनलेलें असतें. म्हणून लोकशाही म्हणजे 'मूर्खांचें शहाण्यांसाठीं राज्य' असें कित्येक विचारवंत वैतागानें लिहितांना आढळतात. परंतु आपल्या नियमाचा अभ्यास केला असता तर या विचारवंतांनीं असे अविवेकी, आततायी आणि असभ्य उद्‌गार काढले नसते, यांत कांहींच संशय नाहीं.

'महाराष्ट्र मागें कां पडला' हें आतां सहज लक्षांत येण्यासारखें आहे. महाराष्ट्राला नसत्या उचापतीच फार ! या महाराष्ट्राला स्वराज्यसंस्थापनेचे लांडे कारभार करायला हवेत, स्वातंत्र्याच्या चळवळींत पुढेंपुढें करायला हवें, धाडसी घोषणा करायला हव्यात, क्रांतिकारक राजकारण म्हणाल तर तेथेंहि ठोऽठोऽ पिस्तुलें वाजवीत महाराष्ट्राचे क्रांतिकारक हजर ! रूढीच्या मोहोळावर दगड मारून गांधिलमाशा उठवायची महाराष्ट्राच्या समाजसुधारकांना नसती हौस ! शिवाय स्पष्टवक्तेपणा फार. ताड्फाड् बोलून आपला सवतासुभा मांडायला तयार. सत्य बोलणें हा इतरांचा क्वचित् धर्म असला तरी महाराष्ट्राचा मात्र धंदा आहे ! राजकारणांत काय खरें बोलून चालतें ? पण महाराष्ट्राचें नाणेंच फार खणखणीत पडलें ना ! जसा कलदार राणी-छाप रुपया ! कुणींहि बेशक वाजवून घ्यावा—पन्नासदां ! अशा उपद्‌व्यापी महाराष्ट्राचें चालावें तरी कसें ? साहजिकच त्याला सगळ्यांनीं थपडा मारून खालीं बसविलें, त्याची अगदीं 'हुर्यो' केली. पण या बेस्याचें सुंभ जळलें तरी परवांपर्यंत हे लोक 'महाराष्ट्रासकट महाराष्ट्र पाहिजे' अशा हटवादी प्रामाणिक घोषणा करीत होते. आणखी खेदाची गोष्ट म्हणजे या व्रात्य महाराष्ट्राबरोबर सालस, गोड स्वभावाच्या गुजरातचेंहि नाक कापलें गेलें. मातीच्या नाजुक भांड्यानें पितळेच्या तपेल्याबरोबर प्रवास करूं नये असें चतुर इसापानें सांगितलें आहे तें उगीच्च नाहीं. सारांश, कणखरपणा, स्पष्टवक्तेपणा, सत्याग्रह, चिकाटी या आपल्या असामान्य अवगुणांमुळें महाराष्ट्र मागें पडला. असला जाहीर मूर्खपणा करणें त्यानें प्रयत्नपूर्वक, ताबडतोब सोडून दिलें पाहिजे, म्हणजे तो हां हां म्हणतां पुढें येईल.

आतां आमच्याच नियमाप्रमाणें आम्हीं स्वतः मागें कां पडलों हें

सांगतों. मी सेकंड क्लासांत पास होऊन नोकरीला लागलों. नोकरी मोठ्या मिनतवारीनें मिळालेली होती. त्यामुळें मी अत्यंत मन लावून इमानेंइतबारें काम करूं लागलों. पहिल्यांदां माझ्या थोड्या चुका होत; पण पुढें अनुभवानें मला त्या टाळतां येऊं लागल्या. मी चांगलें काम करीत असें एवढेंच नव्हे, तर जास्त वेळहि काम करीत असें. ऑफिस सुटल्यावर सगळे लोक घरोघर गेले तरी मी ऑफिसांतच बसत असें. पुन्हा उरलेलें काम मी घरीं नेतच असें. अशा रीतीनें मीं कामाचे भारेच्या भारे उपसले. कामाच्या फायलींचे ढिगारेच्या ढिगारे पार खलास केले. बरें, मी प्रामाणिक एवढा कीं, कुणी त्याचें काम केल्याबद्दल मला पैसे देऊं लागला तर मी ते साफ नाकारीत असें. 'नोकरीच्या पगाराबद्दल मिळणारे पैसे मला पुरले पाहिजेत; त्यांवरच माझा हक्क आहे,' असें बाणेदार उत्तर देऊन मीं कित्येक लोकांना परत पाठविलें. तसाच मी स्पष्टवक्ताहि फार. हेड-क्लार्कच्या चुका मीं जशाच्या तशा त्याच्या पदरांत घातल्या, आणि तो जेव्हां माझ्यावर डाफरला, तेव्हां मोठ्या साहेबाकडे जाण्याची त्याला धमकी दिली. त्यावर हेडक्लार्क मला अपमानकारक असें खूप बोलला; पण मीं त्याला कांहींच दुरुत्तरें केलीं नाहींत. बिलकुल रजा न घेतां सुट्ट्यांच्या दिवशीं-सुद्धां ऑफिसांत जाऊन मी आपलीं कामें करीत राहिलों.

—आणि या सर्व सद्‌गुणांचा परिणाम व्हायचा तोच झाला ! एके दिवशीं माझी नोकरी गेली !

त्याचें असें झालें—

त्या दिवशीं मला आमच्या मोठ्या साहेबानें बोलावलें. मी अगदीं छाती पुढें काढून अभिमानानें साहेबाच्या खोलींत गेलों आणि ऐटींत सलाम ठोकून त्याच्यासमोर उभा राहिलों. परंतु दुसऱ्याच क्षणाला माझी ही ऐट कुठल्या कुठें बेपत्ता झाली. कारण, साहेबमजकुरांनीं माझी न भूतो न भविष्यति अशी....

पण तसें नकोच ! काय झालें तेंच सांगतों. मी गेल्याबरोबर साहेबानें मला विचारलें, "गाडगीळ, तुम्ही नोकरीला कधीं लागलांत ?"

"चार महिने झाले साहेब." मी उत्तरलों.

" कामाची सर्व माहिती झाली ? " साहेबानें विचारलें.

" होय साहेब. खडान् खडा माहिती झालीय्." मीं म्हटलें.

हें ऐकून साहेब खुर्चीत सांवरून बसला. आणि मींहि मोठ्या अभिमानानें माझ्या प्रगतीचा इतिहास साहेबाला ऐकवला.

" तुम्ही ऑफिसला कधीं येतां ? " साहेबानें पुढें विचारलें.

" बरोबर साडेनवाच्या ठोक्याला येतों साहेब." ऑफिसची वेळ साडे-दहाची होती. माझें उत्तर ऐकून साहेबाचा एक ओठ दुमडला.

" आणि जातां कधीं ? " त्यानें विचारलें.

" कधीं साडेसहा कधीं सात-आठसुद्धां. एकदां संकष्टीच्या दिवशीं तर चंद्रोदय होईपर्यंत मी ऑफिसमध्यें थांबलों होतों." मी उत्तरलों.

आमची ऑफिस सुटायची वेळ साडेपांचची होती. माझें उत्तर ऐकून साहेबाचा दुसरा ओठ दुमडला. त्याचें आश्चर्य दुणावत होतें.

" म्हणजे तुम्ही लौकर येतां ? उशीरां जातां ? जास्त वेळ काम करतां ? " साहेबानें विचारलें.

" होय साहेब." मी अत्यंत अभिमानानें उत्तरलों.

" आजपर्यंत रजा किती घेतलीत तुम्हीं ? "—साहेबांचा प्रश्न.

" एकहि दिवस नाहीं साहेब ! "—माझें उत्तर.

" कधीं आजार, लग्नसमारंभ—कशाकरतांहि नाहीं ? "—साहेबाचा प्रश्न.

" नाहीं साहेब. मी मेलों असतों तरी ऑफिसला नित्याप्रमाणें येतच राहिलों असतों." मी छाती फुगवून म्हणालों.

—आणि काय झालें कुणास ठाऊक ! आमचा साहेब एकदम भडकला. एखादा मोठा डांबरी फटाका उडावा तसा तो जागचा उडाला. खुर्चीच्या हातांना धरून तो जेमतेम उभा राहिला. थरथरां कांपत रागानें लाल लाल होऊन तो ओरडला,

" तोबा तोबा ! इन्शाल्ला ! याचा तुला जाब द्यावा लागेल ! काय म्हणून तूं एवढं काम केलंस ? इथं कामं लौकर संपवून काय लढाया

मारायला जायचंय् ? ऑं ?—कामं करण्यापेक्षां चहा कां प्यायला नाहींस ? गप्पा कां मारल्या नाहींस ? गोष्टींचीं पुस्तकं कां वाचलीं नाहींस ?—आणि कांहींच नव्हतं, तर झोंपायला काय झालं होतं ? निदान हजामती तरी करायच्या होत्यास !—पण एवढं काम करायला कुणीं सांगितलं होतं तुला ? " येथें साहेब थोडा वेळ थांबला. बोलतां बोलतां त्याला धाप लागली होती. घामानें त्याचा चेहरा डंवरला होता.

" तुला सांगून ठेवतों—खबरदार यापुढं एवढं काम करशील तर ! आणि हल्लीं कामांत एकहि चूक नाहीं तुझ्या ? शरमेची गोष्ट आहे ! तूं एकटा चारचार लोकांचीं कामं करायला लागलास तर उरलेल्या तिघांनीं काय उपाशीं मरायचं ? आणि हें काम संपल्यावर तुला दुसरं कोणतं काम देऊं मी ?—याचा तरी साधा विचार करायचा होतास ! हें कुठलं ऑफिस आहे, माहीत आहे तुला ? "

" मिलिटरी-खातं आहे साहेब ! " मी चांचरत उत्तरलों. साहेबाच्या भडिमारानं मी अगदीं घाबरून गेलों होतों. हजारों काजवे माझ्या डोळ्यांपुढें चमूचम् करीत होते.

" एवढं माहीत असून अक्कल नाहीं ? इथं काम करायला लाजा नाहीं वाटत ? लोकांना भिकेला लावायचंय् ? लढाईचा पत्ता नाहीं, आणि म्हणे काम करतोंय् !—मोस्ट इनूएफिशंट !—फूलिश !—बेवकूफ !...." साहेब कडाडला.

" साहेब, माझी चूक झाली. परत मी फार काम करणार नाहीं साहेब..." मी कशींबशीं दोन वाक्यें बोललों.

" काय ! फार काम करणार नाहीं ? म्हणजे काम करणारच ना ? काय हा उद्धटपणा !...टेरिबल इनूसबॉर्डिनेशन ! याबद्दल तुला कोर्टमार्शल करायला पाहिजे. आणि तुला इतकं प्रामाणिक असायला काय झालं ? कॉंट्रॅक्टरनं दिलेले पैसे तूं नाकारलेस ? "

" होय साहेब. हें आपल्यापुढं सांगायची मला शरम वाटते साहेब." मी खालच्या मानेनें उद्गारलों.

" आणि वर निर्लज्जासारखा स्पष्टवक्तेपणा आणि निर्भीडपणासुद्धां ! हेडक्लार्कच्या चुका तूं त्याला समजावून सांगितल्यास ? तोबा ! अरे हेडक्लार्क कधीं चुकूं शकतो का ? छेः छेः ! तुझ्यासारखा कामसू, प्रामाणिक, स्पष्ट-वक्ता आणि लायक माणूस या जागेला नालायक आहे ! चपरासी ऽ ! " साहेब ओरडले आणि आमच्या ऑफिसमधून बाहेर जाणारा जो रस्ता होता तेथील ' बाहेर ' या पाटीपर्यंत निरोप द्यायला चपरासी माझ्या-बरोबर आला.

—अशा रीतीनें माझी नोकरी गेली. आणि तेव्हांपासून मी शाळामास्तर आहें. अर्थात् येथेंहि माझे वरील दुर्गुण अजून कमी झालेले नाहींत. पण आमचे दयाळू हेडमास्तर आणि कृपाळू चालक आपलें कसेंतरी चालवून घेतात, इतकेंच. कधींकधीं मात्र मला मुलें शिस्तींत कां वागलीं, त्यांचा निकाल चांगला कां लागला, वर्गांत मुलें नियमित कां येतात, या प्रश्नांचा जाब द्यावा लागतो, आणि त्याबद्दल वरिष्ठांची तंबी मिळते. एवढें सोडलें तर, आणि सही करतों त्यापेक्षां कमी पगार मला मिळतो हें, आणि सुट्टीचा पगार मिळत नाहीं, एवढें सोडलें तर बाकी ठीक चाललें आहे. माझ्याकडून असलेल्या सर्व अपेक्षा मी पुऱ्या करीन असा कांहीं मला आत्मविश्वास नाहीं. पण मी जास्तींत जास्त बथ्थड, निगरगट्ट, चुकार, लोभी बनायचा मनःपूर्वक प्रयत्न करतों आहें. परवांच हेडमास्तर मला म्हणाले, " आहे, आहे ! तुमच्यांत प्रगति आहे ! "

—अशा रीतीनें आम्ही मागें पडलों.

सुरुवातीला सांगितल्याप्रमाणें ' गाडगीळ–नियम ' हा अतिशय व्यापक नियम आहे. तो समाजकारणांत, धर्मकारणांत, शिक्षणसंस्थांत, जीवनांत, कुठेंहि—जिथें जिथें माणसें आहेत तिथें तिथें चालूं शकतो. तो सगळीकडे सारखाच परिणामकारकपणें कसा चालतो हें दाखविण्यासाठीं स्वतंत्र ग्रंथरचनाच करावी लागेल. पुढेंमागें आमचा एखादा सत्शिष्य ही मह-नीय कामगिरी बजावीलहि; पण तोंपर्यंत या नियमावरून व्यवहारासाठीं जीं दिग्दर्शक तत्त्वें मिळतात, तीं येथें थोडक्यांत सांगतों.

आयुष्यांत यशस्वी व्हायचें असेल तर प्रामाणिक लोकांनीं लुच्चे बनलें

पाहिजे. तसेंच कामसू लोकांनीं कामचुकार, खऱ्यांनीं खोटे, शिस्तशीर लोकांनीं बेशिस्त, बेडर लोकांनीं भित्रें आणि शहाण्यांनीं मूर्ख बनणें आवश्यक आहे. सुरुवातीला ही गोष्ट निश्चित अवघड जाईल; पण ती निश्चित कष्टसाध्य आहे. शहाण्यानें मूर्ख होणें हें सुरुवातीला अवघड वाटलें तरी पुढें पुढें तें फार सोपें जातें, असा तर आमचा वैय्यक्तिकच अनुभव आहे.

तेव्हां लक्षांत ठेवा, कसेंहि असलें तरी तुमचें नाणें बद्दू असलें पाहिजे. तें खणखणीत असेल, राणी-छाप असेल, तर ताबडतोब तुमची चलनांतून उचलबांगडी झाल्याशिवाय राहणार नाहीं !

◎ ◎ ◎

११

# सिंदबादची आठवी सफर

महाराज, 'हरुन अल्‌रशीद' म्हणून ज्या कालिफाच्या गोष्टी मी आपणांस ऐकवीत असतों त्या कालिफाचा पणतू जेव्हा बगदाद शहरांत राज्य करीत होता, त्याच सुमाराला हिंदुस्थान देशांत 'चांद–इ–हिंद' या नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याच्या राज्यांतील एक गोष्ट आज मी आपणांस ऐकविणार आहें. इकडे मेहेरबानी करून महाराजांनीं अंमळ लक्ष द्यावें. या गोष्टीचा वृत्तान्त हा आजपर्यंतच्या सर्व गोष्टींपेक्षां फारच सुरस व चमत्कारिक आहे.

हिंदुस्थानांत मुंबई नामक एक बंदर होतें. या शहरांतली ऐन उन्हाळ्यांतली गोष्ट. 'विक्तुरिया तर्मिनस' म्हणून जें एक ठिकाण मुंबईत होतें तेथून आगगाडीचे खूप फांटे फुटत.. तेथें भूपर्यटन करणाऱ्यांची एकच गर्दी उडे. तशीच गर्दी त्या दिवशींहि उसळली होती. त्या दिवशीं त्या गर्दीतून हिंदबाद नांवाचा एक लेखनिक घामाघूम होऊन बाहेर आला. या माणसाची अवस्था त्या वेळीं फार विचित्र झाली होती. त्याचे केस पार अस्ताव्यस्त झाले होते. डोईच्या पागोट्याचा अजिबात पत्ताच नव्हता, त्याचा अंगरखा धक्काबुक्कींत चुरगळला होता, मळला होता आणि ठिकठिकाणीं फाटला होता. तिकिट-हपिसांतून नुकतेंच खरीदलेलें तिकीट त्यानें एका हातांत घट्ट धरिलें होतें आणि त्याच्या दुसऱ्या हातांत उरलेले रुपये आणि कांहीं मोहोरा दिसत होत्या. द्रव्याच्या बटव्यापेक्षां हातांतील तिकीटच त्याला उघडउघड अधिक मोलाचें वाटत होतें. या माणसाचा जोडाहि गर्दींत कोठेंतरी सांडला होता. गर्दींतून बाहेर पडून हिंदबाद रस्त्यावर आला, आणि रस्त्याच्या एका कडेला अंमळ विसांवा घेण्यासाठीं बसला.

तो ज्या हवेलीच्या जोत्यावर बसला होता ती मोठी टोलेजंग होती आणि तेथें नानाप्रकारच्या सुगंधी पदार्थांचा वास सुटला होता; तो अनुभवून त्यास मोठा आनंद झाला. तसेंच हवेलींत गाणें-बजावणें चाललें होतें. सारंग्या, पखवाज व सतारी यांचा व गाणारणी स्त्रियांचा मधुर शब्द ऐकून त्याचें मन शांत झालें. तसेंच मैना, रावे, चंडोल वगैरे पक्षी तेथें मंजुळ स्वर काढीत होते, तेहि त्यानें ऐकले. त्याचप्रमाणें तेथें नाना प्रकारच्या पक्वान्नांचा सुवास येत होता, त्यावरून त्यास वाटलें कीं वाड्यांत कांहीं मोठा उत्सव व मेजवानी असावी.

मेजवानीचा हा थाट चालू असतांच मालसामानाचे मोठमोठे हारे अनेक चाकर विक्तुरिया टर्मिनसच्या दिशेनें घेऊन चालले होते. त्यांत एक मोठा बिछाना व अनेक ऐषआरामाचीं साधनें पण होतीं. हिंदबाद लेखनिक या रस्त्यानें फार वेळ गेला नव्हता; त्यामुळें वाड्यांत कोण राहतो हें त्यास माहीत नव्हतें. मग तें कळावें म्हणून दरवाजापाशीं जाऊन देवडी-वर चाकर होते त्यांपैकीं एकास त्यानें विचारिलें कीं, "या वाड्याच्या धन्याचें नांव काय ?" त्यानें उत्तर केलें, "काय ? तूं या मुंबई नगरांत रहातोस आणि तुला या वाड्याचा धनी सिंदबाद दर्यावर्दी ह्याचें नांव माहीत नाहीं ? मोठा चमत्कार आहे ! अरे, हा केवढा विख्यात पुरुष, ज्यानें पृथ्वीच्या कितीएक प्रदक्षिणा केल्या, तो तुला ठाऊक नाहीं ? अरे! ज्याचा अनुभव एवढा मोठा कीं, ज्याला चांद–इ–हिंद या हिंदुस्थानच्या बादशहानें रेलगाडी-खात्याचा खास सल्लागार नेमलें, त्याचें नांव त्वां ऐकलें नाहींस ? छीःछीः ! अशी गोष्ट होणें नाहीं ! अरे अडाण्या, सिंदबाद आज विद्येचें माहेरघर जें पुणें तिकडे जाण्यास निघाला आहे. त्याकरितांच ही सर्व गडबड बरें."

हिंदबाद लेखनिकानें सिंदबाद ह्याची संपत्ति व वैभव यांविषयीं ऐकलें होतें. कारण तो स्वतःच रेलगाडी हपिसांत चाकरीस होता. सिंदबाद पराकाष्ठेचा सुखी आहे असें त्यास वाटत होतें. मग त्याची अलौकिक श्रीमंती व आपलें अत्यंत दारिद्र्य हें मनांत येऊन हिंदबादास फार वाईट वाटलें आणि त्याचें मन फार खिन्न होऊन, आकाशाकडे डोळे करून दुःखाच्या आवेशांत आपले शब्द कोणी ऐकेल याचा विचार न करतां

तो मोठ्यानें म्हणाला, " हे परमेश्वरा, सिंदबाद व मी ह्यांमध्यें केवढें हें अंतर ! पाहा, मी दररोज किती श्रम करतों व किती दुःखें सोशितों. रेल्वे-हपिसांत इमानेंइतबारें दिवसभर राबतों; बायकोच्यीं सदासर्वकाळ बोलणीं खातों, तरी मला जेमतेम पोटभर जेवायला मिळण्याची मारामार. रेलगाडीचें हें तिकीट काढतांना माझा अर्धा जीव गेला आणि पुण्याच्या वाटेंत गर्दीनें उरलेला जाईल. माझी ही स्थिति, तर हा सिंदबाद हवा तसा पैसा उडवितो तरी सर्व काळ सुखांत व मौजेंत घालवीत आहे. ईश्वरा, असें ह्यानें कोणतें पुण्य केलें कीं, त्वां यास असें अखंड व अपार सुख द्यावेंस ? हा उंची गादीगिरदीवरून ऐषआरामांत प्रवास करतो व मीं तुझ्या घरीं कोणता अन्याय केला कीं रात्रंदिवस हाल काढायला त्वां मला लावावेंस ? नुसतें तिकीट काढतांनाच्च माझी हड्डी नरम झाली. आतां पुण्याला जाईपर्यंत देवा, माझा नक्कीच खिमा होणार." असें गाऱ्हाणें लावून त्यानें त्रासून व निराश होऊन जमिनीवर पाय आदळला.

ह्याप्रमाणें तो लेखनिक आपलें दुःख गात आहे, इतक्यांत वाड्यांतून एक चाकर येऊन त्याचा हात धरून त्यास म्हणाला, " चल मजबरोबर. तुला आमचा धनी सिंदबाद बोलावीत आहे. कारण त्याचे मनांत तुजपाशीं कांहीं बोलावयाचें आहे." इतका आदराचा निरोप ऐकून हिंदबाद लेखनिकास मोठाच अचंबा वाटला. कारण त्याच्या तोंडावाटे नुकतेच जे शब्द निघाले होते त्यांचा विचार केला असतां त्यास असें भय वाटलें कीं, सिंदबाद मला नेऊन शिक्षा करील. त्याची इतराजी झाली तर एवढ्या मोठ्या मिनतवारीनें आपल्याला लागलेली कायम चाकरी जाईल. आणि ह्या संशयानें " मजजवळचें सामान रस्त्यावर टाकून मला येतां येत नाहीं. पुण्यास तें मला माझ्या सासूकडे पोंचवावयाचें आहे," अशी सबब तो सांगूं लागला. परंतु सिंदबाद याच्या चाकरांनीं " सामानाविषयीं कांहीं काळजी करूं नको; तें आम्ही संभाळूं. तुझ्या हातांत रेलगाडीचें तिकीट दिसतें आहे तेंसुद्धां आम्ही संभाळूं. तूं वाड्यांत चल " असें सांगितलें. यावर हिंदबाद परोपरीनें उत्तरला, " बाबा रे, सामान एक वेळ हरवलें तरी बेहत्तर; पण हें तिकीट मात्र मी कोणावरहि सोंपवावयास तयार नाहीं. कां कीं, सामान परत मिळेल, तिकीट परत मिळणार नाहीं." शेवटीं त्यास फार आग्रह केल्यावरून तो

निरुपाय होऊन वाड्यांत गेला. मात्र तिकीट त्यानें आपल्या छातीशीं घट्ट धरून ठेविलें होतें.

नंतर चाकरांनीं त्यास एका मोठ्या दिवाणखान्यांत नेलें. तेथें पुष्कळ लोक जेवावयास बसले होते व त्यांजपुढें अनेक प्रकारचीं पक्वान्नें भरून ताटें ठेविलीं होतीं. दिवाणखान्यांत वरच्या बाजूस एक गृहस्थ बसला होता. त्याचा चेहेरा गंभीर, सुरेख व तेजस्वी दिसत होता. त्यास मोठी दाढी होती व ती सर्व पिकून पांढरी झाली होती. त्याच्या पाठीमागें व बाजूस कितीएक चाकर होते. हा गृहस्थ हिंद सरकारचा सल्लागार सिंदबाद दर्यावर्दी होय. त्या ठिकाणचें ऐश्वर्य व पुष्कळ मंडळी पाहून हिंदबाद लेखनिक फार भ्याला. मग मोठ्या अदबीनें व कांपतकांपत त्यानें सर्वांस सलाम केला. गर्दींत त्याला हपिसांतली वरची अधिकारी मंडळीहि अदबीनें बसलेली दिसली. तें पाहून सिंदबाद यानें त्यास जवळ बोलाविलें व आपल्या शेजारीं उजव्या हाताकडे बसवून, आपल्या हातानें त्यास एक ताट दिलें व भोजन करावयास सांगितलें.

स्वस्थपणें जेवण झाल्यावर मग सिंदबाद ह्यानें हिंदबाद याच्याशीं बोलावयास आरंभ केला. अरब लोकांच्या चालीप्रमाणें ' भाई ' असें मोठ्या सलगीचें संबोधन करून तो म्हणाला, " तुमचें नांव काय? व तुम्ही धंदा कोणता करतां?" हिंदबादनें उत्तर केलें, " महाराज, मला हिंदबाद म्हणतात. मी येथें आपल्याच रेल-हपिसांत चाकर असतों."

सिंदबाद म्हणाला, " बरें, तुमची ओळख झाली हा मला मोठा लाभ झाला; व मजसारखेंच येथील सर्व मंडळीस वाटत असेल ह्यांत संशय नाहीं. असो, पण नुकतेच तुम्ही रस्त्यांत जे शब्द बोललां ते तुमच्या तोंडानें ऐकावे अशी माझी फार इच्छा आहे." ( पूर्वीं तेथें जेव्हां हिंदबाद बोलला होता, त्या वेळेस सिंदबाद खिडकीशीं उभा होता. त्यानें तें सारें बोलणें ऐकिलें होतें; आणि नंतर त्यास बोलवावयास पाठवून तो स्वतः दिवाणखान्यांत जेवावयास जाऊन बसला होता. )

हा प्रश्न ऐकून हिंदबादास मोठा विस्मय झाला. मग तो लाजेनें मान खालीं घालून उत्तर करतो, " महाराज, ऊन लागल्यामुळें व तिकीट

काढतांना झालेल्या धक्काबुक्कीमुळें त्रासल्यानें माझ्या तोंडावाटे जे अविचाराचे शब्द निघाले त्याबद्दल आपण मला माफ करावें."

सिंदबाद म्हणाला, "छीः छीः! मी त्याबद्दल तुम्हांवर रागावलों नाहीं. असल्या कारणानें रागावणें हा अन्याय आहे. तुमची दशा पाहून मला फार वाईट वाटतें व तुम्ही बोललां त्याबद्दल मी तुम्हांस काडीभर नांव ठेवीत नाहीं. तुमच्या बोलण्यांत मजविषयीं जो मजकूर आला, तो मात्र बरोबर नाहीं. तुम्हांस खचित असें वाटत असेल कीं, हल्लीं मी जीं सुखें व संपत्ति भोगितों आहें ती मला कष्ट केल्यावांचून प्राप्त झालीं. चांद-इ-हिंद यांनीं माझी नेमणूक तरी कां केली? तुम्हांस या प्रश्नांचें जें उत्तर वाटतें तें मात्र खोटें आहे. ही दौलत, हा मान मिळविण्याकरितां कितीएक वर्षेंपर्यंत मीं जे हाल भोगिले आहेत व जीं संकटें सोशिलीं आहेत, तीं ऐकिल्याशिवाय त्यांची तुम्हांस कल्पनादेखील करतां येणार नाहीं." असें म्हणून तो सर्व मंडळीस उद्देशून बोलला, "मित्र हो, तुम्हांस मी खरें सांगतों कीं ही संपत्ति मिळवितांना मला असे कष्ट पडले आहेत कीं, मनुष्य कितीहि द्रव्यलोभी असला तरी त्यानें ते ऐकिले असतां त्याचें धैर्य खचून त्याची श्रीमंत होण्याची इच्छा नाहींशी होईल ह्यांत संशय नाहीं. मीं सात सफरी केल्या, त्यांत मजवर जे प्रसंग गुदरले व जीं दुःखें मला सोसावीं लागलीं त्यांची सर्व हकीकत कदाचित् तुम्हीं वाचली असेल."

"होय महाराज, 'आरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी' या पुस्तकांत मीं ती मागेंच वाचली आहे." हिंदबाद खालच्या मानेनें म्हणाला.

"पण आज जी हकीकत मी आपणांस सांगणार आहें ती माझ्या सातहि सफरींपेक्षां अधिक सुरस व जास्त चमत्कारिक आहे. विक्तुरिया तर्मिनसपासून भांबुर्डें आणि पुणें या नगरांपर्यंतच्या माझ्या सफरीची इत्थंभूत हकीकत स्वतः आपल्या तोंडानें तुम्हांस सांगावी असें माझ्या मनांत आहे."

सिंदबाद ही हकीकत हिंदबादच्ये उद्देशानें सांगणार होता. सबब त्यानें चाकरास हुकूम केला कीं, हिंदबाद यांची तबियत एकाएकीं नादुरुस्त

झाल्याची ‘ सीक नोट ’ हपिसांत हिंदबादच्या वरिष्ठ अधिकाऱ्यास नेऊन द्यावी. पण सुदैवानें यांत फार कालाचा व्यय झाला नाहीं. कारण रेल-हपिसांतील सगळे वरिष्ठ अधिकारी बैठकींतच होते. तेव्हां हिंदबादानें ती स्वतःच आपल्या मुख्याकडे नेऊन गैरहजर राहण्याचा हुकूम मिळविला.

नंतर सिंदबादनें आपल्या गोष्टीस आरंभ केला.

**सिंदबाद दर्यावर्दी यानें विक्तुरिया तार्मिनस ते भांबुर्डें व पुणेंचा प्रवास केला त्याची गोष्ट.**

“ मित्र हो, माझ्या सात सफरी संपल्यानंतर मी बगदाद येथील माझ्या घरांत मुलांमाणसांसह सुखानें कालक्रमणा करूं लागलों. अशा रीतीनें मीं बरेच दिवस ऐषआरामांत काढले. पुढें एकाएकीं मला निद्रानाशाचा विकार जडला. त्यासाठीं मीं खूप वैद्य, हकीम इत्यादि लोकांचे इलाज केले; पण गुण मुळींच येईना. रात्रभर डोळ्यास डोळा लागेना. त्यामुळें माझी तबियत दिवसेंदिवस खंगूं लागली. याचा परिणाम माझे मनावरहि झाला आणि मी धर्मग्रंथांचें वाचन करूं लागलों. या अलौकिक द्रव्याचा मात्र मला फार नफा होऊन मला हळूहळू झोंप येऊं लागली. परवरदिगार अल्लानें माझ्यावर याप्रमाणें करुणा केली व पुढें माझी तक्रार पूर्ण नाहींशी होऊन माझ्या तब्येतीला खूपच आराम पडला. ग्रंथांत मी जें वाचीं त्यांत माझें बहुधा चित्त नसे आणि जेव्हां असे त्या वेळीं मला नेहमींच सगळें समजत असे असें नाहीं. मित्र हो, तुमच्याशीं खरें बोलायला मला कांहींच हरकत दिसत नाहीं. असो. परंतु एकदां मी वाचीत असलेलें वाक्य मला पूर्ण समजलें. त्याचा मराठी तर्जुमा ‘केल्यानें देशाटन पंडितमैत्री सभेंत संचार’ असा होईल. या वाक्यावर विचार करतां मी स्वतःशीं म्हणालों, ‘ अरे, तूं देशाटन तर खूप केलेंस, पृथ्वीप्रदक्षिणाहि घातल्यास, पण पंडित लोकांशीं तुझा कांहींच स्नेह नाहीं, किंवा विद्वानांच्या सभांतून तुझा संचारहि नाहीं. अहो, मी कोण लोभी आणि मूर्ख ! मी एवढी संपत्ति देशाटन करून मिळविली, सुखोपभोग घेतां घेतां माझे केस पांढरे झाले, तरी मला ज्ञानाची लालसा निर्माण होऊं नये ना ? माझें जीवित मातीमोलाचें होय.’ असें म्हणून मीं फार शोक केला आणि स्वतःची छाती बडवून घेतली. तरी कांहीं केल्या ही व्यथा माझे मनांतून जाईना. शेवटीं बगदादेंतील एका वृद्ध काजीच्या सल्ल्यानें

पंडित आणि विद्वान् यांचा केवळ सागर असलेला हिंदुस्थान देश आणि पंडितशिरोमणी व विद्वद्रत्नांचें केवळ बेट असलेलें पुणें या शहरास भेट द्यावी असा मीं मनसुबा रचिला.

" हिंदबादजी, आपण माझ्या सफरींची हकिकत वाचली म्हणतां, तर हिंदुस्थानांतील पंडितांचा उल्लेखहि आपणांस स्मरत असेल ! "

एकचित्तानें गोष्ट ऐकणारा हिंदबाद उत्तरतो, " होय महाराज, आपल्या पहिल्या सफरींत मिऱ्हेज राजाच्या राजधानीचा उल्लेख आहे. तेथें आपण हिंदुस्थानी विद्वान् व पंडित यांना भेटलां होतां. "

" माशाल्ला !...सुभानाल्ला !...आपली स्मरणशक्ति फारच तेज दिसते. " असें म्हणून सिंदबादनें आनंद पावून तेथल्या तेथें हिंदबादास एक शंभर रुपयांची थैली बक्षीस देऊन त्यास चाकरींत बढती देण्याचें आश्वासनहि दिलें.

" मित्र हो," तो पुढें म्हणाला, " मी आपला फार मोली वेळ घेत आहें याचां मला खेद होतो. आपली दप्तरांत जाण्याची वेळ झाली असणार. तसेंच रेलगाड्यांना आजकाल भयंकर अपघात पण होत असतात. तेव्हां...पण यांत मी कालाचा व्यय न करितां माझी गोष्टच पुढें चालू करितों.

" हिंदुस्थानांत जावयाचें नक्की केल्यावर चीजवस्त विकून मीं पैसा केला आणि बगदादेहून निघून बसोऱ्यास आलों. हें शहर इराणी आखातावर मोठें बंदर आहे. तेथून गलबत हांकारून आम्ही हिंदुस्थानकडे चालू झालों. वाटेंत आम्हांस अरबस्थान व इराण देश लागले आणि आम्ही मजल दरमजल करीत मुंबई बंदरीं येऊन दाखल झालों.

मुंबईचे मुक्कामांत मीं विद्वान् आणि पंडित यांचा खूप शोध केला. पण या जातीचा कोणीच प्राणी मला तेथें आढळेना. भेटले ते कोणी वजीर तर कोणी काजी, कोणी कवि तर कोणी ग्रंथकार, कोणी अधिकारी तर कोणी सेवक; पण विद्वानाचें उभ्या मुंबईत नांव नाहीं ! शेवटीं एका काजीची गांठ घेऊन मीं त्यालाच विचारलें. तेव्हां तो म्हणतो, " अरे मियाँ, मुंबई नगरांत तुला विद्वान् कसा सांपडणार ? बाबा रे, येथें विद्वान् होत नाहींत. तूं येथून पश्चिमेस गेलास तर पुणें येथें तुला विद्वानांची भली

मोठा पेठ लागेल. मित्रा, या पुणें शहराची ख्याति ही कीं, तेथील विद्वानांच्या प्रकाशामुळें रात्रीं अंधारच पडत नाहीं. केवळ सूर्य आणि चंद्र यावरून दिवस कीं रात्र हें तेथें ठरविलें जातें. असें असतां तूं पुण्याला चालतें व्हावयाचें टाकून येथें कां घुटमळतोस बरें ! समुद्रांत बुडालेली टांचणी एक वेळ या मुंबईत सांपडेल; पण विद्वान् ? नांव कशाला ! तेव्हां तूं पुण्याचा रस्ता पकड कसा !" पुण्याची एवढी तारीफ ऐकून मीं म्हटलें, "धन्य तो हिंदुस्थान देश, आणि धन्य ते पुणें !" आणि मी तांतडीनें पुण्याला जाण्याच्या खटपटीस लागलों.

मित्रा हिंदबादा, त्या वेळीं आगगाडीच्या प्रवासांत ज्या अडचणी येत व जे दुर्धर प्रसंग प्रवाशांवर गुदरत त्यांचें वर्णन म्यां पामरें काय करावें ? कुराणाची शपथ घेऊन मी आपणांस एवढें मात्र सांगू शकेन कीं, आजच्या अडचणी म्हणजे त्यापुढें काय होत ? प्रवासांतील संकटांची जाणीव वरिष्ठांसहि होती. म्हणून कीं काय, त्या वेळीं 'ट्रॅवल इफ् यू कॅन', 'शरीर नश्वर आहे', 'आत्मा अमर आहे', 'हकिमाच्या औषधानें मरण्यापेक्षां अपघाती मरण बरें' अशा पाट्या सर्वत्र लावलेल्या असत. असें असूनहि गाडीचीं तिकिटें मिळणें त्या वेळीं फार मुष्किल असे. 'आरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी' आणि 'सिंदबाद दर्यावर्दीच्या सफरी' वाचून प्रजेंत प्रवासाची आवड निर्माण झाली होती, कीं हकिमाच्या हातानें मरण ओढवण्यापेक्षां तडकाफडकीं मरण बरें असें बहुसंख्य प्रजेला वाटत होतें, काय न कळे ! तसेंच सांप्रतची ओळींत उभें राहून तिकीट खरीदण्याची पद्धत त्या वेळीं नव्हती. 'बळी तो तिकीट मिळवी' असें होई; आणि माझी तबियत तर शराबी व्यसनामुळें अगोदरच तोळामासा असे. मित्र हो, त्या काळांत मी पिण्याचें पाणी औषधालासुद्धां वापरीत नसें. त्यामुळें मला तिकीट प्राप्त होणें अशक्यप्राय होतें. तरीहि अनेक वजीर आणि त्यांचे चाकर यांच्या दाढयांना हात लावून आणि हातापायां पडून मीं तिकीट मिळविलें. एक सांगायचें राहूनच गेलें. तें हें कीं, पुण्याला जाणाऱ्या प्रवाशांची फार तोबा गर्दी असे. माणूस नुसता पुण्याला गेला तरी तो विद्वान् होतो असा समज त्या वेळीं रूढ होता. मीं तर असें ऐकलें होतें कीं, गाडी जसजशी पुण्याजवळ

जाऊं लागे तसतशा विद्वत्तेच्या भावना प्रवाशांस होऊं लागत. या गडबडींतहि मीं पुण्यास जाणाऱ्या गाडीचें तिकीट वरीलप्रमाणें मिळविलें व जुम्म्याच्या दिवशीं गाडींत सामान चढविलें. हें मीं येथें सहज सांगितलें, पण तसें करतांना मला फारच कष्ट झाले. त्याची इत्थंभूत हकीकत ऐकवून मी आपणांस कष्टवीत नाहीं. मी स्वतःहि गाडींत कसाबसाच चढलों. असा त्रास मला पूर्वींच्या सफरींत झाला नव्हता. पण मातबर लोकांच्या मुलाखतीस जावयाचें म्हणजे अशी तकलीफ आवश्यक असावी असा मीं अंदाज केला आणि दुःखांतच सुख मानलें व हें दुःख मला अनुभवूं दिल्याबद्दल पैगंबर महंमदाला धन्यवाद दिले.

नाखुद्यानें गाडी हांकारली, ( मित्र हो, मला क्षमा करा. दर्यावर्दीच्या संवयीमुळें मी गाडीच्या कप्तानासहि नाखुदाच म्हणत आहें. ) आणि ती मोठ्या इत्तीच्या डौलानें व दृष्टीस अत्यंत सुख देणारे असे नयनमनोहर धुराचे लोट सोडीत विक्तुरिया टर्मिनसांतून निघाली. माझें बहुतेक सामान ठिकठिकाणीं गाडींत व माझा बराचसा देह गाडीबाहेर आणि कांहीं आंत अशा इतमामानें आमची सफर सुरू झाली. गाडीच्या धुराचें सुख मी डोळे मिटून अनुभवीत आहें तोंच एक गचका देऊन गाडी थांबली. मी अंमळ आश्चर्यानें इतर जोडीदार प्रवाशांस विचारतों तों त्यांनीं गाडी मशीद नामक बंदरांत थांबली असल्याचें मला सांगितलें. हिंदुस्तानी भाषा मी नीट वाचूं शकत नसल्यामुळें मला कांहीं लक्षांत आलें नव्हतें. ‘ बंदर ’ आणि तेंहि ‘ मशीद ’ नामक; त्यामुळें मजसारख्या दर्यावर्दी मुसलमानास किती संतोष झाला असेल हें मीं आपणांस कसें सांगावें. प्रवासांतीलें आतांपर्यंतचें सर्व दुःख मी एकदम विसरलों आणि हर्षातिशयानें उद्गारलों, ‘ इन्शाल्ला ! प्रभो, तुझी थोरवी अगाध आहे. रेलगाडीच्या प्रवासांतहि त्वां मजसारख्या पामर सेवकासाठीं कोरड्या जमिनीवर बंदर निर्माण केलेंस आणि त्याचें नांवसुद्धां ‘ मशीद ’ असें त्वां ठेवलेंस. ’ आनंदित होत्साता मी मशीद बंदरांत उतरलों, आणि जमिनीवर गुडघे टेकून अल्लाची प्रार्थना करून स्तुति आरंभिली. यांत मी इतका गुंगून गेलों कीं, तिकडे गाडीचें शिंग वाजून ती बंदर सोडून गेली तरीसुद्धां माझ्या तें लक्षांतच आलें नाहीं. मी भानावर आलों तेव्हां नाखुद्यानें गाडी वेगानें

हांकारली होती. गाडी दिसेनाशी होत होती. मीं ऊर पिटून खूप हांका मारिल्या; पण व्यर्थ. गाडी फारच झपाट्यानें निघून गेली. ऊरबडवा आक्रोश करीत मींच दुर्दैवी मागें राहिलों.

गाडी गेल्याचें पाहून मला अपरंपार दुःख झालें. आक्रोश करीत मी म्हणालों, ' अरे, काय मी अभागी ! पुण्याच्या विद्वानांस भेटण्याची ही केवढी बहुमोल संधि मीं वायां दवडली ! माझा धिक्कार असो ! तसेंच अहो, कोण मी लोभी, मूर्ख ! ज्ञानाचा झाला तरी तो लोभच नव्हे काय ? पंडित आणि ज्ञान यांचेवांचून आजपर्यंत माझें काय अडलें होतें ? चांगला अज्ञानांत, ऐषआरामांत लोळत असतां कोठून बरें ही अवदसा मला आठवली ? ' अशा प्रकारें मीं पुष्कळ विलाप केला. डोकें बडविलें व जमिनीवर गडबडां लोळलों; परंतु शेवटीं डोक्यास टेंगूळ येऊन माझें दुःख बरेंच हलकें झालें व मी म्हणालों, ' घडावयाची ती गोष्ट घडून गेली; आतां शोक करण्यांत काय फळ ? '

तेवढ्यांत मला माझ्या सामानाचीहि आठवण झाली आणि मीं माझा शोक आवरता घेतला. रेलगाडीचा एक अधिकारी जवळ उभा होतासें वाटलें. त्याच्याजवळ जाऊन मीं त्यास पुशिलें, ' महाराज, माझ्यावर अशी अशी आपत्ति ओढविली आहे. मीं आतां काय करावें ? ' तो मला म्हणाला, " अरे मियाँ, तुम्ही येथें नवे दिसतां. जेथें आम्ही माणसांच्या जिवाचीसुद्धां खात्री देऊं शकत नाहीं तेथें यःकश्चित् सामानाची काय कथा ! गाडीच्या प्रवासाला निघतांना उतारू आपल्या मुलामाणसांचे निरोप घेऊन निघतात, तसेंच सामान गाडींत ठेवल्यावर त्याचाहि निरोप घेतात. दोन्ही परत भेटल्यास भेटलीं, नाहीं तर नाहीं. सबब सामानाबद्दल दुःख न करतां तें गेलें असें समजून आपला जीव वांचविल्याबद्दल परमेश्वराला धन्यवाद देत तूं येथून चालता हो कसा ! "

या उत्तरामुळें निरुत्साही व दुःखी होत्साता मी त्या आवारांतून हिंडत होतों. माझी सर्व चीजवस्त सामानाबरोबर गाडींतच राहिली होती. त्यामुळें या अनोळखी देशांत मी कफल्लक झालों. मजजवळ गाडीचें एक तिकीट, आणि बटवा गाडींतच राहिल्यामुळें खिशांत कांहीं मोहोरा व रुपये राहिले तेवढेच होते. मी हिंडत होतों, तोंच ' भों ऽ ' असा मोठा स्वर माझ्या

कानांवर पडला आणि मीं त्या आवाजाच्या दिशेला दृष्टि टाकली, तों गाडीचें एक प्रचंड धूड मला परत मशीद बंदरांत शिरतांना दिसून आलें. तें पाहून मीं भाकलेल्या करुणेमुळें हृदयाला पाझर फुटून अल्लानेंच ती गाडी मजकरितां पाठविली कीं काय असें वाटून मला आनंदाचें भरतें आलें. मी धांवत जाऊन त्या गाडींतील एका वाटसरूस पुशिलें, " बाबा रे, ही गाडी कोठें जात आहे ? "

तो उत्तरला, " ठाणें नामक उपनगर आहे तेथें ही गाडी जात आहे. तूं येथें नवीन दिसतोस. तरी जरूर तूं या नगरांत जा. तेथील प्रदेश व लोक पाहण्यासारखे आहेत."

मी त्याचे आभार मानले आणि आंत घुसलों. गाडींत माणसें ठेंचून भरलीं होतीं. आणि इकडचें तिकडे होतां येत नव्हतें. कित्येक वेळां मला गाडी कुठल्या दिशेनें जात आहे हेंच समजत नव्हतें. शेवटीं ज्या माणसाचा कान माझ्या तोंडाजवळ आला होता, त्याच्या कानांत मीं विचारलें, तेव्हां त्यानें गाडी थांबलेली नसून चालत आहे व ती विक्तुरिया टर्मिनसच्या दिशेनें नसून ठाण्याच्याच दिशेनें चालत आहे; तसेंच ठाणें व पुणें यांत विशेष तफावत नाहीं, इत्यादि हकीकत सांगितली, तेव्हां माझा जीव भांड्यांत पडला.

याप्रमाणें गाडी खूप वेळ चालत राहिली. दरम्यानच्या काळांत कोणा प्रेमळ वाटसरूंनीं माझ्या दाढीचा उपयोग स्वतःचा तोल संभाळण्यासाठीं दोरीसारखा केल्यामुळें मला पांच-सात जबरदस्त पण प्रेमळ धक्के बसले. माझ्या पायांवर फक्त चार-पांच लोकांनींच, पण एकदम उभें राहण्याचा प्रयत्न केला आणि कोणीं निव्वळ गैरसमजानें माझ्या खमीसाच्या आंतल्या खिशांत हात घालण्याचा प्रयत्न केला. बस् इतकेंच. हें आणि एकदोनदां माझ्या छातींत कुणाचे बुक्के बसले, पाठींत कोणीं तरी जोरानें ढोसलें, डोक्यावर कुठल्या तरी वजनदार वस्तूचे दोन-चार किरकोळ आघात झाले. एवढें सोडलें तर मला तसा बिलकुल म्हणजे अगदीं कांहींच त्रास झाला नाहीं. झाला त्यापेक्षां जास्त त्रास दरवेळीं मला होणें हें अगदीं शक्य होतें; म्हणून मी दरवेळीं असा त्रास दयाघन देवानें मला दिला नाहीं म्हणून मी त्याला धन्यवाद देत होतों.

यात्रमाणें आमचा प्रवास चालला असतां एकाएकीं भयंकर कर्कश असा आवाज ऐकूं आला आणि दुसऱ्याच क्षणीं गाडींतील सर्व उतारू वेडेवांकडे फेंकले गेले व कानठळ्या बसविणारे आवाज करीत गाडी कोलमडून खालीं पडली. लोकांच्या रडण्याओरडण्यानें एकच हलकल्लोळ माजला. इतरांच्याबरोबर मलाहि गाडीनें बाहेर फेंकलें; पण सुदैवानें मी लोकांच्या मध्यभागीं असल्यामुळें मला कांहींच इजा न होतां मी बचावलों. पूर्वींच्या अपघातांचीच येथें पुनरावृत्ति झाली;—म्हणजे अपघातांत मजखेरीज सर्व असामी दगावले. असें अनेकदां झालें होतें. गलबतच्या गलबत फुटायचें आणि तें व त्यांतील प्रवासी समुद्राचें भक्ष्य व्हावयाचे; परंतु माझ्याच हातीं नेमकें एखादें फळकूट लागावयाचें आणि मी वांचावयाचों. प्रभो, तुझी करणी अतर्क्य आहे आणि तुझी लीला अगाध आहे !

कांहीं वेळ मी त्या अपघाताच्या ठिकाणीं उभा राहिलों; पण माझ्या असें लक्षांत आलें कीं, माझा त्या जखमी इसमांस कांहींच उपयोग नव्हता. ते वरच्या पंथाला लागले होते. तेव्हां मी तेथून उठलों आणि चालता झालों. पुणेंहि गेलें आणि ठाणेंहि गेलें अशी माझी स्थिति झाली होती. पण याबाबत नशीबाशिवाय कोणाला बोल लावणार ? उलट माझ्या आयुष्याची दोरी सबळ म्हणून मीं वांचलों. घडावयाची ती गोष्ट घडून गेल्यावर शोक करण्यांत काय फळ ? मग ईश्वरावर हवाला ठेवला आणि मनांत आणलें, ' आतां तो काय करील तें करो. ' पुढें काय करावें हें कांहींच सुचेना. तेव्हां शेजारीं झाड होतें त्यावर चढून चोहींकडे पाहूं लागलों मनांत आशा कीं, जेणें-करून वांचण्याची आशा वाटेल असा कांहीं विषय दिसेल तर पाहावा.

आणि त्याप्रमाणें मी पाहतांच मला दूरवर एक मोठा वाडा दिसला. झाडावरून उतरून मी त्या वाड्याच्या दिशेनें चाललों. आपणांस हें सांगावयास नकोच कीं, गाडी पडली होती तेथून निघतांना मीं इतर प्रवाशांचे खाण्याचे पदार्थ व पिण्याचें पाणी हे जिन्नस बरोबर घेतले होते.

वाड्यापाशीं जाऊन पोंचल्यावर मीं या वाड्याचा धनी कोण, येथें राहवयाची व्यवस्था होईल काय, वगैरे चौकशी केली. तोंच कोणी एक दरवान धांवत आला आणि माझ्या दंडास बळकट धरून पुसतो, ' तूं कोण, येथें तुझें काय काम ? ' मी त्याच्या दांडगाईमुळें जरासा गडबडलों; पण मग

उत्तरलों, ' बाबा रे, मला सिंदबाद म्हणतात. मी बगदाद शहरांतील एक प्रसिद्ध व्यापारी असून हिंदुस्थान देशांतील ठाणें व पुणें येथील विद्वानांस भेटण्यासाठीं इकडे आलों आहें. '

माझें हें उत्तर ऐकून तो दरवान खदखदां स्वर करून हंसतो व म्हणतो, ' वा व्वा ! आपण महशूर दर्यावर्दी सिंदबाद काय ? छान ! आपल्या मुलाखतीनें आम्हांस फारच संतोष झाला. आमची अशी समजूत कीं, आपलें गलबत फुटून आपण केव्हांच पैगंबरवासी झालांत... ' असें म्हणून परत एकदां त्यानें हास्याचा गडगडाट केला व थांबून परत म्हणतो, ' पण असेल, तेंहि शक्य आहे. आपण दर्यावर्दी सिंदबाद असालहि ' आणि मग तो पुढें वांकून माझ्या कानांत म्हणतो, ' अहो, आतां खरें पुसाल तर मी जादूचा दिवा व अंगठी यांचा मालक अल्लाउद्दीन, पण या इथल्या लोकांना मीं खरं सांगितलं आहे काय ? छीः छीः ! मी त्यांना आपण अल्लाउद्दीन खिलजी असल्याचेंच सांगतों आणि मूर्ख बेटे माझ्यावर विश्वासहि ठेवतात. पण माझी गुपित गोष्ट मेहेरबानी करून आपण कोणास सांगू नये.'

आतां या मूर्खास कसें समजवावें याचा अचंबा करीत मी उभा राहिलों, तोंच त्या आवारांतून अनेक लोक धांवत आले आणि माझ्याभोंवतीं फेर धरून नाचूं लागले. तितक्यांत सुदैवानें कांहीं रक्षकहि तेथें धांवत आले आणि त्या लोकांस त्यांनीं पकडून आंत नेलें. हे लोक कोण याची चौकशी करतां हिंदुस्थानांतील व परकीय देशांतील थोरथोर, मातबर विद्वान् व संशोधक असल्याचें मला कळलें. यांतले कांहीं दिवंगत विद्वान्हि होते ही विशेष आनंदाची गोष्ट होती असें तो रक्षक म्हणाला. हें ऐकून मात्र मी बुचकळ्यांत पडलों आणि ज्या विद्वान् लोकांना भेटण्याकरितां मी एवढा तळमळत होतों ते शेवटीं मला भेटले यांचा जो आनंद मला सुरुवातीस झाला होता त्याबद्दल मला शंका वाटूं लागली. पण गांवाच्या नांवाची चौकशी करतां सुदैवानें तें ठाणेंच असल्याचें मला कळलें. हा घोटाळा काय आहे, कीं माझेंच कांहीं चुकत आहे, हें माझ्या ध्यानांत येईना. मी अशा बावचळल्या स्थितींत उभा असतांना ते रक्षक परत आले, आणि माझी कांहींच विचारपूस न करितां त्यांनीं मला कैद करून

आंत चालविलें. मी त्यांना ओरडून खूप सांगितलें कीं, 'मी सिंदबाद दर्यावर्दी असून विद्वानांचे भेटीसाठीं पुण्याची मुशाफिरी करीत आहें. मीं कोणाचा कांहीं गुन्हा केलेला नाहीं.'

त्यावर त्या रक्षकांचा म्होरक्या हंसत ओरडला, 'अरे, बरें झालें याला आपण पकडलें. हा नुसता वेडाच नाहीं, तर हा पुण्यास जाऊं इच्छितो. आणि एवढंच नव्हे, तर तेथील विद्वानांस भेटूं म्हणतो. सांप्रत गॅलिलिओ, न्यूटन यांसारखे विद्वान् या वाड्यांत असतांना हा उद्धटपणा ! आतां याची भली खोड मोडूं या...'

माझा नाइलाज होऊन मी त्या लोकांबरोबर चालूं लागलों. मी आतां या 'विद्वान्' लोकांच्या तावडींत सांपडलों होतों. राक्षस, रानटी लोक, चांचे यांच्या हातांत मी पूर्वी अनेकदां सांपडलों होतों. पण त्यांच्या हाल करण्याच्या तऱ्हा मला ठाऊक होत्या. त्यामुळें येथें नवीन अनुभव काय येतात या भीतीनें मी अगदीं गळाटून गेलों व मनांतल्या मनांत देवाचा धांवा करूं लागलों. 'हे दयासमुद्रा, पूर्वीं तूं या पामरास भयंकर राक्षसांपासून वांचविलेंस; आतां या विद्वानांपासून माझें रक्षण कर. पण देवा, हें कर्म जास्त कठीण; तरीहि तुझ्यासारख्या सर्वशक्तिमानाला त्यांत अशक्य तें काय?' त्या लोकांचीसुद्धां मीं खूप गयावया केली; पण त्यांनीं मजकडे पूर्ण दुर्लक्ष करून मला एका कोठडींत टाकून बाहेरून भलेंमोठें कुलूप ठोकलें. मी आंत बसून मोठ्यांदा शोक करूं लागलों, तोंच कोठडीच्या गजांपाशीं उभें राहून कोणी मला खुणावीत असल्याचा भास झाला. मोठ्या आशेनें मी तेथें जाऊन पाहतों तों 'अल्ला-उद्दीन खिलजी' तेथें उभा होता. तो मला म्हणतो, 'मित्रा, धीर सोडूं नकोस. थोड्याच वेळानें मी माझा दिवा घांसून राक्षसाला बोलावीन आणि तुझी येथून सोडवणूक केल्याशिवाय राहणार नाहीं.' त्या मूर्खास मी काय सांगणार? मुकाट्यानें मी कोठडींत परत आलों आणि परत शोकसागरांत निमग्न झालों.

प्रिय मित्रा हिंदबादा, या वेड्यांच्या सहवासांत मीं नंतर कांहीं दिवस कसे काढले हें माझें मलाच माहीत. त्या विद्वानांच्या बडबडीनें आणि विद्वत्तेनें मी अगदीं रंजीस आलों. डोकेंदुखीची भयंकर व्यथा मला जडली आणि मी अन्नपाणीसुद्धां वर्ज्य केलें. त्या विद्वानांच्या व्याख्यानांनीं माझी तबियत फार खंगली.

पण लौकरच असा आततायीपणा करणें हें बरोबर नाहीं असें माझ्या ध्यानांत आलें. संकट आलें म्हणजे युक्ति सुचते तसें झालें. हळूहळू मी त्या रक्षकाला विश्वासांत घेतलें. त्याचा जादूचा दिवा कोणा लुच्चा माणसानें त्याच्याकडून लुबाडला होता, तो त्याच्याकडून आणून देण्याचें वचन मीं ‘अल्लाउद्दिना’स दिलें. आणि एके दिवशीं भल्या पहांटे त्यानें मला तेथून पळून जाण्यास मदत केली.

एकदां तेथून निसटल्यावर अल्लाची प्रार्थना करण्यासाठींसुद्धां मी तेथें थांबलों नाहीं. मी बरेच मैल धांवत आणि पळत होतों. शेवटीं पुरेसे दूर आलों असल्याची मला जेव्हां खात्री झाली तेव्हां मी थांबलों. त्या वेळीं मी अगदीं गळून गेलों होतों. तहान आणि भूकहि खूप लागली होती. मीं बसल्या जागींच आजूबाजूला पाहिलें, तों एक स्वच्छ पाण्याचा झरा तेथून शंभरदीडशें कदमांवर झुळझुळ वाहत आहे व त्याच्याच कांठावर पक्व फळांनीं लहडलेले वृक्ष आहेत असें मला आढळलें. माझ्या नशिबाला दुवा देत मी तेथून उठलों आणि त्या झऱ्याकडे गेलों. तेथें मीं पोटभर फळें खाल्लीं व भरपूर पाणी प्यायलों. नंतर मी तेथें कांहीं वेळ शांतपणें झोंपलों आणि मला झोंपहि अगदीं गाढ लागली.

पण कांहींच वेळ. कारण थोड्याच वेळानें माझ्या पोटांत विलक्षण वेदना होऊं लागल्या. दुःखानें मी अगदीं बेजार झालों. बहुधा मीं जीं फळें खाल्लीं होतीं तीं विषारी वृक्षाचीं असावींत आणि तें पाणी मंतरलेलें असावें. पण आतां त्याला काय इलाज ? त्या वेदना तशाच सहन करीत मी तेथून उठलों आणि आलों होतों तिच्याविरुद्ध दिशेनें चालता झालों.

बराच वेळ चालल्यानंतर मला कांहीं लोक रस्त्यानें जातांना भेटले. माझी व्यथा पाहून त्यांनीं माझी विचारपूस केली. खरें पुसतां बगदादेंत मला वैद्य आणि हकीम यांची काय कमताई होती ? परंतु प्रवासाच्या हौसेमुळें हें संकट मीं मजवर ओढवून घेतलें होतें. पण त्याबद्दल कोणाला बोल लावणार ? उलट हे लोक तरी भेटले हें मी सुचिन्ह समजलों.

मात्र हा माझा मोठाच गैरसमज होता हें त्या धटिंगणांनीं माझ्या अल्पावधींतच ध्यानीं आणून दिलें. माझ्या पोटदुखीच्या व्याधीचें मी दुःख

करीत होतों तों त्यांनीं मला 'अरे, आमचें एवढें योगकलाकेन्द्र येथें असतां तूं घाबरावेंस हें आम्हांला मुळींच युक्त वाटत नाहीं.' असें म्हणून उचललें व जवळच असलेल्या वाड्यांत नेऊन दाखल केलें.

मित्रहो, या लोकांच्या कचाट्यांत मी अशा दुर्दैवानें सांपडल्यानंतर मला ज्या हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या, त्यांचें वर्णन शब्दांत करणें दुरापास्त आहे. मला अपचन विकार झाला असें निदान करून त्यांनीं मला चार दिवस उपाशीं ठेवलें. पुढें मला ते पाणी प्यावयास देणार, तोंच मी मांसभक्षक आणि मद्यपी आहें हें त्यांच्या लक्षांत येऊन त्यांनीं मला आणखी दोन दिवस पाणी द्यावयाचें लांबविलें. भुकेनें आणि तहानेनें माझ्या जिवाची फार तडफड झाली. आणि एतावता मरणापेक्षां कांहीं वाईट होत नाहीं म्हणून मीं आत्महत्या करण्याचा विचार रचिला. परंतु अहो, आमच्या मुसलमानी धर्मांत आत्महत्त्येचा निषेध केला आहे म्हणून मीं तो विचार सोडून दिला व मन धिट्टविट्ट करून तसाच राहिलों. नंतर आठ दिवस मीं केवळ जलाहार आणि जलपान केलें. या द्व्यामुळें त्या हकिमांच्या मतानें माझ्या दुखण्यास खूप उतार पडला व मी खात्रीनें यमसदनास जाणार असें त्यांना वाटूं लागलें. मीहि दिवसें-दिवस खंगत चाललों व पुढें अस्थिपंजर होऊन सामान्य माणसाच्या दृष्टीला दिसेनासा झालों. माझ्याकडे पाहावयाचें झाल्यास तुम्हांस जाड भिंगानेंच पाहावें लागलें असतें.

या ठिकाणच्या योगकलेच्या अभ्यासानें मी अगदीं जेरीस आलों. माणसाला मारायचें असल्यास तें अशा अवघड पद्धतीनें आणि सावकाश मारण्यापेक्षां बगदादेंत आम्ही करीत असूं त्याप्रमाणें शीर धडावेगळें करून मारणें बरें नव्हे काय? पण मित्रहो, मरणें हीसुद्धां एक कला आहे आणि कलात्मक मरण हेंच खरें, असें मला तेथील काजीनें सांगितलें.

या लोकांच्या कचाट्यांतून सुटण्यासाठीं मग मीं एक युक्ति योजिली. ती म्हणजे एके दिवशीं सकाळीं मी मेलों असल्याचें सर्वांना आढळून आलें. त्याबरोबर आपले प्रयोग यशस्वी झाल्याबद्दल तेथील शास्त्रज्ञांना परमावधीचा आनंद झाला. त्यांची त्या वेळीं समाधि लावण्याची वेळ असल्यामुळें त्यांनीं

एका चाकराला मला नेऊन मुसलमानी पद्धतीप्रमाणें पुरण्याचा हुकूम केला. मीहि मजेनें त्याच्या खांद्यावरून गांवाबाहेर बऱ्याच दूरपर्यंत गेलों आणि तेथें दुसरें कोणी नाहीं असें पाहून एकदम उठून त्याचा गळाच पकडला. त्याबरोबर 'भू ऽऽऽत...भू ऽऽऽत !' असा विक्राळ शब्द करीत तो गांवाकडे पळाला आणि मी विरुद्ध दिशेला चालता झालों. न थांबतां मी सारखा चालतच राहिलों. खूप चालल्यावर मला दूरवर क्षितिजापाशीं धूर दिसूं लागला आणि गाडीचें एक धूड पुढें सरकतांना दिसलें. मी आश्चर्यानें चकित होऊन त्या दिशेनें चाललों. तों मला समोर एक प्रशस्त पडवी दिसली आणि तेथेंच झुक्झुक् असा मंजुळ स्वर करीत ती मघांची गाडी येऊन उभी राहिली.

ती गाडी पाहून मला आनंद बहुत झाला, पण विस्मयहि फार झाला. कारण मशीद बंदरांत जी गाडी मला टाकून गेली होती तीच ती होती यांत तिळमात्र संशय नव्हता. जवळजवळ पंधरवड्यानें ती गाडी मला परत दिसत होती. गाडी थांबतांच मीं नाखुद्याकडे जाऊन माझ्या सामानाची मागणी केली. मी म्हणालों, 'नाखुदेबोवा, सिंदबाद बेपत्ता झाला असें म्हणतात तो मीच. मी अद्यापि ईश्वरकृपेनें जिवंत आहें. माझे गट्ठेहि मीं ओळखले.'

माझें हें भाषण ऐकून नाखुद्यास अचंबा वाटून तो म्हणाला, 'काय, तूं सिंदबाद? मनुष्यांत सत्य म्हणून उरलेंच नाहीं. मला खात्रीनें वाटतें तूं मेलास म्हणून. केवढें तरी हें तुझें धारिष्ट. तूं दिसण्यांत तर मला माणूस दिसतोस आणि परक्याच्या मालाचा अभिलाष करून भयंकर लबाडी सांगतोस? तुला शरम रे कशी नाहीं वाटत?' मीं त्याला अंमळ दम धरून सर्व ऐकण्यास सांगितलें, व मग त्यानेंहि मजकडे नीट न्याहाळून पाहिल्यावर मला सिंदबाद म्हणून ओळखलें, व 'ईश्वरी लीला अचिंत्य आहे' इत्यादि म्हणून माझें सामान मला पुणें मुक्कामीं परत घेण्याची विनंति केली.

मग मी गाडींत बसलों आणि गाडी चालू झाली. पण गाडी सुरू झाल्यावर कांहीं तासांनींच मला करमेनासें झालें. तोंच मला कोणीतरी म्हणालें, "अरे, या जवळच्या गांवांतच कोणीएक महाविद्वान् व कलावान्

मनुष्य राहतो त्याचें दर्शन तुम्हीं अवश्य घ्यावें." विद्वान् म्हणतांच माझ्या तोंडास अगदीं पाणी सुटलें. असेंच पूर्वी पैसा म्हणतांच माझ्या तोंडास पाणी सुटत असे. तेव्हां या विद्वानाच्या भेटीचा मोह होऊन मी पुढील ठिकाणीं परत एकदां गाडींतून उतरलों. आणि उतरलों तें बरेंच झालें. कारण थोडा पुढें जाऊन मी मागें वळून पाहतों तों काय, आमची सबंध गाडीच्या गाडी पुलावरून कोसळून खालीं नदींत पडत होती. आतां वाईट एवढेंच कीं, माझें पागोटें व जोडे गाडींतच राहिले. परंतु सुदैवानें माझें डोकें पागोट्याखालीं व पाय जोड्यांत विसरलेले नव्हते; त्यामुळें मी सहीसलामत बचावलों.

मृत्यूच्या जबड्यांतून थोडक्यांत वांचायची आतां मला संवयच झाली होती. त्यामुळें या वेळीं मला कांहीं तितकेंसें सुख वाटलें नाहीं. मी चालता होत कांहींसा पुढें गेलों, तों एका दगडावर बसलेला गोसाव्यासारखा एक माणूस मला दिसला. त्यानें दाढी व मिशा राखल्या होत्या व तोंडानें तो कांहींतरी पुटपुटत होता. त्याचा चेहरा अगदीं पडल्यासारखा पाहून मीं म्हटलें, 'आपण कोण? येथें काय करतां?' तेव्हां तोंडानें न बोलतां त्यानें खुणांनीं मला सुचवून शेजारीं दिसणाऱ्या ओढ्यापलीकडे पाठीवरून नेण्यास सुचविलें. या गरीब माणसास मदत करावी म्हणून मी खालीं वांकलों, तोंच गप्दिशीं उडी मारून तो माझ्या मानगुटीवरच बसला. त्यामुळें मी मूर्च्छित होऊन खालीं पडलों; परंतु त्यानें माझी मान म्हणून सोडली नाहीं.

माझ्या पांचव्या सफरींत अशाच एका म्हाताऱ्यानें मला त्रास दिलेला आपणांस आठवत असेल. पण या दाढीवाल्यानें मला जो त्रास दिला त्याची इयत्ता वेगळीच होती. कुठल्या द्वाड मुहूर्तावर मी बगदादेहून निघालों होतों, कोण जाणे! पण आतां मात्र या राक्षसाच्या कैचींत मी पुरा सांपडलों होतों हें खचित. अष्टौप्रहर हा माणूस माझ्या गळ्याभोंवतीं विळखा घालून बसे आणि मला मन मानेल तसा हिंडवी. मी त्याला डोक्यावरून हिंडवीत असतां तो मला स्वतः रचलेलीं नावलें सांगूं लागला. या नावलांचीं किंवा कादंबऱ्यांचीं त्यानें नाटकें पाडलीं होतीं. इतर नाटकांच्या तो कादंबऱ्या पाडण्याचा बेत रचीत होता. नाटकांवरून मोठालीं

काव्यें, संगीतिका, पोवाडे, वग इत्यादिसुद्धां त्याला लिहावयाचें होतें. एका नावलांतून इतके प्रकार, व अशा शंभर नावला त्याच्या मुखोद्गत होत्या. त्या सर्व व त्यांचीं रूपांतरें त्यानें मला ऐकविण्याचें ठरविलें. आतां माझ्या नीट ध्यानांत आलें कीं, गळेगांवचा गळेगुरुजी तो हाच. त्याच्यावरूनच या गांवाला हें नांव पडलें होतें. गाडींत मीं ज्या विद्वान्, कलावान् माणसाविषयीं ऐकिलें ती वल्ली हीच हें मला कळून चुकलें.

या माणसाची बडबड करण्याची शक्ति पाहून मला विस्मय झाला. ईश्वरी शक्ति अगाध आहे. काय हा बोले ! याच्या बोलण्याच्या शक्तीनें एखादें मोठें गलबतसुद्धां शेंकडों मैल प्रवास करतें. दुःखाची गोष्ट इतकीच कीं, या शक्तीचें लक्ष्य मी झालों होतों आणि मला तें तो सगळें अगदीं डोक्यावर बसून ऐकवीत होता. बरें, विषयवैचित्र्य या माणसाच्या बोलण्यांत जवळजवळ नव्हतेंच म्हणा ना. सदासर्वकाळ तो स्वतःविषयीं बोले. तो बोलत नसे तेव्हां स्वतःविषयीं विचार करीत असे, किंवा दुसऱ्याला स्वतःविषयीं बोलायला लावीत असे. आतां म्यां पामरें त्याचें कांहींच वाचलें नव्हतें; त्यामुळें मला तोंडाचा उपयोग फक्त क्वचित् खाण्याकरितां झाला तेवढाच. बोलण्यासाठीं तें मला सहसा वापरावें लागलेंच नाहीं. फक्त मधूनमधून 'वा व्वा,' 'खाशी,' 'बहोत अच्छी...' 'माशाल्ला,' इत्यादि सहजोद्गार मला सक्तीनें काढावे लागत असत, तेवढेच.

मित्रहो, या समंधाचें ओझें अष्टौप्रहर मानेवर बाळगत असतां मला किती दुःख झालें असेल याची कल्पना करा. पण तरीहि मनांतल्या मनांत मला माझेंच हंसें आल्यावांचून राहिलें नाहीं. मी स्वतःशींच म्हणालों, 'अरे, विद्वानांच्या सहवासाला तूं मुकेला होतास ना? भोग आतां आपल्या कर्माचीं फळें.' येणेंप्रमाणें बरेच दिवस गेले. पण आमच्या डोईवरचे विद्वान् कलावान् कंटाळले नाहींत.

शेवटीं मी एक युक्ति योजिली. बगदादेहून येतांना मीं तमाखू नांवाचें एक प्रभावी द्रव्य मजबरोबर आणलें होतें. हें द्रव्य तोंडांत टाकलें असतां मेंदू ताजातवाना होतो व एकंदर फार सुख होतें. पण हें द्रव्य नवीन माणसाला प्रथम थोडें घाबरवून सोडतें. या द्रव्याची पिशवी काढून मीं तें थोडें तोंडांत टाकलें व त्यामुळें आनंदित होऊन नाचूं व गाऊं लागलों.

त्याबरोबर माझ्या डोक्यावरील त्या दाढीवाल्या बोवानेंहि तें द्रव्य खाण्यास मागितलें, व मींहि त्याला तें चांगलें बचकभर काढून दिलें. तें खाऊन त्याला मोठा कैफ चढला व तोहि मोठ्यानें स्वर करून आपल्या भाषेंत गाऊं लागला. या नादांत त्याची माझ्या मानेवरची पकड ढिली पडली. याचा फायदा घेऊन मीं त्यास खालीं झोकून दिलें. तोहि तमाखू या द्रव्याच्या अंमलांत असल्यामुळें त्याचें भान हरपलें होतें. तो खालीं पडतांच मीं त्याच्याच बटव्यांतील एक जाडीशी नावेल काढून त्याच्या डोक्यांत हाणली व आपल्या कादंबऱ्या यमाला ऐकविण्यासाठीं मीं त्यास यमसदनास धाडिलें. या गोसाव्याच्या बंधनांतून मुक्त झाल्यामुळें मला फारच हलकें वाटलें. मग परत एकदां तमाखू चोळून मी तिचें सेवन केलें व पुढील मार्गास लागलों.

मित्रा हिंदबादा, आणि इतर मित्रहो, विद्वान्, कलावान्, शास्त्रज्ञ, वेडे, अपघात अशीं हीं भयंकर संकटें सोशीत सोशीत मी शेवटीं भांबुर्डे-मार्गें पुण्यास पोंचलों. पुण्यास मीं जे विविध अनुभव घेतले त्यांच्या गोष्टी फार सुरस व चमत्कारिक होतील. आपल्याला हपिसांत जाण्यास उशीर होत असेल तेव्हां मी आपला अधिक समय घेत नाहीं. तसेंच माझीसुद्धां पुण्यास जावयाची वेळ झाली आहे.''

असें म्हणून सिंदबादानें हिंदबादास आणखी एक शंभर रुपयांची थैली देऊन त्याचा निरोप घेतला. पण जातांना तो त्यास आणखी गोष्टी ऐकण्यास बोलवावयाला विसरला नाहीं.

हिंदबाद लेखनिकानें तर सद्गदित होऊन सिंदबादाचे पायांवर मस्तक ठेविलें व तो म्हणतो, " महाराज, मी खरोखर आपला अपराधी आहें. मुंबई ते पुणें या प्रवासांत आपण जे कष्ट सोशिले ते ऐकून माझे अंगावर कांटा उभा राहिला. आपल्या त्रासापुढें माझा त्रास हा काय होय ! इतःपर मी रेलगाडीच्या प्रवासाबद्दल कधींच तक्रार करणार नाहीं.''

असें म्हणून सिंदबादच्या अलौकिक गुणांबद्दल त्याला पुन्हा पुन्हा दुवा देत आणि आपलें तिकीट सांवरीत हिंदबाद लेखनिक तेथून चालता झाला.

म. ग्रं. सं. ... वाचनालय ठाणे.
क्र. ... 11126
दि. ... 29/10/64

कॉन्टिनेन्टल प्रकाशन

IRBK-0107720

IRBK-0107720